
साप्ताहिक
# माणूस
२९ जानेवारी १९८३, दोन रुपये

## हिमगौरी आणि सात बुटके



गद्य विडंबन-
हा तर
पुलंचा
फोर्ट
किल्ला!



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : तेहतीस ३४

२९ जानेवारी १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

शिरिष घाटे

पुणे वार्ता

# रा. स्व. संघाचे प्रांतिक शिबिर

नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्यात दिनाक १४, १५, १६ तारखेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं महाराष्ट्र प्रातिक शिबिर तळजाईच्या विस्तीर्ण पठारावर शिस्तबद्ध सयोजनाखाली तरीही अतिशय उत्साहानं पार पडलं. एवढ्या प्रचंड प्रमाणावर महाराष्ट्रात पार पडलेल हे पहिलच शिबिर- आतापर्यंत महाराष्ट्रात झालेल्या दोन शिबिरानंतर जवळजवळ पंधरा वर्षांनी हे शिबिर घेतलं गेलं आणि तेही अशा भव्य, देखण्या स्वरूपात की १९८३ वर्षावर या घटनेचा सहज छाप पडावा !

शिबिरासाठी तळजाईचं पठार साफ करायला दसऱ्याचा मुहूर्त निवडला होता त्यानंतर चालू असलेल्या तयारीचे पुसट उल्लेख कानावर येत. मग प्रत्यक्ष बांधणीला सुरुवात. स्टेज कसं आहे, मुख्य प्रवेशद्वार कोणत्या आकाराचं आहे याबद्दल संघप्रेमिकाच्या चर्चा जानेवारी महिना येऊन ठेपला आणि शिबिरासाठी जमणाऱ्या स्वयसेवकांचा अपेक्षित आकडा संघाच्या प्रसिद्धी-विभागातून पेपरमध्ये प्रसिद्ध झाला आणि आश्चर्य वाटलं. पस्तीस हजार स्वयसेवक संयोजकांना अभिप्रेत होते आणि त्यांचा अदाज अर्थातच चुकला नाही !

पुण्यात १४, १५, १६ तारखाना खाकी-पाढरा रंग होता. घरा-घरात चालणाऱ्या चर्चेत, दैनिकात हा रंग होता. रंगाच्या छटा अर्थातच वेगवेगळ्या. कधी निखळ कौतुक, कधी टिंगल–टवाळी, कुठे छुपी अलिप्तता तर कुठे एवढ्या प्रचड सख्येबद्दल पोटदुखी; तरी रंग एकच होता हे निश्चित. संघशिबिराबद्दल सामान्य लोकाना उत्सुकता होती हे वेगळं सागायला नको. शिबिराची जागा बघण्यासाठी उत्साही पुणेकर स्वत:च्या कमी–अधिक वयाकडे दुर्लक्ष करून, सकाळची थंडी आणि दुपारच्या उन्हाकडे डोळेझाक करून टेकडी चढत होते. तिथं धडकून येणारी मडळी तिथल्या शिस्तबद्ध आखणीच्या गोष्टी पसरवत होती. एखादी मोठी गोष्ट घडण्यापूर्वी वातावरण 'टेम्पो' तयार होतो तो असा ! शिबिराची तयारी वाचण्यासाठी खास 'तरुण भारत' वाचला जात होता. या वातावरणाला जोडूनच कुठे विशेषांकाची तयारी चालली होती.

तेरा तारखेपासून कँप खऱ्या अर्थानं गजबजला. वेगवेगळ्या गावचे तंबू भरायला लागले. रस्त्यावरून बाहेरगावाहून येणारी तरुण मुलं पाठीवर पिशव्या अडकवून, हातात दड घेऊन संघाची, देशाची गाणी गात उत्साहानं जाताना दिसत रस्त्यावरची माणसं थबकून पहात.

कधी नाही ते वाजत-गाजत आलेल शिबर सुरू झालं. सामान्य लोक शिबिरात ओढले गेले ते मात्र दोन प्रमुख कार्यक्रमांनी एक म्हणजे संघदर्शन आणि दुसरं शिबिराच्या अखेरच्या शेवटच्या दिवशी १६ तारखेला सर्व स्वयंसेवकाचं होणार असलेलं संचलन ! दोनही कार्यक्रमांबद्दल खूप कुतूहल व अपेक्षा होत्या. एकानं बऱ्याच प्रमाणात पूर्ण केल्या; दुसऱ्यानं थोडी निराशा केली.

प्रदर्शनानं अपेक्षा पूर्ण केल्या कारण संघाच्या स्थापनेपासून आजतागायत संघाचा विस्तार, प्रसार आणि अनेक विधायक कार्यांत संघाचा शिस्तबद्ध संचार अशा जाहीर प्रदर्शनाच्या रूपात सघाच्या शिबिराच्या ठिकाणी प्रथमच सूत्ररूपानं दाखवण्यात आला. सुमारे बावीस हजार चौरस फूट जागेत साडे-तीनशे चित्र आणि छायाचित्रं प्रदर्शनात होती. प्रदर्शनाला रेखीव स्वरूप याव म्हणून सत्तर स्वयसेवक झटत होते.

प्रदर्शनाला सामान्य लोकाचा प्रचड प्रतिसाद मिळाला तो त्याच्या समग्रतेमुळ. सघ आता साठीकडे झुकतो आहे. गेल्या सत्तावन्न वर्षातील कार्याचा आरंभ अर्थातच संघ-

संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्या जीवनचरित्रापासून सुरू होतो. त्यानंतर श्री. गोळवलकर गुरुजींचे जीवनदर्शन; संघापासून प्रेरणा घेतलेल्या अनेक संस्थांच्या कामाचे दर्शन, तसंच अनेक नैसर्गिक आपत्ती कोसळल्या असताना संघाच्या स्वयंसेवकानी केलेले सेवाकार्य-गोंडा प्रकल्प, कुष्ठ–धाम प्रकल्प, वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र दुष्काळ विमोचन समिती, ग्रामोत्थान, सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ, सेवा भरती, बाल सुधार केन्द्र असे अनेक महत्त्वाचे टप्पे ओलाडत प्रदर्शन संघाच्या सद्यःस्थितीपर्यंत येतं. सध्याचे सरसंघचालक बाळासाहेब देवरसांच्या उद्धृत केलेल्या विचारांतून संघाची भूमिका, नवे बदल सहज लक्षात येत होते. विधायक कार्यक्रमातील संघाचा सहभाग वाचून आणि छायाचित्रांतून पाहून संघाबद्दल त्रयस्थपणे विचार करणाऱ्या अनेकांना डॉ. हेडगेवारांचे संघाबद्दलचे मत 'संघाचे कार्यक्रम बिनचूक करणे किंवा नियमाने संघस्थानी उपस्थित रहाणे एवढ्याने संघकार्य संपत नाही ही गोष्ट लक्षात ठेवा! महत्त्वाचे कार्य संघाबाहेरच आहे. संघ केवळ स्वयसेवकांपुरता मर्यादित नाही. संघाबाहेरील लोकांसाठी संघ आहे.' मनोमन पटले. ही ठाम भूमिका संघस्वयंसेवक अंगात बाणवतात की नाही हा प्रश्न आहे. स्वयंसेवकाच्या एकारलेल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल जे बोलले जाते त्याचे मूळ या वैचारिक गोंधळात आहे. काही असो, प्रदर्शनाने संघाच्या मूळ भूमिकेबद्दलचे अनेक फुटकळ गैरसमज बऱ्याच प्रमाणात दूर केले.

सर्व लोकांच्या खास आकर्षणाचा दुसरा कार्यक्रम, अर्थातच संचलनाचा! एकात्म भावनेने जमलेल्या सुमारे बत्तीस हजार स्वयंसेवकांना एकाच गणवेषात, एकाच तालासुरात चालताना बघणे हाच एक लक्षणीय, थरारक अनुभव होता. संचलनाची भव्यताच अशी होती काही ठिकाणी पडणारी संचलनातली मरगळलेली पावले, हरवलेला ताल आणि काही अनुत्साही चेहरे यांच्याकडे सहज दुर्लक्ष व्हावे.

संघशिस्त, संघाचे घोषपथक, संचलन याबद्दल आतापर्यंत खूप काही ऐकलेले होते. त्यामुळे होणाऱ्या संचलनाबद्दल सहाजिकच काही अपेक्षा मनात होत्या. संचलन दोन दिवसांच्या भव्य परंपरेला साजेसंच झालं; पण संचलनाच्या शिस्तीला मात्र उतरलं नाही! स्वयंसेवकांचे गणवेष अधिक एकसारखे, ताठ असायला हवे होते. नुसते गणवेषच नाही, नजरही अधिक ताठ असायला हवी. संचलनाची शिस्त दिसते ती त्यातूनच!

याबद्दल एका स्वयंसेवक मित्राशी बोलले तेव्हा तो म्हणाला, 'संघाशी आणि शिबिराशी ज्यांचा प्रथमच संबंध येत आहे असेच सुमारे ८–१० हजार लोक होते. तेही बऱ्याच प्रमाणात खेड्यांतून आलेले, ज्यांना गणवेष जमवणंच अवघड जात होतं. परत संचलन म्हणजे काय हेही कित्येकांनी प्रथमच पाहिलं!'

हे उत्तर पुरेसं बोलकं आहे; पण म्हणून या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. महाराष्ट्रात सुमारे पंधरा वर्षांनी झालेलं हे विराट शिबिर, ज्याचं वर्णन अभूतपूर्व, इतिहासातली अविस्मरणीय घटना वगैरे वृत्तपत्रानी केलं, लक्षावधी लोक जिकडे डोळे लावून अपेक्षेने बघत होते, त्यांच्या संघशिस्तीची कल्पना अशा किरकोळ गोष्टींनीदेखील डागळली जाऊ नये असं संघचालकांनाही निश्चित वाटत असेल! या शिबिरासारख्या पूर्वनियोजित कार्यक्रमाची कसून तयारी करून घेणंही अशक्य नव्हतं.

संचलन पाहून संघाचा आवाका लक्षात आला; पण प्रखरता जाणवली नाही. 'आज एकदा पुन्हा सिंहनाद होउ दे' हे गीत ऐकून देखील माझ्या मनात आवेश का निर्माण होऊ नये? ◻

---

## कै. आ. रा. भट

---

पुस्तकाचं नाव आहे आत्माराम रावजी भट–चरित्र आणि कार्य. लेखक आहेत भटाच्या कार्याबद्दल आपुलकी आणि आदर असलेले धोंडो वासुदेव विद्वांसाचे नातू शंकर जोशी.

आ. रा. भट माहीत होते ते मराठा चेंबरचे संस्थापक आणि लघुउद्योगाचे खंदे पुरस्कर्ते म्हणूनच. शंकर जोशी यांनी लिहिलेल्या पुस्तकात भटाच्या व्यक्तिमत्त्वाचे सगळे रंग आहेत. अगदी पारमार्थिकसुद्धा!

भट गणेशभक्त होते. १९५२–५३ मध्ये ते अधिक धार्मिक, आध्यात्मिक प्रवृत्तीचे झाले. दिवसाचे २–३ तास ते पूजेअर्चेत घालवत. जपजाप्यापासून देव पाण्यात बुडवून ठेवण्यापर्यंत या आराधनेचे प्रकार चालत. २२१ पानावर भटानी लिहिलं आहे की, 'मी प्रथम ल. ना. गोखल्यांच्या लग्नपत्रिकेतल्या छापलेल्या गणपतीच्या फोटोची पूजा करत असे.' हा संदर्भ वाचला आणि गोखलेसराना जर्नालिझम डिपार्टमेंटमध्ये भेटायला गेले.

सर म्हणाले, 'मीसुद्धा हा संदर्भ परवा–परवा वाचला; पण दरवेळी मला भेटले की ते म्हणत, 'तुमच्या पत्रिकेचा उल्लेख मी पुस्तकात केला आहे. वाचलात का?' सर म्हणाले, 'मला भटांची आठवण येते ती एकावन्नमधली. तेव्हा केसरी आठवड्यातून दोनदाच निघायचा. भट तेव्हा मॅनेजर होते. रविवारचा तिसरा अंक काढायचा व्यवस्थापकीय निर्णय घेतला तेव्हा रविवार आणि दैनिकाच्या कामासाठी मला बोलावलं.'

रविवारचे अंक तेव्हा ठसठशीत निघत. एकदा भट म्हणाले, 'तुमचं हे चांगलं चाललं आहे; पण तुम्हाला जाहिरातीचं, पोस्टर लिहियाचं कळत नाही. पोस्टरमध्ये फक्त ५–६ ओळी आणि विषय असावेत असा जाहिरातशास्त्राचा पहिला धडा त्यानी मला दिला!'

भटांबद्दल बोलताना ते म्हणाले, 'ते केसरीचे मॅनेजर होते; पण त्याना सहसंपादकाचं स्थान होतं. तात्यासाहेब करंदीकर संपादकीय मीटिंग्ज घेत. मला आठवतं, आर्थिक विषयांवरचे सर्व अग्रलेख भट तात्यासाहेबाच्या सांगण्यावरून लिहीत.'

पां. वा. गाडगीळ म्हणतात–भटांची लेखणी 'टाइट' असे. गोखलेसर म्हणाले, 'ते लिखाण टाइट करण्याचा प्रयत्न मात्र करायचे. आपल्या लिखाणात ते इतक्या करेक्शन्स करत की, कपॉझिटर वैतागून जात! पेजप्रुफमध्ये भट ओळीच्या ओळी घालत. एखाद्या वेळी 'कामाला उशीर का?' असं विचारलं की भटाचे लिखाण घेऊन कंपॉझिटर येत. त्यांना वाटे की, प्रत्येक अग्रलेख परिपूर्ण असावा. या परफेक्शनसाठी त्याची सतत धडपड असे. त्यासाठी ते इतर लोकाची फिकीर करत नसत. खरं तर वृत्तपत्रीय लिखाणात एखादी चूक सहज खपून जाते; पण एखादा दोष जाणवला इतपत त्यांना ही खाडाखोड करण्याची खोड होती.

भटांना त्यांच्या आर्थिक विषयांच्या लिखाणाबद्दल सार्थ अभिमान होता; पण त्यामागे तात्यासाहेब करंदीकर असत. चेंबरच्या उभारणीच्या कामासाठी आणि प्रचारासाठी भट केसरीतून इतके धडाडीनं लिहीत असत की, भट केसरीचा चेंबरच्या उभारणीसाठी उपयोग करतात असं आम्ही त्या वेळी म्हणत असू; पण केसरीच्या विश्वस्तांनी त्यांना ते स्वातंत्र्य दिलं होतं.

सर सांगत होते.

भट अतिशय प्रांजल, श्रद्धाशील होते. केसरीत असताना ते दररोज टिळकांच्या पुतळ्याला पायातल्या चपला काढून नमस्कार करत. आम्ही तेव्हा गॅलरीतून बघत असताना त्यांची टिंगल करत असू. त्या वयात आम्हाला ते खोटं वाटायचं; पण तीच त्यांची पद्धत होती.

भट एकाच वेळी इतक्या गोष्टी करत की, आम्ही अवाक होत असू. जिथे त्यांच्या कामासाठी माणसं तयार झाली तिथे ते रेंगाळत नसत; पण चेंबरशी ते इतके एकरूप झाले होते की 'भट म्हणजेच चेंबर!' असे वाटे. सुमारे ३०।४० समित्यांवर त्यांनी जोखमीचं काम केलं; पण प्रेस कमिशनच्या कामात त्यांनी विशेष रस घेतला. जस्टिस राजाध्यक्ष त्या वेळी कमिशनचे अध्यक्ष होते. शिवाय रावसाहेस पटवर्धन, झकीर हुसेन, आचार्य नरेंद्र देव, चलपतीराव यांसारख्या मातब्बर लोकांकडून मला खूप शिकायला मिळालं असं ते म्हणत. 'प्राइम, पेज शेड्यूल' हा भटांचा या क्षेत्रातला मोठाच सहयोग होता. कोणत्याही व्यवसायाचं व्यावहारिक गणित त्यांच्याइतकं कोणालाच समजत नसे. प्राइस पेज हे त्याचं उत्तम उदाहरण!

भट म्हटलं की डोळ्यांसमोर येतात ते धोतर—नेहरू शर्ट आणि काळ्या टोपीतले. पुढे कॉंग्रेसमध्ये गेल्यावर ते पांढरी टोपी घालायला लागले. त्याची आम्ही चेष्टाही करत असू. निरलसपणे काम करणारी मनस्वी कार्यार्थी व्यक्ती म्हणूनच भट माझ्या डोळ्यासमोर येतात. एखाद्या गोष्टीबद्दल वरवर थातुरमातुर बोललेलं त्यांना आवडत नसे. कोणत्याही प्रश्नाच्या मुळाशी जाऊन विचार करण्याची त्याची वृत्ती होती. म्हणूनच हिंदूसभेचे मामा दाते असोत अगर जयंतराव टिळक असोत. व्यवस्थापकीय सल्ला भटांचाच घेतला जात असे. आणि तेही हवा-नको तो सगळा सल्ला देत असत.

भटांचं व्यक्तिमत्त्व कसं होतं? त्यांना माणसांची योग्य पारख होती. विशेषांक, पुरवण्या काढायच्या ठरल्या की, जाहिराती ते फोनवर मिळवत आणि ठरलेल्या वेळेच्या आधी जाहिरातीचा कोटा पूर्ण करीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग म्हणजे मनस्वीपणा ILNA सारख्या अनेक छोट्या-मोठ्या संस्था त्यांनी स्थापन केल्या, जबाबदारीने पेलल्या; पण त्यासाठी त्यांनी राजकारण आणि खोटेपणा केला नाही. हे त्यांचं वैशिष्ट्य होतं.

सरांची आणि त्यांची शेवटची भेट ऑक्टोबरमधली. जर्नालिझम विभागात वृत्तपत्रस्वातंत्र्यावर परिसंवाद आयोजित केला होता. प्रभाकर पाध्ये उद्घाटक आणि भटसाहेब अध्यक्ष होते. त्या वेळी बोलताना ते म्हणाले, 'वृत्तपत्रव्यवसायाचे प्रमुख काम लोकशिक्षण आणि जागृती असायला हवे. व्यवसाय हा त्याचा दुय्यम भाग आहे.'

नंतरच्या चहापानाच्या वेळी, सरांच्या लग्नपत्रिकेतल्या गणपतीच्या छापील फोटोची आठवण काढायला अर्थातच भट विसरले नाहीत!

— मेधा राजहंस

# अप्पासाहेब

## लहानांच्या हिताचा ध्यास

लघुउद्योगमहर्षी श्री. आत्माराम रावजी भट यांचे मंगळवार, १८ जाने. ८३ रोजी वयाच्या अठ्ठ्याहत्तराव्या वर्षी पुण्यात निधन झाले! गुरुवारी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज्च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत पुण्यातील अनेक नामवंत उद्योगपतींनी भाषणे केली. त्या वेळी बोलताना एक उद्योगपती म्हणाले, 'कै. अप्पासाहेब भट हा महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील एक निराळाच संत होता!' कै. आ. रा. भट यांचे असे वर्णन खरोखरच अतिशय समर्पक ठरावे. प्रथम, व्यापार—उद्योगामध्ये मागे असलेला मराठी माणूस पुढे यावा यासाठी ५० वर्षांपूर्वी, आपल्या वयाच्या २९ व्या वर्षी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज्ची स्थापना करणाऱ्या आणि पुढे आयुष्यभर संपूर्ण भारतातील लघुउद्योगांच्या हितासाठी झटणाऱ्या या बुद्धिमान गृहस्थाकडे उदंड उद्यमशीलता होती; पण स्वत:चा उद्योग काढण्याच्या मोहात ते जराही पडले नाहीत! वयाच्या विसाव्या वर्षी युसुफ मेहेरअल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली यंग इंडिया सोसायटी स्थापन करून स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेणाऱ्या राष्ट्रवादीवृत्तीच्या अप्पासाहेबांनी आयुष्यभर फक्त देशाच्या उद्योगाचीच चिंता वाहिली आणि यतिधर्माचा एक आदर्श निर्माण करून ठेवला. कर्तृत्ववान पण सत्ता आणि पैसा यांचा हव्यास असलेली अनेक पुढारी आणि उद्योगपतिमंडळी आयुष्यभर खादी वापरीत असलेली आपण पाहतो; पण अंगी अफाट कर्तृत्व असूनही खादी धारण करून निष्ठापूर्वक साध्या राहणीचा आणि सचोटीचा अंगिकार करणाऱ्या अप्पासाहेबांसारख्या व्यक्ती आज दुर्मिळच आहेत! त्यामुळे अप्पासाहेबांच्या वियोगाचे दु:ख विशेष जाणवते आहे. अमुक-अमुक व्यक्तीच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे असे एक पोकळ वाक्य आपण अनेकदा ऐकतो; पण अप्पासाहेबांनी त्यांच्या आयुष्यात उभा केलेला सार्वजनिक कार्याचा प्रचंड डोंगर पाहिला की खरोखरच त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे किती अवघड आहे ते आपल्या लक्षात येईल.

भारतातील लघुउद्योगाचे पाठिराखे म्हणून अप्पासाहेबांचे कार्य आज अनेकांना माहीत आहे; पण पत्रकारितेसाठी अप्पासाहेबानी केलेल्या अविरत परिश्रमाची माहिती, विशेषत: माझ्यावरोबरीच्या तरुण पत्रकारांना फारशी नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यांना आदरांजली वाहताना त्यांच्या या क्षेत्रातील कामगिरीची थोडक्यात उजळणी करणे उचित ठरेल. भारतीय देशी भाषा वृत्तपत्रसंघाची —(इंडियन लॅंग्वेजेस् न्यूज पेपर्स असोसिएशन—इल्ना) स्थापना करून त्यांनी वृत्तपत्रांसाठी केलेले कार्य लक्षात घेता 'वृत्तपत्र महर्षी' या उपाधीने त्यांचे वर्णन

करणेही उचित ठरेल.

अप्पासाहेबांचा पत्रकारितेशी त्यांच्या कॉलेजजीवनापासूनच संबंध आला. मुंबईला सिडनहॅम कॉलेजात बी. कॉम.चा अभ्यास करीत असतानाच 'लोकमान्य' या वृत्तपत्रात मराठीत आर्थिक विषयावर लेख लिहिण्यास त्यानी सुरुवात केली. त्यानंतर एम. कॉम. करीत असताना कॉलेजच्या बँकिंगविषयक नियतकालिकाचे दोन वर्षे संपादन केले. पुढे १९२९ मध्ये केसरी–मराठा संस्थेत ते दाखल झाले व तेथे तेवीस वर्षे सेवा करून १९५२ मध्ये तेथून निवृत्त झाले. या काळात त्यांचा वृत्तपत्राच्या जगाशी जाहिरात–व्यवस्थापक, उपसंपादक, व्यवस्थापक, पत्रकार अशा सर्वांगांनी संबंध आला. प्रत्येक गोष्ट नेटकेपणाने व अभ्यासू वृत्तीने करायची हे अप्पासाहेबांचे ब्रीद असल्याने या काळात त्यानी या वृत्तपत्रीय जगातील सर्व समस्यांचा बारकाईने अभ्यास केला आणि मूळचा पिंड हा अभिजात कार्यकर्त्याचाच असल्याने स्वतः मोठे पत्रकार होण्याकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यांनी या क्षेत्रातील व विशेषतः देशी भाषा वृत्तपत्रांचे प्रश्न सोडविण्याकडेच आपले लक्ष केंद्रित केले.

### किमत–पृष्ठ कोष्टक

अप्पासाहेब १९३३ मध्ये केसरी–मराठा संस्थेच्या पुण्यातील कार्यालयात रुजू झाले. त्यानंतर केसरी-मराठाच्या वतीने येथील 'पुणे छापखाना मालक संघा'च्या कामात लक्ष घालण्यास त्यांनी सुरुवात केली. प्रेस ॲक्ट, वृत्तपत्र कागद नियंत्रण इत्यादी प्रश्नांबाबत या काळात त्यानी संघाच्या वतीने शासनाशी वाटाघाटी केल्या. पुढे १४ जून १९४१ रोजी मुंबईतील 'जन्मभूमी' पत्राचे संपादक अमृतलाल शेठ यांच्यासह त्यानी देशी भाषा वृत्तपत्र संघाची (इल्ना) स्थापना केली. प्रथम दहा वर्षे उपाध्यक्ष म्हणून व नंतर सतत पंचवीस वर्षे अध्यक्ष म्हणून निवडून येऊन त्यांनी 'इल्ना' द्वारा या क्षेत्रात बहुमोल कामगिरी केली.

देशी भाषांतील मध्यम व लहान वृत्तपत्रांच्या तसेच वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या हिताच्या दृष्टीने शासनाने वृत्तपत्रांना किमत–पृष्ठ कोष्टक लागू करावे यासाठी अप्पासाहेब सतत झगडत राहिले. त्यांच्या प्रयत्नामुळे शासनाने २४ ऑक्टोबर १९६० रोजी किमत–पृष्ठ कोष्टक आदेश काढून त्याची अंमलबजावणी डिसेंबर १९६० पासून होईल अशी घोषणा केली; परंतु पुण्यातील 'सकाळ' वृत्तपत्र संस्थेने या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयामध्ये धाव घेतली व १९६१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा रद्द ठरविला. त्यानंतरही अखेरपर्यंत भटसाहेबानी या विषयाचा पाठपुरावा चालू ठेवला; पण त्यात त्यांना यश आले नाही. किमत–पृष्ठ कोष्टक अंमलात आणण्यासाठी जरूर तर सरकारने घटनेत बदल करावा असे त्यांचे मत होते. १९५६ मध्ये न्यूयॉर्क टाइम्सने आपल्या एका अग्रलेखात भारतीय संसदेपुढे आलेल्या 'वृत्तपत्र (किमत व पृष्ठ) विधेयक १९५६' या विधेयकावर टीका केली होती. त्या टीकेला अप्पासाहेबानी दिलेल्या उत्तरामध्ये (जे न्यूयॉर्क टाइम्समध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते) अप्पासाहेबांचा किमत-पृष्ठ कोष्टकाविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे. त्याचा मथितार्थ असा : 'वृत्तपत्र (किमत व पृष्ठे) विधेयक १९५६' हे वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याच्या आड कसे येते आणि भारताच्या ध्येय-धोरणाला कमीपणा कसा आणते हे समजणे कठीण आहे. सरकारला संपादकीय लेख किंवा बातम्या यावर नियंत्रणाचे अधिकार या विधेयकाने दिलेले नाहीत. पंधरा वृत्तपत्र–मालक एकूण खपापैकी ५०.१ टक्के खपाची दैनिके आपल्या ताब्यात ठेवून मतस्वातंत्र्य संकुचित करीत आहेत. म्हणून या विधेयकाची गरज उत्पन्न झाली. शिवाय वृत्तपत्रांच्या मागणीच्या मानाने जाहिराती कमी असल्याने काही खास वृत्तपत्रानाच फक्त पुरेशा जाहिराती मिळतात व त्याचा उपयोग ती वृत्तपत्रे जादा पृष्ठसंख्या छापण्यात करतात. वर्तमानपत्र विकत घेणाऱ्याच्या दृष्टीने भारतात रद्दीला किती पैसे मिळतात यालाही महत्त्व असते. आजची तथाकथित मुक्त स्पर्धा खऱ्या मतस्वातंत्र्याच्या आड येत आहे. पृष्ठसंख्येला धरून वृत्तपत्राची किमत ठरविण्यात आल्याने जाहिरातीवरील त्यांचे अवलंबन कमी होईल आणि वर्गणी ही त्यांची मुख्य उत्पन्नाची बाब होईल. किमत–पृष्ठ कोष्टक आल्याने खरे मतस्वातंत्र्य मिळेल आणि मालकीचे ध्रुवीकरण व वृत्तपत्रक्षेत्रातील मक्तेदारीकडे होणारी वाटचाल रोखली जाईल.'

'इल्ना'च्या माध्यमातून प्रयत्न करून, वृत्तपत्रांवरील विक्रीकर माफ करून घेण्यात भटसाहेबांनी यश मिळविले (१९४६). ऑक्टोबर १९५३ मध्ये त्यांनी 'इल्ना'चे मुखपत्र म्हणून 'लॅंग्वेज प्रेस बुलेटिन' सुरू केले. हे नियतकालिक सुरू करताना अप्पासाहेब लिहितात, 'लोकशाही नीट चालावी व लोकशाही-प्रथा रूढ होण्याकरिता जिल्हानिहाय अनेक वृत्तपत्रे असावीत असे संघाला वाटते व त्या दृष्टीने जिल्हा वृत्तपत्रांच्या प्रश्नावर हे पत्र आपले लक्ष केंद्रित करील.' १९५२ मध्ये अप्पासाहेबांची 'इल्ना'चे अध्यक्ष या नात्याने वृत्तपत्रआयोगावर निवड झाली. ते काम दीड वर्ष चालले. आयोगाचे काम करीत असताना श्रमिक पत्रकार, संपादकांचे स्वातंत्र्य, वृत्तपत्र-व्यवसायातील खाजगी मालकी अशा महत्त्वाच्या अनेक प्रश्नांवर अप्पासाहेबानी सखोल अभ्यास करून आपली मते आग्रहपूर्वक मांडली. १९५६ मध्ये श्रमिक पत्रकारांची वेतनश्रेणी इत्यादी ठरविण्यासाठी शासनाने नेमलेल्या उच्चाधिकार-मंडळावर मालकांच्या वतीने असलेल्या तीन सभासदांत अप्पासाहेब एक होते. राष्ट्रीय कामगार-आयोगाने नियुक्त केलेल्या वृत्तपत्र–उद्योगाच्या अभ्यासगटाचे (१९६७–६८) अप्पासाहेब सदस्य होते. 'इल्ना'च्या वतीने व भारतीय वृत्तपत्रव्यवसायातील तज्ज्ञ म्हणून अप्पासाहेबाना तीन वेळा परदेशी जाण्याचे योग आले. त्यापैकी १९६० मध्ये बँकॉक येथे युनेस्कोच्या वतीने भरलेल्या परिषदेत अप्पासाहेबानी 'भारतीय देशी भाषा वृत्तपत्रांचे प्रश्न' या विषयावर निबंध

मलपृष्ठ १ वर

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर सत्याग्रहातील अनुभव – लेखक : निशिकांत भालेराव**

(चालू अंकातील पृष्ठ ७ वरील जाहिरातीत लेखकाचे नाव चुकून निशिकात मिरजकर असे छापले गेले आहे.)

# भोसले शासनाचे एक वर्ष : सारीच गंमतजंमत !

गिरणीकामगारांचा संप आणि स्वपक्षातील बंडखोरांच्या कारवाया यांची घरघर कायम असूनही मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी एक वर्ष पूर्ण केलं आहे.

'तात्पुरता मुख्यमंत्री' म्हणून ज्यांच्याकडे राज्याचे नेतृत्व सोपविण्यात आले होते त्या भोसल्याच्या पाठीशी दिल्लीचे तख्त अद्यापही उभे आहे, तर ज्या अंतुल्यांनी बाबासाहेबाचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी सुचविले त्यांच्यासह बहुसंख्य आमदार भोसलेंविरुद्ध दंड थोपटून उभे आहेत !

राजकारणाचा ४–५ वर्षांहून अधिक अनुभव नसलेले भोसले आमदार होताच मंत्री झाले आणि अंतुल्यांच्या सत्ताच्युतीनंतर त्यांच्या ध्यानीमनी नसताना मुख्यमंत्रिपदाचा मुकुट त्यांच्या डोक्यावर ठेवण्यात आला. अंतुलेंमुळे आपल्याला हे पद मिळाले असल्याची पुरती जाणीव असल्याने मुख्यमंत्री भोसले सुरुवातीचा काही काळ त्यांच्याच सल्ल्याने कारभार चालवीत होते. जवळजवळ रोजच ते अंतुलेंच्या भारतमहाल या निवासस्थानी जात असत; परंतु अंतुलेंचा हा हस्तक्षेप दिल्लीला नको होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सिमेंटप्रकरणी अंतुले यांना पुन्हा दोषी ठरविले. ते निमित्त साधून इंदिरा गांधी यांनी भोसल्यांना अंतुलेंविरुद्ध उभे राहण्यास सांगितले. तेव्हापासून भोसलेंची अंतुलेंविरुद्ध वक्तव्ये प्रसिद्ध होऊ लागली; परंतु त्याची प्रतिक्रिया अंतुलेनिष्ठांच्या बंडखोरीने उचल खाण्यात झाली.

अवघ्या सहा महिन्यांतच भोसलेंच्या विरुद्ध राज्यातील बहुतेक गट उभे राहिले. वसंतदादा पाटील, जाबुवतराव धोटे, यशवंतराव चव्हाण आणि ए. आर. अंतुले यांचे पाठिराखे समजले जाणारे बहुसख्य आमदार 'भोसले हटाव' मोहीम चालवीत आहेत. अकार्यक्षम, निष्क्रिय सरकार ही त्यांची एकमेव टीका आहे. भोसलेंच्या अकार्यक्षमतेमुळे महाराष्ट्राचे नुकसान होते आहे ही त्यांची तक्रार आहे. भोसले सरकारने फारशी कार्यक्षमता दाखविलेली नाही हे जरी खरे असले तरी त्याचे कारण केवळ मुख्यमंत्री भोसले हेच आहेत असं म्हणता येणार नाही.

मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या एक वर्षाच्या कारकीर्दीचा ताळेबंद मांडताना पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या धोरणापासून बंडखोरांच्या कारवायांपर्यंतच्या साऱ्या गोष्टी लक्षात घ्यांव्या लागतील. निष्क्रिय सरकार, थंडावलेले प्रशासन ही वस्तुस्थिती खरीच; पण त्याला भोसले जितके जबाबदार तितकेच इंदिरा गांधीचे धोरण आणि बंडखोरांनी माजवलेली बेदली हेही घटक जबाबदार आहेत. ज्या गिरणीसंपाबाबत भोसले सरकारवर निष्क्रियतेचा आरोप करण्यात येतो, ज्या प्रश्नाचं निमित्त करून धोटेंनी बंड पुकारलं तो प्रश्न इंदिरा गांधी यांच्या मनात जोवर येत नाही तोवर तसाच भिजत राहणार ! 'गिरणीसंप मिटला नाही तर आम्हाला येत्या निवडणुकीत मतदारांपुढे उभे राहता येणार नाही,' असं आमदार भाऊराव पाटील म्हणाले ते मात्र शंभर टक्के खरं आहे !

आपली मुख्यमंत्रीपदी झालेली निवड 'तात्पुरती' असल्याचे माहीत असल्याने भोसलेंनी सुरुवातीच्या काळात काहीच हालचाल केली नाही. कोणतेही महत्त्वाचे निर्णय ते त्या काळात घेत नव्हते. कुणालाही न दुखविण्याचं आणि उगाच वाईटपणा पदरात न घेण्याचं धोरण त्यांनी पहिले काही महिने अवलंबिलं. त्यामुळं पहिल्या सहामाहीत भोसले सरकारची निष्क्रियताच फक्त दिसत होती. सरकारी अधिकारी आपलं ऐकत नाहीत अशी तक्रार त्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यावरोबर बोलताना अनेक वेळा केल्याचे सागण्यात येतं, तर कोणतीही निर्णयक्षमता नसलेला मुख्यमंत्री असं त्यांचं वर्णन मंत्रालयातून ऐकू येत असे !

कासवाच्या गतीनं चाललेलं हे सरकार सहा महिन्यांनंतर थोडं गतिमान झालेलं दिसतं. अंमलबजावणीच्या पातळीवर फार मोठं आशादायक चित्रं नसलं तरी काही चागले निर्णय नंतरच्या काळात भोसले सरकारनं घेतलेले दिसतात.

## काही चांगले निर्णय

सत्तारूढ झाल्यानंतर सगळ्यात चांगला निर्णय मुख्यमंत्री भोसले यांनी कोणता घेतला असेल, तर तो देशी दारूच्या दुकानांसाठी परवाने न देण्याचा निर्णय ! तीन ऑगस्ट रोजी विरोधी पक्षनेत्याबरोबर झालेल्या बैठकीत त्यांनी हे धोरण जाहीर केले. देशी दारूची किरकोळ विक्रीची दुकाने आणि बिअरबार यासाठी परवाने न देण्याचे धोरण अंतुल्याच्या काळात आमदारासाठी शिथिल करण्यात आले होते. इंदिरा काँग्रेसमधील हाताच्या बोटावर मोजण्याइतके अपवाद वगळता बहुतेक आमदारानी अशा परवान्यांसाठी शिफारसी केल्या होत्या. त्यात विरोधी पक्षाचेही आमदार सामील होते; पण असे परवाने न देण्याच्या धोरणामुळे भोसलेंवरील रोष वाढत गेला. आपल्या कारकीर्दीत आपण एकाही बिल्डरला एन. ओ. सी. (ना हरकत प्रमाणपत्र) दिले नसल्याचा दावा मुख्यमंत्र्यांनी नुकताच केला आहे. हीही एक त्यांची जमेची बाजू धरावी लागेल.

१३ नोव्हेंबर रोजी नियोजनाचे आणखी विकेंद्रीकरण करण्याचा आणि गटपातळीवर नियोजन करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. दुष्काळी आणि अवर्षणप्रवण भागातील छोट्या शेतकऱ्यांच्या शेतात सरकारी खर्चाने विहिरी खोदून देण्याचा चांगला कार्यक्रम भोसले सरकारने हाती घेतला. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची शिरगणती करून त्यांना व्यवसाय पुरविण्याचा प्रयत्न करणारी एकात्मिक ग्रामीण विकास योजना सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच

पृष्ठ ३१ वर

## कामगार वृत्त

# १८ जानेवारी

गिरणीसंपाच्या वर्षपूर्तिदिनानिमित्त या एका आठवडयात मुंबईत खूप कार्यक्रम झाले. चौका-चौकात डॉ. सामंतांनी आयोजित केलेल्या सभा, इतर कामगारनेत्यांची भाषणे, मुंबई सरकारने सादर केलेली कामगार-पुरवणी, लोकसत्तेतील कामगारनेत्यांच्या मुलाखती या अनेक घटनांनी गिरणीसंपाचा हा वाढदिवस खूप गाजला; पण १८ जानेवारी रोजी डॉ. सामंतांनी पाळलेला ‘ काळा दिन ’ आणि त्या दिवशी शिवाजीपार्कवर झालेली त्यांची जाहीर सभा ह्या गोष्टी खास उल्लेखनीय होत. याच्याच जोडीला मुंबई मराठी पत्रकार संघाने गिरणीसंपाच्या वाढदिवसानिमित्त जे दोन वार्तालापाचे कार्यक्रम आयोजित केले, तेही यात भर घालणारेच ठरले.

गिरणीसंपात आपणाद्वारे जर काही तडजोडीच्या दृष्टिकोनातून करता आले तर ते काम आपण करावे या भावनेतून मुंबई मराठी पत्रकार संघाने संपनेते डॉ. दत्ता सामंत आणि मिलमालक संघाचे सरचिटणीस विजयनगर यांच्या वार्तालापाचे दोन कार्यक्रम आयोजित केले होते. वर्षानंतर या दोन नेत्यांची संपाबाबत काय भूमिका आहे हे लोकांना समजावे ही त्यापाठीमागील भावना होती. पत्रकार संघाचे अध्यक्ष कुमार कदम यांनी आपल्या भाषणात याचा उल्लेखही केला.

सोमवार १७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता डॉ. सामंतांच्या वार्तालापाचा कार्यक्रम होता. फार दिवसांनंतर डां. सामंत पत्रकारांना भेटत असल्याने कार्यक्रमात एक उत्साह होता. साडे–अकरा–पावणेबारापासूनच पत्रकार जमा होऊ लागले होते. बारा वाजूनही खूप वेळ लोटला, तरी डॉ. सामंतांचे आगमन न झाल्याने ते येणार आहेत की नाही, अशा शंका पत्रकारांकडून व्यक्त केल्या जाऊ लागल्या. कारण एक तर डॉ. सामंत पत्रकारांना भेटत होते आणि अशा या दिवसांतच त्यांना अटक केली जाण्याची शक्यता वर्तवली जात होती. आदल्याच दिवशी डॉ. सामंतांच्या तीन-चार प्रमुख कार्यकर्त्यांना सरकारने राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक केल्याने तर ही शक्यता वाढली होती.

पण तसे काहीही झाले नाही ! साडेबाराच्या सुमारास सामंतांचे पत्रकारसंघाच्या सभागृहात आगमन झाले. लागलीच कार्यक्रम सुरू झाला. हा कार्यक्रम दीड तास खेळीमेळीच्या वातावरणात झाला आणि डॉ. सामंतांनी तो जिंकलाही ! कामगारांसमोर केले जाते असे अर्ध्या तासाचे भाषण डॉ. सामंतांनी येथे प्रास्ताविक म्हणून केले यात त्यांनी गिरणीकामगार जराही दमला नाही, एका वर्षानंतरही त्याची जिद्द तशीच आहे असे ठामपणे सांगितले. गावाकडे गेलेला कामगार मुंबईला परतण्याचा बेतात जरादेखील नाही. ‘आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय तो मुंबईत पाऊलच टाकणार नाही ’ असे डॉ. सामंत म्हणाले. गावाकडे गेलेल्या कामगाराला पर्यायी काम आणि रोजगार मिळाला आहे. रोजगार हमी योजनेवर आमचे हजारो कामगार रोजच्या आठ रुपये मजुरीवर काम करत आहेत, असेही डॉ. सामंत म्हणाले. आमच्या मागण्या मान्य करा, बी. आर. अ‍ॅक्ट कायदा रद्द करा, आम्हाला मान्यता देऊन हा प्रश्न मिटवा. अशा मागण्या डॉ. सामंतांनी केल्या. इंदिरा सरकार कामगाराला धडा शिकवण्यासाठी संप फोडण्याचे कारस्थान करत आहे. असा स्पष्ट आरोप डॉ.सामंत यांनी या वेळी केला.

गेल्या एका वर्षात २००० कोटींचे उत्पादन बुडाले, ६ कोटी मनुष्य-दिवस वाया गेले. हा इंदिरा सरकारच्या सामाजिक आणि आर्थिक धोरणाचा पराभव आहे. सरकारला हे भूषणावह नाही. आजच्या काळात भांडवलदारांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. ६० गिरणीमालकांनी २॥ लाख गिरणीकामगारांची अगदी पिळवणूक केली. त्यांना पुरेशा रजा नाहीत, हजारो बदली कामगार गिरण्यांच्या दारावर रोज काम द्या म्हणून हात पसरतात आणि हे मालक त्यांना महिन्यातून फक्त १०।१२ दिवस काम देतात. त्यांचा महिन्याचा पगार मग २५०/-३०० रुपये होतो. हे चित्र दिसत असूनही मान्यताप्राप्त राष्ट्रीय मिल मजदूर संघाने काहीही केले नाही. दिवाळीच्या वेळी मटक्यासारखी ही युनियन बोनसचे आकडे जाहीर करू लागली. कामगारांचा यावरील विश्वास उडाला व ते आमच्या संघटनेखाली आले.

कोणतीही युनियन संप करून करून किती दिवस करेल ?–आज ना उद्या ती झुकेलच अशी सरकारला घमेंड आहे. आम्हाला हेच मोडून काढावयाचे आहे. त्यासाठी आमचा संप पुढेही चालू राहील असे डॉ. सामंत म्हणाले.

डॉ. सामंतांच्या या एवढ्या प्रास्ताविकानंतर प्रश्नोत्तराचा जो कार्यक्रम झाला तो अगदीच मिळमिळीत ! पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना डॉ. सामंत म्हणाले की, ज्या गिरणीकामगारांनी मुंबईची शान वाढविली त्या कामगारांना बंदूकधारी पोलीस धमकावत आहेत. गिरणगावात जोराचे अटकसत्र सुरू आहे. सर्वत्र १४४ कलम आहे. रा. सु कायद्याखाली आमच्या ३० लोकांना अटक करण्यात आलेली आहे. रेडिओ व वृत्तपत्रे बरोबर बातम्या देत. नाहीत, वगैरे वगैरे ! न्या. देशपांडे कमिटी ही अन्याय करणाऱ्यांचीच असल्याने त्यातून यशस्वी काहीच बाहेर पडणार नाही असेही डॉ. सामंत म्हणाले.

डॉ. सामंतांच्या वार्तालापाइतका गिरणी मालक संघाचे सरचिटणीस विजयनगर यांचा १८ जानेवारी रोजी झालेला वार्तालाप तितका गाजला नाही. संप बारगळल्यात जमा आहे; ९८ हजार कामगार कामावर रुजू झाले आहेत; २४ हून अधिक गिरण्या तीन पाळचांमध्ये सुरू आहेत. बाकीच्या दोन पाळचांत सुरू आहेत अशी आकडेवारी त्यांनी सादर केली. एक–दोन महिन्यांत गिरण्या पूर्ववत सुरू होतील असेही विजयनगर म्हणाले. सरकारकडून योग्य तो कर्जपुरवठा होत नसल्याने गिरण्या सुरू होण्यात अडचणी येत असल्याचेही त्यांनी सांगितले; पण डॉ. सामंतांइतकी समाधानकारक उत्तरे विजयनगरांच्याकडून आम्हाला मिळाली नाहीत असे काही पत्रकार नंतर म्हणाले.

इकडे पत्रकार संघात विजयनगर यांचा वार्तालापाचा कार्यक्रम सुरू होता तर तिकडे शिवाजीपार्कवर डॉ. सामंतांची जाहीर सभा सुरू होती. १८ जानेवारीचा हा दिवस कामगारांनी काळा दिवस म्हणून पाळला ! काळे बिल्ले लावून त्यांनी काम केले!

वाढदिवसाच्या या निमित्ताने प्रत्येकाला भरपूर खाद्य मिळाले. वृत्तपत्रांनी बातम्या छापल्या, मुलाखती छापल्या, अग्रलेख लिहिले. कामगारनेत्यांची गगनभेदी भाषणे झाली; पण गिरणीकामगारांचे काय ? तो आहे तेथेच आहे !

**–मोहन शं. कुलकर्णी**

मुंबई वार्ता

# पत्रकारिता

## –अरुण शौरी

**भा**रतातलं विकासाचं अर्थशास्त्र आणि पत्रकारिता याच्यामध्ये एक गोष्ट समान आहे असं म्हणता येईल. त्या दोहोचाही स्थान बरंच उच्च आहे; पण त्याचा दर्जा किंवा त्याच्यातले अंतर्गत आदर्श मात्र तितके उच्च नाहीत. वृत्तपत्रस्वातंत्र्य आणि एकूणच पत्रकारितेच्या क्षेत्रातील सध्याची परिस्थिती या विषयावर बोलताना अरुण शौरींनी काढलेले हे उद्गार आहेत.

आणीबाणी संपल्यानंतर या विषयावरच्या चर्चा बऱ्याच गाजल्या होत्या. नंतर पुन्हा एकवार पत्रकारमंडळी व्यवसायाच्या रुळल्या चाकोरीतच रुळत चालली होती या साऱ्यांना तळापासून धक्का देऊन खडबडून जागं करण्याचं श्रेय बिहारच्या वृत्तपत्रविधेयकाला द्यावं लागेल!

लोकशाही आणि वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचं नातं अतूट आहे असं आपण म्हणतो. स्वतंत्र बाण्याच्या वृत्तपत्राचा लोकशाहीच्या यशात सिंहाचा वाटा असतो हे पण आग्रहाने मांडतो; पण ते तर काय जगन्नाथ मिश्रानादेखील मान्य आहे! तेव्हा लोकशाहीच्या या आधारस्तंभाची, त्याच्या स्वरूपाची आणि सामर्थ्याची यथातथ्य जाणीव आपल्याला झाली आहे असं त्यावरून म्हणता येणार नाही. काही काही वाक्प्रचार आणि संकल्पनांची तर आता चलनी नाणीच बनली आहेत. तीसुद्धा वापरून गुळगुळीत झालेली. वृत्तपत्रस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, भ्रष्टाचार, सरकारी जुलूमशाही, भांडवलदारी हितसंबंध इत्यादि शब्द पेरले म्हणजे बोलणारा आणि ऐकणारा दोहोंच्याही मनात अर्थाचा एक सर्वसाधारण पुंजका उभा राहतो; पण त्यात नेमकेपणा किंवा ठाशीवपणा असेलच असं नाही.

या पार्श्वभूमीवर अरुण शौरींनी घेतलेल्या सद्यःपरिस्थितीचा आढावा समग्र होता आणि *मुख्य म्हणजे तो ढोळस होता, जिवंत होता.*

पहिला मुद्दा अर्थात स्वातंत्र्याचा ज्याच्याशिवाय वृत्तपत्राचं अस्तित्वच अशक्य होऊन बसेल. बाह्य दबाव, गळचेपी इत्यादींनी या क्षेत्राला ग्रासलं आहे, असं सर्वमान्य असलं, तरी ती खरी परिस्थिती नाही. खऱ्या अर्थाचं वृत्तपत्रस्वातंत्र्य फक्त उत्तर अमेरिका व पश्चिम युरोपमध्ये आहे हे खरं; पण रशिया किंवा फिलिपिन्समध्ये तर अगदी क्षुद्र, किरकोळ मुद्द्यांबाबत स्वातंत्र्य मिळविण्यासाठीदेखील वृत्तपत्रांना झुजावं लागतं. शौरी म्हणतात, त्यामानानं भारतात काम करणं, लिहिणं पुष्कळ सोपं आहे. वृत्तपत्रस्वातंत्र्य ही आपल्यासाठी चर्चा करायची, गृहीत धरायची बाब आहे. या देशात दबाव आणणार कोण ? असं कोणतं सरकार इथं सामर्थ्यशाली आहे ? इथे केवळ एक मध्यवर्ती प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे आणि तेवढं सोडलं तर बाकी कोणाचीही सत्ता इथे चालत नाही. बरीचशी दडपशाही, सरकारी कारभार इतका सरळसरळ बेकायदा असतो की, कायद्याचा बडगा त्याला पुरेसा असतो. म्हणजे त्या दिशेनं वृत्तपत्राची खूप पायमल्ली होते आहे असं नाही.

अनागोदीची ही परिस्थिती म्हणजे एक प्रकारे वृत्तपत्राच्या वाढीला चांगलं खतपाणीच म्हणता येईल. त्याचा फायदा वृत्तपत्रांनी घेतला आहे का ? या प्रश्नाला अर्थातच संमिश्र उत्तर द्याव लागेल.

गेल्या चार–पाच वर्षात दैनिकं, साप्ताहिकं, पाक्षिकं, मासिकं इत्यादींची पुष्कळ वाढ झाली आहे. या वाढीमधून पत्रकारितेत संख्यात्मक भर पडली आहे आणि गुणात्मकही. पत्रकारितेच्या सामाजिक आशयाचं आणि संदर्भाचं प्रमाण आज वाढलं आहे आणि याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे पूर्वीची सरकारची सामर्थ्यशाली प्रतिमा आज पुसत चालली आहे. पूर्वीची परिस्थिती कशी होती ? लिहायचं ते सरकारविषयी; माहिती, बातम्या मिळवायच्या त्याही सरकारी सूत्राकडून आणि ज्या लिहायच्या त्याही सरकारसाठीच. साहजिकच सरकारी प्रशंसा मिळवणं ही एक महत्त्वाकांक्षा होऊन बसे. हे अगदी सरकारधार्जिणेपण नाही तरी सरकारच्या अवाजवी संदर्भात लिहिलं होतं, ते आज कमी झालं आहे. वृत्तपत्रमाध्यमाचं *व्यावसायीकरण झालं आहे– चांगल्या अर्थानं.* अर्थात याला वाईट बाजू आहेच; पण त्याच्या चांगल्या बाजूबद्दलही बोलण्यासारखं पुष्कळ आहे.

शौरींचं हे बोलणं ऐकताना सहजच मला ब्रुस हॅंथवेची आठवण झाली. ब्रुस हॅंथवे हे एक अमेरिकन पत्रकार आहेत. नुकत्याच मुंबईत झालेल्या एका सायकिॲट्रिक कॉन्फरन्सच्या निमित्तानं ते भारतात आले होते. त्यांच्याशी बोलताना अमेरिकन वृत्तपत्रव्यवसायाविषयीचं एक समग्र चित्र डोळ्यांसमोर उभं राहिलं आणि सहजच भारतीय आणि अमेरिकन पत्रसृष्टीची तुलना मनात आली.

भारतातली पत्रसृष्टी व्यावसायिकीकरणाच्या मार्गावर आहे, तर अमेरिकेत ती पूर्ण व्यावसायिक बनली आहे. व्यवसायात टिकण्याचा खरा नियम म्हणजे सर्वायवल ऑफ द फिटेस्ट. ज्याची लायकी असेल तो टिकेल! अमेरिकन वृत्तव्यवसाय आज एवढा बलवान आहे की, दूरचित्रवाणी–आकाशवाणीचं प्रस्थ वाढत असूनही त्याची जागा कोणी घेऊ शकत नाही. तो केवळ बलवानच नाही, तर फोफावतो आहे, बहरतो आहे. त्याला नवीन शाखा फुटताहेत.

हॅंथवेचंच उदाहरण घ्या. ते केवळ पत्रकार नाहीत, तर वैद्यकीय पत्रकार आहेत आणि त्या वैद्यकीय पत्रकारितेतही केवळ मानसोपचारीय पत्रकारिता ते करतात! म्हणजे केवढं विशिष्टीकरण (स्पेशलायजेशन) पहा. एवढं विशिष्टीकरण करता येतं. कारण त्याला मागणी आहे. अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशनचे बारा हजार सभासद आहेत म्हणजे एक ठराविक वाचकवर्ग आणि त्या वाचकवर्गाच्या गरजेप्रमाणे, आवडीप्रमाणे लिहिणारा वार्ताहर, पत्रकार हे सारं तिथे तयार आहे आणि ही तयारी व्यावसायिकीकरणाच्या प्रक्रियेत झाली आहे. वृत्तपत्रलेखन हे समाजासाठी आहे, समाजाच्या संदर्भात आहे, सरकारी संदर्भात नाही. कारण ते तसं असेल, तर त्या लेखनाला मागणी रहाणार नाही. हॅंथवे म्हणतात, 'वृत्तपत्रलेखन करून पोट भरणं अमेरिकेतही शक्य नाही; पण त्यांच्यासारखा एखादा पत्रकार एका कॉन्फरन्ससाठी इतक्या दूर येऊ शकतो, जगभर फिरू शकतो ही त्यांच्या या वक्तव्यावरची बोलकी प्रतिक्रिया ठरेल!'

हॅंथवे म्हणतात, 'वॉटरगेट प्रकरणानंतर अमेरिकन वृत्तसृष्टीत जणू काही रेनेसास अवतरला आहे. एक तीव्र स्पर्धेची भावना व्यवसायात आली आहे आणि या स्पर्धेत, उतरण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी आपलं लेखन यथातथ्य असावं, अचूक असावं आणि तरीही ते रसरशीत, चुरचुरीत असावं अशी जाणीव पत्रकारांना होऊ लागली आहे. पत्रकारिता नव-नव्या वाटा शोधते आहे, त्याचबरोबर इनवेस्टिगेटिव जर्नलिजमही वाढीला लागतो आहे.

भारतामधलं चित्रही याच दिशेनं बोट दाखवणारं आहे. इथेही नव-नवी मासिकं निघताहेत. त्यांमधून वेगवेगळ्या विषयावर भर दिला जातो आहे. इनवेस्टिगेटिव जर्नलिजम वाढीला लागतो आहे. वृत्तपत्रानी प्रसिद्धी दिली त्यामुळे विनाचौकशी तुरुंगात खितपत पडलेल्यांची सुटका झाली. कैद्यांचे डोळे फोडण्यासारखे अमानवी प्रकार थांबले. उत्तरप्रदेशातल्या पोलिसांच्या गैरकृत्यांना वाचा फुटली. अंतुल्यांची इतिश्री होऊ शकली! ही सारी जबाबदार आणि अर्थपूर्ण पत्रकारितेची लक्षणं मानायला हवीत.

तरीही शौरी म्हणतात, 'या बाबतीत अजून किती तरी वाट भारतीय पत्रकारितेला चालायची आहे. हा वृत्तपत्रव्यवसाय भारतातल्या इतर अनेक व्यवसायाप्रमाणेच खाजगी भांडवलदाराच्या, श्रीमंत गुडाच्या हातात आहे आणि इतर अनेक व्यवसायांप्रमाणेच मध्यमवर्गीय नोकरदार तो चालवताहेत. त्यामुळे त्याची उद्दिष्टं, ध्येयधोरणं आणि मूल्यसकल्पना भांडवलदारी आहेत आणि कार्यपद्धती मध्यमवर्गीय आणि व्यावसायिकीकरणाची ही वाईट बाजू– वृत्तपत्रव्यवसायाचं व्यापारीकरण झालं आहे. वृत्तपत्राच्या अर्धशिक्षित गब्बर मालकाला कित्येकदा कळतही नसतं की, या वर्तमानपत्राचं काय करावं. सुरुवातीपासून शेवटपर्यंत ते वाचण्याचीही काही जणाची लायकी नसते. एखादं कापडाचं दुकान टाकावं, तसं एक धंदा करणारं वर्तमानपत्र त्यानी काढलेलं असतं एवढंच. त्याचे सत्ताधाऱ्यांना खूष ठेवण्यात गुतलेले हितसबध इत्यादि उघड गुपितं आहेत; पण या माणसाविषयी मी फारसा विचार करीत नाही. कारण पंतप्रधानाच्या 'न्यायबुद्धी' वर माझा विश्वास आहे. या सर्व माणसांचा त्या योग्य वेळी 'चव्हाण' बनवतीलच, यात मला काही शका नाही !'

तेव्हा या भांडवलदारांची फारशी चिंता नाही. कारण यादवी त्याना संपवायला पुरेशी आहे. अगदी ते असले तरीही वृत्तपत्रव्यवसाय बरंच काही करू शकेल. मुख्य म्हणजे लोकशाहीतलं ते एक चांगलं हत्यार बनू शकतं. लोकशाही सुरळीत ठेवायला आणि तिला तेलपाणी करायला जी एक यंत्रणा हवी, त्याचा पत्रकारिता एक भाग बनू शकते. पत्रकारांच्या माहितीचा उगम आता सरकार नसतो,तर त्याच्या बातम्या, 'स्टोरीज' त्यांच्या निरीक्षणातून, त्यांच्या कष्टातून, धाडसातून येत असतात. या त्यांनी उकरून काढलेल्या प्रकरणाना वकील उचलू शकतात, खासदार लोकसभेत त्यांना घसाला लावू शकतात, त्याच्याविरुद्ध जनमत उठवता येतं आणि त्यातून बरंच विधायक साधता येतं.

महत्वाचं आहे ते बाहेरून मिळणारं स्वातंत्र्य नाही, तर या व्यवसायातल्यानी राखलेलं धैर्य, चाणक्षपणा, सत्याचा त्यांनी बाळगलेला अट्टाहास. तो असेल तर वृत्तपत्र–स्वातंत्र्याला कोणी धक्का लावू शकणार नाही !

अरुण शौरीचं भाषण इथंच संपत; पण त्यांनी मांडलेल्या सर्व विचाराचा पाठपुरावा करायचा म्हटला, तर मात्र इथंच थांबता येणार नाही. पत्रकारान निर्भय बनायला हवं, सत्याबद्दल आग्रही असायला हवं, ही या व्यवसायाची गरज आहे, काळाची गरज आहे आणि ती पूर्ण करण्याची जबाबदारी या क्षेत्रात नव्यान प्रवेश करणाऱ्या, ताज्या दमाच्या, सळसळत्या रक्ताच्या तरुणावरच प्रामुख्यान येणार आहे; पण तरुणांमध्ये ही जाणीव निर्माण झालेली आहे का? पत्रकारिता ही करियर बनू शकते याची जाणीव आज तरी फारशी दिसत नाही. वोकेशनल गायडन्सच्या यादीत तिचं नाव येतं का? एस. एस सी.च्या यादीत चमकणारी मुलं आपण डॉक्टर–इंजिनियर होणार इत्यादि मुलाखती देतात. गेल्या काही वर्षांपासून त्यात सी. ए. इत्यादि वाढ झाली आहे. त्यामानानं पत्रकारितेकडे, काही गाजलेले अपवाद वगळले तर जाणून–बुजून वळताना, त्यासाठी आवश्यक ते कष्ट घेताना कुणी स्कॉलर विद्यार्थी दिसत नाही. पत्रकार म्हणजे कारकुनासारखी अळणी नोकरी नव्हे, की ती सहज कुणीही करावी! चांगलं प्रशिक्षण, विचारक्षमता, आवश्यक असणारं भरपूर ज्ञान, कष्ट करण्याची तयारी पाहिजे असणारं, महत्त्वाकांक्षेला वाव देणारं आणि जबर सामाजिक बाधिलकी असणारं ते काम आहे. अरुण शौरीचं उदाहरण महत्त्वाचं वाटतं ते याचसाठी. आमच्या तरुणाना आणि भावी आधारस्तंभांना एक नवीच आव्हान देणारी दिशा या उदाहरणानं दाखवली आहे.

—ललिता बर्वे

---

हे सारं मुद्दामहून मला कधी लिहावंसं वाटलं नाही. रोज काहीतरी खर्डत गेलो. लिहिता लिहिता एक डायरीच तयार झाली. कारागृहातून बाहेर पडल्यावर काही मंडळींनी अनुभव लिहिले. संडे ऑब्झरवर सारख्यांनी एका प्रतिष्ठित नेत्याचा (कम् पत्रकार) लेख छापला. एकदम भिकार.
यांच्यापेक्षा आपण लिहिलेलं निश्चित चांगलं असं मला वाटलं. लोक काय वाटेल ते छापून आणतात. आपण रोज नोंद करीत गेलो. आठवेल त्याची. भाषेच्या आड न लपता. पण हे कोण छापणार ?

—निशिकांत

**'माणूस' छापत आहे – शक्यतो पुढील अंकी.**
**निशिकांत मिरजकरांचे नामांतर-सत्याग्रहातील अनुभव**
**येरवडा कारागृहातील – ७ सप्टेंबर ते २० सप्टेंबर १९८२.**

---



# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प सहावे : शुक्रवार २२ ऑक्टोबर १९८२

**डॉ. स. गं. मालशे**

# गद्य विडंबनकार पु. ल. देशपांडे

**'डॉ.** मालशे हे मुंबईचे. या व्याख्यानमालेतले सर्व वक्ते पुण्याचे. आम्ही या ज्ञानसत्रासाठी त्यांना मुद्दाम मुंबईहून बोलावलं; कारण आचार्य अत्रे, पु. ल यांसारखी जी महाराष्ट्राची श्रेष्ठ साहित्यिक दैवतं आहेत, त्यांच्या विनोदाची तात्त्विक चिकित्सा डॉ. मालशे यांनीच केलेली आहे विनोदाबद्दल फार थोडयांनी लिहिलंय. आचार्य अत्र्यांप्रमाणं डॉ. मालश्यांनीही विनोदाचं व्याकरण विवरून सांगितलं आहे. आचार्य अत्र्यांना व्याख्यानांचं वेडच होतं. ते कधी व्याख्यानाला 'नाही' म्हणत नसत; पण कधी अडचणच आली आणि 'विनोदा'वर व्याख्यान असलं तर ते सांगत मालश्यांना घेऊन जा. ते चांगले बोलतील !' अशा शब्दात डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी डॉ. स. गं. मालशे यांची प्रारंभी ओळख करून दिली.

नंतर डॉ. मालशे म्हणाले—

आजच्या माझ्या व्याख्यानाचा विषय सर्वांना परिचित आहे. पु. ल. देशपांडे. आता देशपांडयांनीच म्हणून ठेवलंय की, प्राध्यापक आणि लिफ्टमन यांच्या चेहऱ्यावर कधी हसू दिसत नसतं ! पण मी प्राध्यापक असलो, तरी आपल्या बहुढंगी आणि बहुरंगी व्यक्तिमत्त्वातून सादर केलेले 'बटाटयाची चाळ, वाऱ्यावरची वरात, वटवट'सारखे सारे पुलचे बहुरूपी प्रयोग मी पैसे मोजून पाहिले आहेत आणि मनमुराद हसलो आहे. त्याच्या विनोदाचा आनंद १९३५ सालापासून गेली पस्तीस वर्षं लुटीत आलो आहे त्या कृतज्ञतेची पावती देण्यासाठीचं मी आजचं व्याख्यान द्यायचं कबूल केल आहे.

डॉ. भीमराव कुलकर्णी हे माझे जवळचे मित्र आहेत. त्यानी आपुलकीच्या पोटी माझ्याविषयी बरच काही सागितलं. ते विसरा. आपल्याऐवजी आचार्य अत्र्यांनी एकदा मला चेंबूरला 'विनोदा'वर व्याख्यान द्यायला पाठवलं होतं. खरं आहे; पण मी संयोजकाना सांगितलं. 'भली मोठी पाटी लावा, की मालशे याचं व्याख्यान आहे, आचार्यांचं नाही ! नाही तर मला धोंडे बसतील !' कधीकधी लग्नसमारंभाची जय्यत तयारी झालेली असते नि काही कारणानं नवरामुलगाच गायब होतो ! मग गावातल्या भटजीचा सटरफटर मुलगा धरून बोहोल्यावर चढवतात, त्यातलाच तो प्रकार होता ! असच एकदा आचार्यांचं वरळीला 'विनोद' या विषयावर व्याख्यान होतं. आचार्यांनी प्रारंभीच माझ्यावर 'विनोद' करून व्याख्यानाचा प्रारंभ केला. माझ्याकडे हात करून ते म्हणाले, 'अहो, या मालश्यानी विनोदावर चांगलं लिहिलंय. मग मला कशाला बोलावलंत?' मला लाजल्यासारखं झालं. साऱ्यांच्या नजरा एकदम माझ्यावर खिळल्या ! पण मी म्हणजे विनोदाचं आपलं निमित्त होतो. आचार्यांना एक किस्सा सांगायचा होता. नेहमीचाच ! हाइडपार्कमध्ये लंडनला एका पाद्रयाची तीन दिवस व्याख्यानमाला ठरली होती. विषय होता 'धर्म आणि कर्म !' टेबल मांडून पाद्री उभा राहिला नि त्यानं श्रोत्यांना सवाल केला, 'बाप हो ! धर्म म्हणजे काय हे तुम्हाला माहीत आहे काय.?'

श्रोते म्हणाले, 'नाही !'

पाद्री म्हणाला, 'धर्मासारखी रोजची गोष्ट तुम्हाला माहीत नाही, मग मी तुम्हाला काय सांगणार कर्म ? मी चालतो !' बॅग खाकोटीस मारून तो सरळ निघून गेला. दुसऱ्या दिवशी सध्याकाळी पुन्हा व्याख्यान ! पाद्रयाचा प्रश्न ठरलेला— 'धर्म म्हणजे काय हे माहीत आहे काय ?' श्रोते जरा शहाणे झाले, ते म्हणाले, 'आहे !'

पाद्री म्हणाला, 'छान ! जर तुम्हाला धर्म माहीत आहे, तर कर्म माहीत असणारच. मी चालतो !' तिसरे दिवशी पुन्हा शेवटच व्याख्यान ! प्रश्न तोच ! आता श्रोते अधिक शहाणे झाले. काही म्हणाले, 'माहीत आहे !' इतर अर्धे म्हणाले, 'माहीत नाही !' पाद्री म्हणाला, 'फार उत्तम ! ज्यांना धर्म म्हणजे काय हे माहीत आहे, त्यांनी ज्याना तो माहीत नाही त्याना सागा. माझं काय काम ? मी हा चालतो !' तेव्हा हे प्राध्यापक मालशे इथं तुमच्यात असताना मला कशाला बोलावलंत ? मी चालतो !'

आचार्यांनी हे असं म्हटलं हे ठीक आहे; पण त्यातला इत्यर्थ एवढाच की, आपला एक हमखास किस्सा अडकवण्यासाठी त्यानी माझा उपयोग केला खुटीसारखा ! या विषयावरील अधिकाराविषयी डॉ. भीमरावानी सागितल, ते विसरायच. अरतपरतं करूनच स्वीकारायचं. तो माझा अभ्यासाचा विषय आहे, आवडता विषय आहे, हाच त्यातला भावार्थ !

पु ल. देशपाडे यांचं वाङमय तुम्ही वाचलेलं आहे. 'नारायण', 'म्हैस'सारख्या ध्वनिफिती तुम्ही ऐकल्याहेत. या लेखकानं तुमच्या मनात घर केलं आहे. अशा स्थितीत मी नवं काय सागू ? झालीच तर माझ्या व्याख्यानानं उजळणी होईल नि पुनःप्रत्ययाचा आनद मिळाला तर मिळेल !

विनोदी लेखन हा साहित्याचा कमकस प्रकार मानण्याकडे काहीचा कल आहे. माझे आवडते लेखक गंगाधर गाडगीळ तसं सागत असतात. आता हे खरं आहे की, जी गोष्ट एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकाराद्वारे जशी परिणामकारकपणे माडता येते, तशी दुसऱ्याद्वारे माडता येत नाही. प्रत्येकाच बलस्थान असतं. एखादा हलकाफुलका फार्स अगदी हलक्याफुलक्या पद्धतीन लिहिणं ही कठीण गोष्ट आहे ! बालाच्या कल्पना व्यक्त करणारी सोपी बालकथा लिहिणं ही गोष्ट महाकठीण आहे. जर्मनीमध्ये छोटया बालकाना शिकविणाऱ्या मास्तराना पगार प्राध्यापकाहून जास्त असतो, असं म्हणतात ! लहान मुलाना सोप्या भाषेत शिकवणे हे महाकर्म कठीण असतं. सांगायची गोष्ट ही की, शोकान्तिकाकाराप्रमाण प्रहसनकारसुद्धा थोर कलावंत असावा लागतो. त्याला विसंगती हेरून तिला सुसंगती द्यावी लागते. विसंगती अनाठायीपण पुढं ठेवली की, विनोद निर्माण होत नाही ! तिला वाङमयाचं रूप यावं लागतं. विनोदकार हा विसंगतीची फसव्या तार्किक पातळीवर अशी सुसंगत मांडणी करतो की, त्याला सुंदर गंमतीचं 'रूप' येतं. 'रूप' येणं, 'सत्या-

भास ' साधणं ही महत्त्वाची गोष्ट आहे. पुलंच्या दोन प्रसिद्ध कोटया आहेत ! विंदा करंदीकरांच्या मराठी साहित्याला दोन अमोल देणग्या आहेत. एक ' तालचित्रे ' व दुसरी ' दिलीप चित्रे ! ' (दिलीप चित्रे विंदांचे विद्यार्थी होते). दोन्ही दुर्बोध ! फ्रान्सची द्राक्ष-संस्कृती तर आमची रुद्राक्ष-संस्कृती, ही त्यांची कोटी घ्या. एका फसव्या तर्कबुद्धीच्या पातळीवर तिथं सुसंगतीच साधलेली असते. विनोदकार. हा असा संयोजक असावा लागतो. कलावंत असावा लागतो अगदी गंभीर लेखकाइतकाच !

## सिक्स्थ-सेन्स

गद्य-विडंबन हा पुलंचा फोर्ट-किल्ला आहे. त्यात त्यांचा खरा-खुरा विक्रम आहे. ते कोल्हटकर-गडकऱ्यांच्या खांद्यावर उभे आहेत. ' राजसंन्यास ' आणि ' तुझं आहे तुजपाशी ' यांतील वाक्यांचे न्यास सारखे वाटतील ! पण पुलंनी हा वारसा पचवलेला आहे. बाबा पुरंदऱ्यानी शिवाजीपार्कवर शिवकालीन प्रदर्शन मूर्तिमंत मांडलं होतं. तेव्हा पुल म्हणाले, ' कुठं तो निश्चयाचा महामेरु आणि कुठे हे आजचे राज्यकर्ते महामोरू ! ' ही कोटी काय सहज आलीय ? 'निश्चयाचा महामेरू' ही समर्थांची ओवी ' भावबंधन ' नाटकातला मोरू एवढंच नव्हे तर सायंकाळी सोनं लुटून काशीकडून ओवाळून घेणारा क्रमिक पुस्तकातला मोरू आपल्याला आठवतो. कवितेतच अनेक संदर्भांचं सूचन असतं आणि विनोदात नसतं असं थोडंच आहे ? भाषेचा कस काय नुसता कवीच अजमावतो ? विनोदकारसुद्धा तो अजमावीत असतो. ' कसं काय ? ' बरं ' आहे या साध्या वाक्प्रचारावर पुलचा अप्रतिम लेख आहे. केळीचे मुनवे एकामागून एक सोलीत जावे, तसे ' बरं ' या शब्दाचे अर्थ पुल सोलीत गेले आहेत. मग ' बरं आहे, वच्चजी ! पाहून घेईन ' ' असा तो गुळमुळीत 'बरं' शब्द तरारून उभा राहतो ! असं करीत त्यानी निबंध संपवला आहे एका विरोधी स्वरावर ! तसं म्हटलं तर पुल हे कोल्हटकर-गडकऱ्यांपेक्षा निबंधाच्या ' रूपा 'च्या बाबतीत पुढं गेले आहेत. कोल्हटकरांना ' चोरांचं सम्मेलन ' हा लेख अगदी आदर्श जमलाय; पण कित्येकदा त्यांच्या विनोदी लेखाचे प्रारंभीचे परिच्छेद गंभीर, अगदी अविनोदी असतात. गडकऱ्यांचा ' कवीचा कारखाना ' म्हणजे कोटयांचा अजबखाना आहे तो किती आणि कुठवर पसरत जातो ! निबंधाची सुरुवात, मध्य आणि अंत नेमका साधण्याची किमया पुलना अधिक चांगली साधलीय ! हे ' सिक्थ सेन्स-सहावं इंद्रिय ' कलावंताला हवं असतं. पुलना ते आहे. त्यांचा ' अंगुस्तान विद्यापीठा '-वरील लेख पहा. ' अपौरुषेय कपडयां ' पासून ' फाफूच्या मशिनप्रमाणे चालणाऱ्या मेंदूतील विचारापासून तो शेवटच्या ' शिव ! शिव ! ' या आर्त उद्गारापर्यंत त्यानी शैपिक कल्पनांचा बाज कायम राखला आहे. शैपिक विश्वामित्री प्रतिसृष्टीच निर्माण केली आहे. अत्र्यांची विडंबनकाव्यं अद्वितीय आहेत. माधव ज्यूलियनमय बनून त्यानी ' श्यामले ' हे विडंबन रचलंय ! दुसऱ्याचं भूत उतरवताना मांत्रिक ते स्वत:च्या अंगावर घेतो, तसाच तो प्रकार आहे; पण तिथे अत्रे माधव ज्युलियनांचं विकृत अनुकरण करून थांबले नाहीत. कल्पनाची त्यांची स्वतःची आतषबाजी तेवढीच समर्थ आहे आणि म्हणून ती कविता माधव ज्युलियनांचं विडंबन आहे, याचा पत्ता नसणाऱ्या प्रेक्षकालाही ती आस्वाद्य वाटते ! कारण ते नुसते विकृत अनुकरण नव्हतं. प्रतिभावंत विनोदकाराचा पाणिस्पर्श त्याला झालेला होता. हा 'हातचा आला' विडंबनाला चिरंतनत्व प्राप्त करून देतो.

अत्रे विडंबनाचे आचार्यच; पण त्यानीच म्हटलंय की, पद्यविडंबन सोपं असतं, गद्याची प्रकृती पसरट असते. गद्य बंदिस्त नसतं, म्हणून त्याचं विडंबन अधिक कठीण जातं. पद्याला ठेका, ताल, तोल, लय, अनुप्रास, पिष्टपेषणासारख्या बनलेल्या क्लृप्त्या-क्लीशे-असतात. विनोदी विडंबनकाराला त्यातल्या या क्लृप्त्यांवर अणी टेकवता येते. ' कशायपेयपात्रपतितमक्षिकेप्रत ' हे शीर्षक दमछाक न होता, वाचलं की, ते वि. वा. भिडयाचंच विडंबन म्हणून आस्वाद्य होत नाही; संस्कृतप्रचुरतेचे वेड आजही आहेच. त्याला सार्वत्रिकता येते; पण एकंदरीत पद्यविडंबन सोपं. ' धन्य शिवाजी ! तो रणगाजी ! धन्यचि तानाजी ! ' हा वीर सावरकरांचा ' सिंहगडाचा पोवाडा ' गाजला, जप्त होता म्हणून अधिक गाजला ! आम्ही विद्यार्थी होतो, तेव्हा प्रभातफेऱ्या निघत. त्यात ' धन्य गांधिजी, तो रणगाजी, धन्यचि नेहरूजी ' अशा प्रकारच्या त्या पोवाडयाच्या नकलांवर नकला झाल्या. मग आम्ही सुद्धा ' धन्य बुवाजी, करतो ताजी बटाटयाची भाजी ' असं एक विडंबन केलं होतं !

तेव्हा इत्यर्थ असा की, पुलंनी गद्यविडंबनात जे यश मिळवलं आहे, ते अद्भुत आहे. अधिक कठीण आहे. कुठं तरी एम्. एच्या परीक्षेला या गृहस्थानं ' दृष्टान्तपाठ ' वाचला आणि मग त्यातून ' महानुभाव संप्रदाय ' हा त्याचा अत्युत्कृष्ट विडंबनलेख तयार झाला. काव्यशास्त्रातील रससंख्येची निश्चिती ही आम्हा प्राध्यापकांची पेटंट समस्या आहे. दर वर्षाआड आम्ही ' रससंख्या निश्चित करा ' असा प्रश्न विचारीत असतो ! डोक्याला त्रास कमी; हुकमी प्रश्न विचारायचा ! ' प्रक्षोभ ', ' क्रांती ' ' देशभक्ती ' असे आणखीही कित्येक रस नवरसात भरीस घालण्याची अहमहमिका समीक्षकात असते. मग स्थायी, व्यभिचारी, संचारी, आलंबन, उद्दीपन अशी भावविभावाची परिभाषा सुरू होऊन मल्लोमल्ली चालते. पुलंनी अगदी तळटीपांसकट या असल्या विद्वत्ताप्रचुर खोटया लेखनाची बेमालूम थट्टा ' महानुभाव संप्रदाया 'त साधलेली आहे.

## हा तो आश्रमधर्म

' सुसंगत प्रतिमाचित्र ' म्हणजेच साहित्य. विनोदकार चिल्लर गोष्टींची व्याजगांभीर्याशी सांगड घालतो आणि असे प्रतिमाचित्र एक देखणे रूप उभे करतो. विसंगतीतून सुसंगत रूप उभे करतो. साहित्य, मग ते विनोदी असो वा गंभीर असो, सुंदर असलेच पाहिजे! साहित्य हे विशेष्यरूपाने सुंदर वा कलात्मक असते. विशेषणरूपाने बाकी सर्व काही असते. बाकी सर्व काही याचा अर्थ सामाजिक, राजकीय, दलित, मध्यमवर्गीय, राष्ट्रीय, साडेतीन टक्क्यांचे जे काय असेल ते ! कलात्मक वा सुंदर नसेल तर कोणतेही लेखन साहित्यच ठरणार नाही. विनोदी लेखनालासुद्धा सुंदर रूप साधले नाही, तर ते साहित्य ठरणार नाही. तीच गोष्ट विडंबनात्मक लेखनाची आहे. ' गडकऱ्यां 'चे पुनर्मूल्यन नेहमी चालू असते अस्मादिकांनीही ' एकच प्याला ' चा पुनर्विचार केला आहे. कदाचित् मीही एक गिन्हाईक ठरून पुलंचा ' आणखी एकच प्याला ' हा लेख सिद्ध झालेला असेल. मध्यंतरी सौंदर्यशास्त्राची चर्चा भूमितीच्या भाषेत चालू झाली होती. त्रिज्या..

त्रिकोण, अब, कड, विधानं, आणखी कित्येक गोष्टी ! हे अति झालं नि पुलंना हसू आलं. 'एक नवे सौंदर्यवाचक विधान' हा मार्मिक लेख सिद्ध झाला !

मुख्य गोष्ट म्हणजे पुलंची सर्वसंचारी संवेदनशीलता आजतागायत ताजी, टवटवीत राहिलेली आहे. त्यांच्या गद्यविडंबनात मधूनच डोकावणारी पद्यविडंबने याची साक्ष पटवतील! 'बटाट्याच्या चाळी'-तील 'संगीतिके'त डझन-दीड-डझन कविगायकाच्या हुबेहुब नकला येऊन जातात. त्यांतली 'स्त्रीगोते' ही अप्रतिम विडंबनं साधतात. आचार्य अत्र्याना नवकाव्याची नाडी नेमकी पकडता आली नाही, ती पुलंना पकडता आली. त्यामुळं अत्र्यानी 'चारोळचा' म्हणून नवकाव्याची जी विडंबन केली आहेत ती चुटकेवजा वाटतात. उलट 'शांभवी एक घेणं', 'त्याचं व्यवच्छेदक लक्षण' यातील विडंबने आजच्या कविसंवेदनेची नस पकडतात आणि शिवाय त्याच्यात पुन्हा विनोदीवृत्तीचा हातचा मिळविलेला असतो, म्हणूनच ती आस्वाद्य होतात. काही उदाहरणे घेऊन हा विचार अगदी स्पष्ट करतो. 'सहानुभाव सांप्रदाय' मध्ये यादवकालीन चद्रु, दिनकरु, धर्मु अशी 'उ'कारी भाषा महानुभावाच्या धर्तीवर अगदी थेट योजली आहे; पण ते काही केवळ त्या लेखाच्या आस्वाद्यतेचे मर्म नव्हे. पुढील उतारा पहा—

'एकदा जगूभट्ट बहुलीकरें स्वामियें पुशिलें धर्मू अधर्मू या भीतुरीं भेदू कोणता ? स्वामिये भणितलें, हे कुकुडियेंचें अंडें देख। गुरुवासरीही भक्षिजे हा अधर्मू, यज्ञोपवीताचे किल्लियेंने अंडे भेदिजे हा सनातन धर्मू : इतुके बोलोनी शिष्या बृहदायिसें स्वामियेंचे मुखी ओतिलेलें अडे स्वामियें भक्षिलें, कारण तो तर आश्रमधर्मू : शिष्यें पुशिलें हा आश्रमधर्मू कैसा : स्वामिये भणितले : रे मूढा याभीतूरी 'आ' करण्याचेर्चि श्रमु तेधवां तो आश्रमधर्मू : '

येथे भास्करभट्ट बोरीकर, महिदाइसा ही शिष्या यांची नावे विडंबित झालीच; पण 'आश्रमधर्मा'वरील 'आ' करण्याचेची श्रमु ही एकच कोटी खरी बहार करून गेली. शिवाय अंडे आणि यज्ञोपवीताची किल्ली एकत्र येण्यात गंमत आहे ती वेगळीच ! उत्कृष्ट विडंबन हे केवळ विकृतानुकरण नसते. ते फसव्या तार्किक पातळीवर चिल्लर आणि गंभीर याची संगती साधणारे एक रूप असते. विसंगतीतून साधलेली सुसंगती— विनोदी पातळीवरची सुसंगती असते. 'अंगुस्तान विद्यापीठा'च्या माध्यमाचा घोळ पडतो. कारण महाराष्ट्राचा मध्य गोदावरीनदीत येतो. हा मध्य नकाशावर टेप लावून शैपिक पद्धतीने काढला जातो. आता गोदावरीनदीच्या मध्ये तर वस्ती नाही; मग भाषिक माध्यम ठरवायचे कसे ? समित्यावर समित्या नेमल्या जातात, काही निष्पन्न होत नाही. अखेर श्री. वायदे ठराव माडतात, तो कायदेबाज जरतारी भाषेत !

'ज्या पक्षी जी भाषा अगर बोली, अगर दोन्ही अगर ह्यापैकी एक बोलली अगर लिहिली गेली असता बोलणारास अगर लिहिणारास अगर वाचणारास अगर ऐकणारास अगर ह्यापैकी एकाच अगर अनेकास समजली जाईल त्या भाषेस अगर बोलीस माध्यम म्हणता येईल ! इ. इ. यातल्या 'ज्या पक्षी', 'त्या पक्षी,' अगर'ची पुनरावृत्ती ह्यांवर अधिक भाष्य करायला हवे का ?

## मार्मिक, कुरकुरीत !

गांधीनी मोठ्या चळवळी केल्या; पण त्यांच्या चळवळीतून ग्रामगांधीनी कित्येक खुळं माजविली. काका—कालेलकरी आणि सानेगुरुजी छापाची एक खास शैली आहे 'लोकमाता पण सापत्न' मध्ये तिची फर्मास रेवडी उडवलेली आहे ! एकंदरीत गांधीवादातील खुळ हा पु लं. च्या विनोदातील एक पुनरावृत्त होणारा बंध (मोटिफ़) आहे. 'रघुनानांची कन्येस पत्रे' हा त्याचाच एक खास मासला आहे. वर्धा शिक्षण योजना हे असेच एक फॅड येऊन गेले. 'जाल्मिकींचे लोकरामायण' या लेखात त्याची टर उडविली आहे. आजकाल भावना पापडासारख्या कुरकूच झाल्या आहेत. म्हणून क्रमिक पुस्तकातले पाठ बदलले जात आहेत. ते कसे बदलावे याचा खुमासदार गृहपाठ पुलनी जाल्मिकीच्या रामायणात दिला आहे. गांधीची शिक्षणपद्धत सुरू झाली, तेव्हा सारी वर्गातील मुलं टकळीवर सूत काढीत बसलेली असत. कृती आणि ज्ञान याची सांगड घालून समवायी शिक्षण द्यायचं होतं ना ? मग गुरुजी वर्गात आले की, त्यांचा ठराविक प्रश्न असे. तो ते अगदी अहिंसक रीतीनं विचारीत, 'बाळांनो, तुम्ही काय करीत आहा, सांगा बरं !'

'आम्ही सूत काढतोत, गुरुजी'— मुले.

'मग या सुताचं पुढं काय करतात ?'

'खादी.'

'ही खादी प्रथम कोणी शोधून काढली बरं ?'

'महात्मा गांधींनी.'

'मग आपल्या मानवात म. गांधी श्रेष्ठ तसा प्राण्यात श्रेष्ठ कोण बरं ?'

'सिंह !'

'छान, मग आज आपण सिंहाची माहिती मिळवू या !' गुरुजीचा कोणत्याही पाठाला पहिला प्रश्न ठरलेला, 'बाळानो, तुम्ही काय करतांय ?' मुलाचं उत्तर ठरलेलं. 'सूत काढतोत' मग या सुताला धरून गुरुजी यांत्रिकपणं कोणत्याही विषयापर्यंत पोहोचत असत ! या यांत्रिक शिक्षणपद्धतीचं विडंबन 'जाल्मिकीचे रामायण' मध्ये केलं आहे. गुरुजीनी हातातून ऊस आणलेला असतो. मग काही प्रश्नोत्तरे अशी झडतात :—

'रामचद्रा तू सांग मी काय आणलं आहे ?'

'ऊस' राम म्हणाला.

'ऊस !' लक्ष्मण म्हणाला.

'योग्य; परंतु ऊस हा लोकवाणीतला शब्द झाला. देववाणीत उसाला काय म्हणतात, लोकपुत्र भरता—'

'ऊसम्' भरत म्हणाला. शत्रुघ्न हसला, त्यामागून राम हसला म्हणून लक्ष्मण हसला.

'हसू नका ! हसण्याने भावना दुखावतात. रामचंद्रा, उसाला देववाणीत काय म्हणतात ?'

'इक्षु.' राम म्हणाला.

'इक्षु. लक्ष्मण म्हणाला. पुढे वसिष्ठगुरुजींनी तो ऊस वाकवला व विचारले,—

'लोकपुत्रहो, मी आता उसाचे काय केले ?'

'वाकवून दाखवला !' चारी लोकपुत्र म्हणाले.

'इक्षु वाकल्यावर काय होतं ?'

'मोडतो !'

'नव्हे–न मोडता काय होत–?'

'काही होत नाही!' शत्रुघ्न म्हणाला.

'परतु इक्षु आणि वाक यांचं काय होईल ?'

'इक्ष्वाक' राम म्हणाला व मागून लगेच लक्ष्मणही तेच म्हणाला.

'धन्य, धन्य !– आता त्याला 'उ' लावल्यावर काय होईल ?'

'ऊस खराब होईल.' भरतानं उत्साहानं सांगितलं.

'नव्हे ! 'उ' हे अक्षर लावल्यास काय होईल ?'

'इक्ष्वाकु.' राम–लक्ष्मण–भरत व शत्रुघ्न म्हणाले.

'इक्ष्वाकु !!' आपल्या दाढीवरील घाम टिपीत वसिष्ठगुरुजी उद्गारले, 'धन्य !! आज आपल्याला इक्ष्वाकु घराण्याविषयी माहिती करून घ्यावयाची आहे.' त्या टकळीछाप यात्रिक समवायपद्धतीचं इतक मार्मिक विडंबन माझ्या तरी वाचण्यात अन्यत्र आलेल नाही !

ही सारी विडबनं यशस्वीरीतीनं साधायची तर किती प्रकारच्या भाषेच्या तऱ्हा आत्मसात् कराव्या लागतात ! आमच्या समीक्षकाचीसुद्धा गवयाप्रमाणं भाषेची घराणी आहेत. 'हेच त्याचं यश आणि अपयशही.' 'टोक येणे' असे वाक्प्रचार आले की, ते मौजी वा भागवतघराणं ! आता हे जोगी-घराणं पहा :

'कुठल्याही ग्रंथाविषयी लिहिताना ग्रथविषयासंबंधी परीक्षकाने आपले चार शब्द लिहिणे हे विद्वत्संप्रदायास फारसे सोडून नाही, असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही, असे म्हणावेसे वाटते.' वळसे-वेलांटया घेत समतोल राखणे हे जोगीघराण्याचं वैशिष्टय. खाडेकर–मंगळूरकरी घराण्याची ही सांगीतिक संकरयुक्त शैली कशी डौलदार आहे पहा :–

'सुरगाच गाणही काही वाईट झालं नाही. तिच्यात गोहरजानचा ठसका नसला, तरी मोगरीजानचा नखरा होता. जाईबाईचा नखरा नसला, तरी जुईबाईचा ढंग होता आणि चमेलीबाईचा ढंग नसला, तरी बकुळाबाईचा थाट होता. तान दाणेदार नसली, तरी घोसदार होती. आवाजाला लय नसली, तरी टीप होती. उच्चार स्वच्छ नसले, तरी अस्वच्छ नव्हते आणि गाण्यात रंगत नसली तरी साथसगत चांगली असल्यामुळं पुढं-मागं ती एक चांगली गायिका होईल असं दुसऱ्या दिवशी तिच्या घरी चिवडयाच्या बशीत चमचा खुपसता-खुपसता मी तिच्या आईला सांगितलं!'

अशी नाटयाची, सगीताची भाषा तर पुलंच्या अंगीच लागलेली आहे. त्याचा एक पोष्टया इंग्रजी मासिकातले बायांचे फोटो बघतो नि म्हणतो, 'काही काही मडमा तर अगदी अर्ध्या आण्याचा एवढासा स्टँप लावलेल्या बुकपोस्टाच्या कव्हरासारख्या उघडया दिसत होत्या!' के. नारायणी 'स्थाणुत्व-गतिमानता' तुम्हाला तिथं भेटेल. प्रतिभासाधनी भाषा भेटेल, 'भाऊसाहेबांच्या बखरी'च्या धर्तीवर 'भाईसाहेबांची बखर' भेटेल, म्हापणकर ज्योतिषाची भाषा गवसेल, इंग्रजीच्या तऱ्हासुद्धा किती ! पाठारे प्रभू, कारवारी, मद्रासी, खास पुणेरी अशा यच्चयावत् जातवार तऱ्हा त्यात येतात. आम्ही भाषाशास्त्रात निरनिराळया व्यावसायिकांच्या भाषांना 'रजिस्टर्स' म्हणतो. पुलंची नुसती 'म्हैस' घेतली, तर ती मधल्या आळीतला ब्राह्मण, तरुण मलुष्टे वाणी, कॅप्टनशी ऐंलेला चिव्या, बेरकी कुणबी, दमात घेणारा पोलीस अशी किती तरी रजिस्टरे मिळतील. पुलनी आत्मसात केलेली मराठीच्या बोलीची रजिस्टरं हा एक स्वतंत्र व्याख्यानाचाच विषय व्हावा !

## हुकमी एक्का–स्वभावचित्र

पुलचा गद्यविडंबनात जसा विक्रम आहे, तसाच स्वभावचित्रलेखनातही आहे. कोल्हटकर–गडकऱ्यांहून हे त्यांचं एक खास वैशिष्टय. 'अंतु बरवा', 'नारायण', 'रावसाहेब' आणि 'हरितात्या' ही त्यांची एकाहून एक सरस व्यक्तिचित्रे आहेत. बटाटयाच्या चाळीत उपहासउपरोधाला खूप वाव मिळालेला आहे; पण ह्या व्यक्तिचित्रांना स्वयंकल्पित प्रतिमाचित्रांचे–इमेजिसचे रूप प्राप्त झाले आहे. यातील 'नारायण'चा प्रारंभ आणि शेवट यांतल्या विरोधाचा विचार केला, तर पुल हा केवढा मोठा कलावंत आहे–त्याला सौंदर्यरूपाचं सहावं इंद्रिय कसं लाभलं आहे, हे जाणवेल. पन्नास ठिकाणाहून पन्नास प्रकारच्या हुकुमांचे हल्ले झेलणारा नारायण प्रारंभीच दृष्टीस पडतो तिथे दिलेले ते हुकूम जरा नीट वाचून पाहा. प्रत्येक हुकुमामागे व्यक्ती उभी करण्याचं सामर्थ्य आहे. अशी शेपन्नास माणसं, त्यांचा कोलाहल, विवाहसमारंभाची ती तारांबळ, ती लगबग त्या 'नाऱ्या लेका, चहा नाही आला अजून-व्याही पेटलाय !' किंवा 'नारूकाका, चड्डीची नाडी बांद ना ऽऽ–' अशा त्या प्रश्नांच्या सरबत्तीनं मूर्तिमंत साकार झाली आहे आणि तो विरोधानं उठून दिसणारा एकाकी शेवट पाहा :– गोधडीवर नारायणाचं किरटं पोर काळाकभिन्न बुंदीचा लाडू बाळमुठीत धरून झोपलेलं आहे. बाकी सारा मंडप ओस आहे ! आता एका कोचावर नारायण आणि लांब दुसऱ्या टोकाला माडववाल्याचा नोकर घोरत असतात ! पुलंनी जिवंत केलेला 'हरितात्या' तर अविस्मरणीय आहे. त्याची तुलना झाली तर गडकऱ्यांच्या 'धुंडिराजा'शी होईल हास्य आणि कारुण्य यांचा गोफ म्हणजेच ते एक स्वभावचित्र ! त्यात दशावताराच्या आरतीच्या बडया ख्यालाचं वर्णन केलं आहे, ते किती प्रत्ययकारी आहे ! श्रेष्ठ कलावंतालाच जमावं, असं ते आरतीचं तारस्वरात म्हटल्या जाणाऱ्या देव्यांचं शब्दचित्र आहे 'आविक्षितस्य काम प्रे ऽऽ' पासून पुढे कोलाहल थांबतो, त्याचे मुळातले शब्द असे आहेत : 'सभासद इति' हे शब्द पायरी चुकवून धडप्कन निसटल्यासारखे पडतात !' 'भावस्थिराणि जननान्तर सौहृदानि' म्हणतात, तसं कुठं तरी हरितात्यांचं हे बेडंबागडं स्वभावचित्र मनात घर करून राहतं.

पुलंनी उभं केलेलं हे सारं जीवनविश्व मध्यमवर्गीय आहे. तुळशीऐवजी कॅक्टस आलं, त्याचं हरपलं श्रेय जपू पाहणारं आहे किंवा त्यासाठी विव्हळणारं आहे म्हणून ते कमी दर्जाचं आहे, असे म्हणणारे म्हणोत; पण ही कसोटी वाङ्मयीन नव्हे. या बांधिलकीचं स्तोम माजविणाऱ्यांना मी विचारतो, पुलंनी आपले अनुभव लिहिले, खोटे अनुभव लिहिले नाहीत, याबद्दल तुम्ही त्यांचं अभिनंदन करायला हवं ! पण मला याही पुढं जाऊन म्हणायचय की, मध्यमवर्गीय हरपले श्रेय हा काय साहित्याचा विषय नसावा काय ? गाढवावर चांगली कविता करता येते आणि महात्मा गांधीवर वाईट कविता

ह्व्या तेवढ्या मेळ्यातून लिहिल्या गेल्या आहेत. इथं विषयाचं महत्त्व ते काय? शेक्सपिअर तुमचाआमचा कोण? काका का मामा? मराठी शोकान्तिकेला आणि सुखान्तिकेला तो वेळण लावून गेला आहे, ते पुसता येणं कठीण आहे! वन्हा हे आक्षेप गैरलागू आहेत. जोपर्यंत मुलींची लग्नं मनाविरुद्ध होतात, तोपर्यंत 'शारदा' जिवंत आहे! समाजसेवकातला दांभिकपणा, मालकशाहीचा चढेलपणा, वाङ्मयातला बटवटीतपणा हे दुर्गुण समाजातून गेले नाहीत, तोपर्यंत त्याचं विडंबन आस्वाद्य होणारच. मध्यमवर्गात काय हेवेदावे नाहीत? पुलंच्या बटाट्याच्या चाळीत सारं आहे की! जाती–उपजाती साऱ्या भानगडी आहेत. 'असा मी असा मी 'मधला बेबट्या एक साधा कारकूनच आहे ना? त्याची सुखदु:खं प्रत्ययकारी रीतीनं चित्रित झाली असतील, त्याचं 'हरपल तेय' (नास्तेल्जिया) हासुद्धा जर सुंदर रूप घेऊन पुलं उभा करीत असतील तर तो आस्वाद्यच ठरेल. 'न पेलणाऱ्या पगडी 'मध्ये पुल फटकन् मर्ढेकराप्रमाणं म्हणून गेले आहेत, 'मरे एक त्याचा दुजा ब्लॉक पाहे!' जागेच्या टचाईच्या आजच्या काळावर हे चिदारक भाष्य नाही का? त्यामागे माणुसकीची जाणीव नाही. 'लोकमाता पण सापत्न' या लेखात भिकारी आणि कुत्री याच्यात वाहावत आलेल्या खाद्यपदार्थांत रस्सीखेच चालते! 'नरेचि केला हीन किती नर' हेच त्यात चित्रित झाले आहे ना?

## अभिरुचिसंपन्न लेखणी

कोल्हटकर सुधारक होते, सुधारणेच्या प्रचारासाठी त्यांनी विनोदाचा उपयोग केला; पण कोल्हटकराचा हा प्रचारकीपणा कित्येक निबंधाना मारकही झाला आहे. विनोदकारासमोर एक आदर्श इमेज–सत्याभासचित्र असते. त्याहून कुरूप, बेडौल, अतिरेकी काही दिसलं की, त्याला गिऱ्हाईक मिळतं. शहरी सुधारणेतून 'अतिविशाल महिलामंडळं' पैदा होत असतील, तर ती हास्यास्पद होणारच. मी तर म्हणेन की, पुल हे अनुभवाशी प्रामाणिक आहेत. सुधारणेच्या प्रचाराचं जू त्यांनी मानगुटीवर घालून घेतल नाही हा त्याचा गुणच आहे. यंत्रयुगात माणुसकी जपणं किती कठीण आहे, हेच शेवटी पुलंना सुचवायचय!


आता माझ्या दृष्टीनं पुलचा एक मोठा दोष सांगतो. ज्याला इंग्रजीत 'पॉइंट ऑफ व्ह्यू' म्हणतात म्हणजे कथनकाराच्या व्यक्तित्वाचे भान म्हणतात, ते पुलच्या लेखनात कधीकधी सुटतं. व्यक्ती, आणि वल्ली 'मध्ये पुल स्वत: अधूनमधून वल्लीसारखे डोकावतात. उदा. नाथा कामत हे स्वभावचित्र पाहा. बायको हातात बाजारपिशवी देते आणि साखसुरत चार-चौघासारखा संसार करणारा कारकून ही भूमिका या स्वभावचित्रातील कथनकाराची आहे; पण नाट्यसंगीत-चित्रपट इत्यादि हरहुन्नर कलात निष्णात असल्याप्रमाणं त्याचे कित्येक शेरे वाटतात. हा नाथा कामत कोणा शांता गोळेविषयी अर्थात तिच्या गाण्यापेक्षा रूपाविषयी बोलत असतो. त्यावर हा कारकून निवेदक म्हणतो, 'टाचेपर्यंत लांब शेपटा आणि शतशतकातला आवाज याचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता; पण एकाच फिल्मवर दोनदोनदा फोटो काढल्यावर होते तसले ते बोलणे ऐकण्यास मी सरावलो होतो.' 'व्यक्ती वल्ली 'चा निवेदक जेव्हा खुद्द लेखक असतो तेव्हा सारं ठीक असतं. 'कपड्यांच्या जगात नागवा' राहणारा नामू परीटपण धकून जातो; पण जेव्हा कथकभूमिका गोमा गणेश पितळी दरवाज्यासारख्या एखाद्या कारकुनासारखी घेऊन मध्येच पुलचा तल्लखपणा डोकावतो तेव्हा सत्यभासात्मक प्रतिमाचित्राला तडा जातो. 'नदा प्रधान' ही कथा फार गाजली आहे; पण कलात्मकतेत ती मला उणी वाटते. सर्वांना भारून टाकणारी कथा मला खात्री पटवणारी वाटली नाही. नदा एकदम भलताच मोठा तत्त्वज्ञ बनून जातो! मग तो खरा वाटेनासा होतो. त्याची नायिकाही धटिंगण बापाची पर्वा करून जो पडखाऊपणा करते, तो पटत नाही- 'असा मी असा मी' मध्येही 'पण ह्या मी मंडळीचे 'मी' हा शब्द संपल्यानंतर वाक्यात तसे लक्ष राहत नसते. त्यांचा कर्ता, कर्म, क्रियापद, उद्देश्य, विधेय, कर्तरी, कर्मणी, भावे प्रयोग, अव्यय, द्वंद्व, तत्पुरुष, कर्मधारयसमास–थोडक्यात म्हणजे पाणिनी ते दादोबा पांडुरंग (छोटे व मोठे धरून) सारे काही 'मी' या शब्दात संपते' हे जे निवेदन आहे ते कारकून बेंबट्याचे न वाटता व्युत्पन्न पुलंचं वाटतं. (पृ. १४३) त्याच पुस्तकात सरोज खरे या मुख्याध्यापिकेच्या मुलाखतीसबंधातील (पृ. १५५–१५६) शेरेबाजी गरीब बिचाऱ्या कारकून पालकाची वाटत नाही. ती तैलबुद्धीची आहे; पण म्हणूनच प्रतिमेला तडा जातो. कथकभूमिका (पॉइंट ऑफ व्ह्यू) सुसंगत राहात नाही. 'बटाट्याच्या चाळी 'चे चिंतनसुद्धा मला 'जाविदा' उमाळ्याचे वाटते.

तरीसुद्धा हा एक मराठी माणसाला अभिमान वाटावा, असा थोर विनोदकार आहे. कोल्हटकराची गद्य निबंधप्रियता त्यांनी टाळली. गडकऱ्याचा पाल्हाळ टाळला, अत्र्याप्रमाणे विटंबना करणारं चारित्र्यहनन टाळलं. व्याजनाविन्य हेरण्याची तीक्ष्ण निरीक्षण-शक्ती, चौफेर व्यासंग, नाना कलाची परिभाषा हात जोडून पुढं उभी, अतिशयोक्तीची डूब देतानाही ललित आकृतिबंधाचे भान ठेवणारी प्रतिभाशक्ती, माणुसकी, भारतीयत्वाचा अभिमान आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अभिरुचिसंपन्नता हे या लेखकाचे स्पृहणीय विशेष आहेत.

माझ्या आवडत्या लेखकाचं या व्याख्यानाच्या निमित्तानं पुन्हा एकदा पारायण करायला मिळालं याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद आणि महाराष्ट्र ग्रंथालय संघ यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. □

**(सौ. शलाका सोमण यांच्या शब्दांकनावरून)**





हिमालयातील या साध्यासुध्या लोकांनी आपल्या पराक्रमाने आणि निर्व्याज्य प्रेमाने कुठे तरी तार छेडली होती. या साध्यासुध्या लोकांच्या अखंड प्रयत्नातून निसर्ग-रक्षणाचा, निसर्ग-प्रेमाचा एक स्रोत हिमालयात उगम पावला होता. आता आम्हाला आमच्या अथक प्रयत्नांतून–पराक्रमातून या स्रोताला साथ द्यायची होती. गंगौघ घडवायचा होता.

# प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची !

जगदीश गोडबोले

लेखांक – सातवा

रामपूरहून खाडीला परत येऊन अदवानी गावाकडे निघालो. अदवानी दूर डोंगरात सुमारे पाच हजार फुटांवर. रस्ता अतिशय कच्चा आणि अरुंद. एका वेळी जेमतेम एक गाडी जाऊ शकेल एवढा; पण ड्रायव्हर बिंदास गाडी हाकत होता. समोरून गाडी आली की, खरंकन् ब्रेक मारायचा. मग जागा–वळण जसं असेल तसं हा किंवा तो ड्रायव्हर गाडी मागे–पुढे काढायचे, पासिंगच्या तेवढ्या धालमेलीतही एकमेकांना रामराम–सुख-दुःखाचा एखाद–दुसरा शब्द झाडायचा की रस्ता धरायचा ! ड्रायव्हर, तसे आतले पब्लिक आणि कंडक्टरही बिंदास ! मुंबईचे पब्लिक जसे 'आदतसे मजबूर' म्हणून डब्यात भरपूर जागा असतानाही लोकलला लोंबकळतात, तसे इथले पब्लिक आत जागा असली तरीही वर टपावर जाऊन बसतात ! बस जीवनमरणाच्या सीमेवर वळणं घेत असते, रस्ता खराब असेल तर यथेच्छ डोलत असते; पण कंडक्टर पठ्ठ्या मात्र चालत्या गाडीमध्ये खालून वर आणि वरून खाली लीलया फिरून पॅसेंजरसंकडून तिकिटांचे पैसे वसूल करत असतो. सुरुवाती–सुरुवातीला आपल्या जिवाचो प्रचड घालमेल होते. खाली आ वासलेली दरी आणि बाजूला 'आत्ता पडतो' म्हणणारा डोंगर ! त्यातून एकदा मी आणि पापा टपावरून प्रवास करताना बाजूचा पॅसेंजर ब्रेकस् फेल झाल्याच्या दर्दभऱ्या कहाण्या सांगू लागला. आमची पळता भुई थोडी ! बाकी हे टपावर बसून, विशेषतः लोकलच्या टपावर वा खिडकीवर उभे राहून प्रवास करण्याचा 'शोध' ज्याने लावला त्याला आपण कोलंबस वा वास्को–द–गामापेक्षा जास्त मानतो !

अदवानीला साल–भीमल–चीड आदि वृक्षांचे सुंदर जंगल आहे; पण हे जंगल असं सुखासुखी टिकलेलं नाही. इतर जंगलांप्रमाणे

याचेही मुंडन होणार होते; पण अदवानी व आजूबाजूच्या गावातील लोकांनी कडवा प्रतिकार करून आपले हे जंगल वाचवले. दुपारी गावकरी आम्हाला साल–चीडच्या रानात घेऊन गेले आणि आपल्या लढ्याची कहाणी त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितली.

### आज हिमालय जागेगा क्रूर कुल्हाडा भागेगा !


एका जंगल–ठेकेदाराला अदवानीच्या जंगलातील ६४० चीड व सालची झाडं तोडायचा परवाना मिळाला होता. त्याप्रमाणे झाडावर मार्किंग (निशाण्या) करायला सुरुवात झाली. गावकऱ्यांना हे समजताच त्यांनी विरोध दर्शविला. सुंदरलालजी–प्रताप शिखर आदि कार्यकर्ते तिथे पोहोचले. झाड तोडल्यामुळे गावाचे काय नुकसान होईल हे त्यांनी वन–अधिकारी, वन–ठेकेदाराला समजावून देण्याचा प्रयत्न केला; पण ते हट्टाला पेटले होते. झालं. सशस्त्र राखीव दलाचे शंभर जवान बंदुकी पारजत मुख्य रस्त्यावरून जाजलला दाखल झाले. लोकांना डोस देण्यासाठी त्यांनी जाजलच्या रस्त्यावरून जोरदार परेड–बिरेड केली. १ फेब्रुवारी १९७७ ला हा सगळा काफिलां अदवानीच्या जंगलात पोहचला. आजूबाजूच्या परिसरातील हजार–बाराशे स्त्री–पुरुष, लहान पोरं आपलं जंगल वाचविण्यासाठी निधड्या छातीने जमा झाले होते. घोषणा गर्जत होत्या–

**भले कुल्हाडी चमकेगी**
**हम पेडोंसे चिपकेंगे**
**आज हिमालय जागेगा**
**क्रूर कुल्हाडा भागेगा !**

नुसत्या घोषणा नाहीत, तर ठेकेदारांचे मजूर झाड तोडायला गेले की, बायका–पोरं झाडाला फटाफट मिठ्या मारून बसत ! तास–दोन तास ही धमाल चालली होती. पोलिसांनाही काही करता येईना. कारण असल्या रानात इतक्या लोकांना – तेही बहुसंख्य बायका–पोरांना अटक करून घेऊन जाणं मुश्कील होतं. शिवाय बळाचा वापरही मुष्किल. कारण लोक निःशस्त्र होते आणि घोषणा देत होते– ‘हमला चाहे जैसे होगा। हाथ हमारा नहीं उठेगा !’ एवढंच नाही तर ‘पोलिस हमारे भाई–भाई। उससे हमारी नही लडाई ’चे नारेही उठत होते. नैतिक ताकद व डावपेच या दोन्ही बाबतीत सरकार कमजोर पडलं होतं. अखेर त्याने ‘सन्माननीय माघार’ घेतली ! जाता–जाता काही भाईबंद पोलीस गावकऱ्यांचे अभिनंदन करायला विसरले नाहीत !

### अभिनव रक्षाबंधन

‘चिपको’ प्रमाणे लोक–जागृति करणाऱ्या आंदोलकांच्या आयडियाही नामी आहेत. कापण्यासाठी झाडावर मार्किंग झाल्यापासून प्रत्यक्ष झाडे कापीपर्यंत पाच-सहा महिन्यांचा कालावधी जातो. अगोदर लिलाव जाहीर होतात. लिलाव रोकण्यासाठी आंदोलक निदर्शने करतात. मग ज्या झाडांवर ‘निशाणी’ (मार्किंग) झाले असेल, त्या झाडांना गावोगावच्या बायका मिरवणुकीने जाऊन ‘राखी’ बांधतात. आपले रक्षण करणाऱ्या बंधुराजाचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यासाठी. गफलतीने काही झाडे तुटलीच, तर त्या झाडांना सद्‌गति मिळावी म्हणून ‘चिपको’ वाले जंगलात तिथल्या तिथेच



**‘चीड’चे घायाळ झाड**

श्रीमद् भागवताच्या सप्ताहाला सुरुवात करतात. भाविक बायकांची तोबा गर्दी लोटते. मग ‘दशकूप समावापि दशवापि समोह्रदः। दशह्रदः समःपुत्रो, दशपुत्रो समो द्रुमः’ आदि भागवत-अग्नि पुराणातले दाखले देत, भागवतकार जंगलाचे महत्त्व, त्याचे रक्षण करण्याचे मार्ग याचे निरूपण करतात. आदवानीचे जंगल वाचल्याबद्दल गावकऱ्यांनी भागवतसप्ताह केला होता. अक्षरशः शेकडो लोक सप्ताहाला लोटले होते. श्रीमती इंदुताई टिकेकरांचा भागवत–सप्ताह फार लोकप्रिय आहे. कधी घनःश्याम रतौडी या लोकप्रिय कवीची गाणी हुडक्यावर (पहाडी वाद्य) दऱ्या-खोऱ्यात घुमतात. चीडची राळ काढण्यासाठी त्याला ठराविक लांबी-रुंदी-खोलीचे मोजके घाव घालायचे असतात; पण लोभी ठेकेदार झाडाच्या उरी–पोटी आणि तेही भारंभार घाव घालून झाडाचा जीवच धोक्यात आणतात. अशा झाडाचे घाव फेकून देऊन, आंदोलक झाडांना चिखल पाण्याची मलम-पाणी करून पट्टी बांधून ठेवतात. सुश्रूषेचे–आपलेपणाचे प्रतीक म्हणून ! अलमोरा–नैनितालच्या साम्यवादी आंदोलक–मित्रांचा भागवत–राखी आदि प्रकारांवर राग दिसला. झाडाला राखी बांधून क्रांती होत नसली हे सत्य असले, तरी अशा कल्पकतेने बाया-माणसं वन–संरक्षणाला, पर्यायाने आंदोलनाला बांधली जातात ही गोष्ट तेही नाकारू शकत नव्हते !

### जंगलावरील बलात्कार

उत्तराखंडात चीडच्या झाडापासून 'लिसा' (राळ) जमा करण्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. अनेकाचे अनेक प्रकारे हात त्यामध्ये गुंतलेले किंवा बरबटलेले आहेत. चीडच्या झाडाला इजा न होता सातत्याने राळ मिळत रहाण्यासाठी काही ठराविक 'लांबी–रुंदी–खोली'चे (१०" × ४" × १") घाव घालायचे असतात. कंत्राटदाराकडे हे काम सोपवले असले तरी वन–खात्याने त्याच्याकडे लक्ष ठेवायचे असते; पण वन–खाते आणि कंत्राटदार संगनमताने वारेमाप घाव घालून सोन्याचं अंडं देणारी कोंबडीच कापून खात आहेत अशी लोकांची तक्रार होती. वारेमाप घावानी कमजोर झालेली चीडची झाडे साध्यासुध्या वाऱ्याने मोडून पडत आहेत असं लोकांचं म्हणणं होतं. काही ठिकाणी 'चुकून' जास्त घाव घातले गेले असं सुरुवातीला मानभावीपणे वन–खात्याने कबूल केलं तरी आंदोलकानी सरकारला जेव्हा 'लिसा जाँच समिति' नेमायला लावली तेव्हा अनेक धक्कादायक गोष्टी बाहेर आल्या. 'राष्ट्रीय वन–अनुसंधान संस्थेचे सध्याचे अध्यक्ष श्री. कृष्णमुरारी तिवारीचीच ती एक–सदस्य समिती होती. त्यांनी आपल्या अहवालात निःसंदिग्धपणे लिहिले आहे, 'चक्राता, यमुना व टॉनस् वन–विभागातील झाडाची पहाणी केल्यानंतर असं आढळून आलं की, घावाची संख्या आणि आकार या सर्वच बाबतीत शभर टक्के गैर–प्रकार घडले आहेत...आम्ही कुठेही गेलो तरी संबधित वन–अधिकारी असे एकही झाड–एकही घाव दाखवू शकला नाही की; जो नियमानुसार घातला गेला आहे! काही प्रकार तर इतके भयानक होते की, त्याची आम्ही कल्पना पण करू शकलो नसतो! उदा. दोन घावांमध्ये फक्त एक सेंटिमीटर अंतर ठेवणे! रस्त्याजवळच्या जंगलामध्ये ही स्थिती तर आत जंगलात काय हालत असेल... 'जंगलावरचा बलात्कार' याशिवाय त्याला दुसरे शब्द नाहीत!'

अदवानीची एकूण वस्ती चाळीस कुटुंबांची. त्यातील सहा हरिजनांची, दोन ब्राह्मणांची, बाकी राजपुताची. प्रत्येक जातीची वस्ती जवळपास; पण अलग-अलग. जातिभेद फारसे पाळले जात नाहीत; पण काही वेळा छोटया-छोटया गोष्टींतून प्रतीत होतात. आम्ही गावच्या सरपंचाच्या घरी गप्पा मारत बसलो होतो. एवढयात त्यांचा मुलगा प्रेमसिंग घाई-घाईने जाताना दिसला. विचारलं तर म्हणाला, 'गावात एकाची म्हैस मेली आहे आणि आमचा रिवाज आहे की, सर्वांनी मिळून ती उचलून टाकायची.' आम्ही सहज विचारलं, 'हरिजनाकडचं जनावर मेलं तर सर्वजण जमून टाकतात का?' उत्तर मिळालं. 'त्यांचं त्यांनी टाकावं!' अर्थात् माणसाच्या महायात्रेच्या वेळीही जात आडवी येते, तर जनावरांच्या वेळेला काय!

मेलेल्या म्हशीवरून आठवण झाली. चंद्रपूर जिल्ह्यातील भमरागड या आदिवासी भागात श्री. बाबा आमटे यांच्याबरोबर कांदोडी या गावी आम्ही मुक्कामाला होतो. गावच्या विहिरीजवळ एक हल्या (रेडा) मरून पडला होता. हळूहळू दुर्गंधी पसरायला सुरवात झाली होती. विहिरीचे पाणीही दूषित होण्याचा धोका होता म्हणून आम्ही हल्याच्या मालकाला हल्या दूरवर नेऊन गाडायला दोन-तीनदा सांगितले. तो आपला आत्ता नेतो–मग नेतो म्हणत होता. शेवटी आम्ही तो मुडदा जीपला बांधला आणि फरफटत दूर जंगलात नेऊन टाकला. दुसऱ्या दिवशी रेड्याचा मालक फणफणत आला आम्ही त्याची एवढी डोकेदुखी दूर केली तरी हा आमच्यावरच का संतापला हे सुरुवातीला लक्षात येईना; पण नंतर लक्षात आलं– 'रेडा माझ्या शेतात राब-राब राबला. आता मेल्यानंतर मी त्याला उचलून इतमानाने नेऊन गाडणार होतो. त्यासाठी लोक बोलावले होते आणि तुम्ही त्याला असं कृतघ्नपणं फरफटत नेलं! काही माणुसकी तुमच्यात–'

काय बोलणार?

### बगाने शादीमे ऽ

अदवानीला खबर लागली, खालच्या गंगसारला दुल्हन घेऊन बारात परत आली आहे. गाव–जेवण आहे, नाच आहे. चलो! आम्ही काय, बेगाने शादीमे अब्दुल्ला दिवाना! आमची घोडी गंगसारकडे! चीड–सालचे घनदाट जंगल, पहाडातील मस्त विझती संध्याकाळ, उगवणारा पुनवेचा चाँद आणि बारातीचा मूड! परिणाम अटळ होता–रस्ता चुकणे! रस्ता चुकला आणि मस्तपैकी भरकटत निघालो. जंगलात एक तर सगळ्या वाटा सारख्या वाटतात आणि कातरवेळचं असं अनोखं जंगल आणखीनच भुलभुलैयाचं! प्रत्येकजण आत्मविश्वासाने वाट शोधून काढत होता आणि भलत्या-भलत्या ठिकाणी नेऊन पोहोचवत होता. खरंच, जंगलामध्ये वाट हरवण्यासारखं सुख नसतं! मी हा आनंद पुरेपूर लुटला आहे भमरागडच्या जंगलात, बस्तरच्या जंगलात. भमरागडच्या जंगलात तर आग्या मधमाश्यांनी उभा फोडला होता. धावपळीत पाय सुजला होता. अंगावरच्या कपडयांच्या चिंध्या झाल्या होत्या आणि अस्वलोबा कधी गुदगुल्या करायला येतील याची शाश्वती नव्हती! लेकिन उसमे भी मझा आया. जंगल काय किंवा जीवन काय वाटा चुकून सापडतात! परत हरवण्यासाठी!

### मन्नाट मन्नाड

नेहमीप्रमाणे आमची घोडी वरातीमागून गावात पोहोचली; पण विशेष काही बिघडले नाही. खुल्या हवेत भात–वालाची आमटी आणि गोड भाताचे भरपेट आग्रहाचे जेवण झाले आणि जरा आराम करेतो बाराती नाचासाठी–'मन्नाड' साठी बोलवायला आली. आम्हाला ओळख–पाळखीची विशेष अडचण यायचीच नाही. शिवाय आमच्यातील अंजली आपल्या लाघवी स्वभावाने जाईल तिथे फटाफट दोस्ती करायची! अगदी कडेवरच्या पोरीपासून ते ऐंशी वर्षांच्या बूढीपर्यंत अंजली 'देवी' सर्वांची मैत्रीण बनायची! भाषेचा वांदा आम्हाला कोणालाच यायचा नाही. कारण 'बेधडक भाषा' ही सर्वांत उत्तम भाषा हा आमचा ठाम विश्वास आणि 'मन्नाड'सारख्या मन्नाट नाचाला तर भाषा नाहीच! पोटभर मन्नाड नाचलो. असं आता किंवा आदिवासींबरोबर मस्त नाचायला लागलो की जाणवतं पांढरपेशा नागरी समाज किती प्रचंड सुखाला पारखा झाला आहे तो! बस्स संकोचाची, लाजे–काजेची दोन पावलं ठोकरून लावायची की ताला–सुराची–बेहोषीची दुनिया तुम्हाला मिठीत घ्यायला उत्सुक असते!

गंगासारहून खाडीला परतून सामान–सुमान घेऊन टेहरीला

जायचं होतं; पण आज धुलवड ! प्रतापनं सांगितलं टेहरी आणि खाली खाडीमध्ये पण धमाल असेल. जरा सबुरीने दुपारी गावात पोहोचूया ! धूलवडीचा शौक आम्हालाही होता; पण हिमालयातील या थंडीत आणि तेही अधूनमधून पाऊस पडत असताना चिखल–पाणी–रंगाची आरपार धूलवड खेळण्याची जिगर आमच्यात नव्हती. आम्ही गुपचुप पहाडामध्ये वेळ काढला आणि दुपारी गडबड कमी झाल्यावर खाडीला परतलो. मात्र वाटेत एक नदी आडवी आल्यावर प्रदीप–गोरख या पठ्ठेबहादुरांनी त्या थंडीतही आपली आंघोळीची–पोहोण्याची हौस पुरी करून घेतली !

छोट्या हेवलिकेचा निरोप घेऊन अकरा मार्चला सकाळी आम्ही टेहरी गावाकडे रवाना झालो. टेहरी हे टेहरी–गढवाल जिल्ह्याचे मुख्य ठाणे आणि या भागातील एक प्रमुख बाजारपेठ. भिलंगना आणि भागीरथीच्या संगमावर ते वसले आहे. आता एका प्रचंड धरणाखाली त्याला जलसमाधी मिळणार आहे. टेहरीला प्रामुख्याने त्याचीच माहिती घ्यायची होती.

**Small is beautyful, but big is wonderful !**

भागीरथी–अलकनंदेच्या (गंगा) पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी सरकारने एक 'मास्टर प्लॅन' बनविला असून टेहरी, मनेरी, विष्णु–प्रयागसारख्या सुमारे ४२ जल–विद्युत व पाटबंधाऱ्यांच्या योजनांचा त्यात समावेश आहे. त्यामुळे सुमारे ५००० मेगॅवॅट विद्युत–निर्मिती होईल व ३·४×१०⁶ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. टेहरी–बांध (धरण) टेहरी गावाजवळच होणार आहे आणि २४६ मीटर उंची असलेल्या या प्रचंड धरणातून ६००मेगॅवॅट वीज मिळेल व२·७०लाख हेक्टर जमिनीला पाणी मिळणार आहे. या प्रचंड धरणाचे प्रचंड फायदे सकृतदर्शनी दिसत असले तरी स्थानिक लोकांचा धरणाला जोरदार विरोध आहे. 'टेहरी–बांध विरोधी संघर्ष समिती' स्थापून लोकांनी आपला लढा जारी ठेवला आहे. अ‍ॅड. वीरेंद्र सकलानी समितीचे अध्यक्ष आहेत आणि पेशाने वकील असलेल्या या माणसाने धरण-प्रश्नाचाच एकूण अभ्यास करण्यासाठी खूप परिश्रम घेतल्याचे त्यांच्याशी बोलताना जाणवले. टेहरीच्या धरणाला पुढील करणांसाठी समितीचा विरोध आहे–

(१) टेहरी–धरणाची जागा भूकंपक्षम कक्षेत येते व तेथील भू–भौतिक परिस्थिती (भूकंप अभियांत्रिकी परिस्थिती) गुंतागुंतीची आहे. टेहरी धरणाची जागा कांगडा भूकंपाच्या ७ व ८ भूकंपरेखामध्ये मानली जाते. १९०५ मध्ये झालेल्या कांगडा भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ८·० इतकी होती व ही तीव्रता फार मोठी मानली जाते. (कोयनेचा १९६७ चा भूकंप ६·७ तीव्रतेचा असूनही केवढा हाहाःकार उडाला होता आणि तेही कोयना दख्खनच्या काळ्या पत्थरावर वसलेले असूनसुद्धा !)

एखादी जागा भूगर्भदृष्ट्या मजबूत असेल तर ती भूकंपकक्षेत असली तरीही धरण बांधता येते. उदा. रशियातील न्यूरेक धरण; पण टेहरीमध्ये तशीही परिस्थिती नाही.

(२) भागीरथीनदीच्या पात्रातील अनेक खडकांमध्ये ओपन जॉइंटस्–भूदोष असलेले पट्टे आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी झिरपून धरणाला धोका उत्पन्न होईल.



पोरीपासून म्हातारीपर्यंत सर्वांची मैत्रीण – अंदलीदेवी

(३) भूस्खलन आणि भू–क्षरणामुळे धरणाला कल्पनातीत धोका आहे आणि धरण फार अल्पायुषी ठरणार आहे.

मोठ्या धरणाचा अभ्यास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय मंडळाने १९७३ मध्ये केलेल्या एका पहाणीनुसार जगातील विविध भागात बांधलेल्या १०,००० धरणांपैकी ४६६ धरण – अपघात झाले, १४० धरणे संपूर्ण फसली आणि प्रचंड नुकसान झाले, उदा. पेरूमधील फायल आर्च धरण, स्पेनमधील दी व्हेगा–टेरा धरण, भारतातील पानशेत, मोरवी इत्यादि दुर्घटना ताज्या आहेत. टेहरीचे धरण एवढे प्रचंड आहे की, दुर्दैवाने काही दुर्घटना घडलीच तर गंगेच्या काठचे सर्व जीवनच उध्वस्त होईल अशी भीती वाटते. हिमालयातील विशिष्ट भूगर्भपरिस्थितीमुळे आणि बेसुमार जंगलतोडीमुळे भागीरथीच्या पात्रातील भूक्षरणाचे प्रमाण प्रचंड आहे, त्यामुळे करोडो रुपये खर्चून (१९७४ च्या हिशोबाप्रमाणे ३०५ कोटी रुपये) बांधण्यात येणारे हे धरण अल्पावधीतच अक्षरशः गाळात जाईल !

४) धरणामुळे हजारो एकर उपजाऊ जमीन पाण्याखाली जाणार आहे. ७०,००० पेक्षा अधिक लोकांना स्थलांतर करण्याची वेळ येणार आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी 'डून' दरीतील मौल्यवान जंगल नष्ट होणार आहे.

श्री. सकलानींव 'समिती'ची भूमिका केवळ नकारात्मक नाही, तर एका प्रचंड धरणापेक्षा छोटी-छोटी धरणे बांधली जावीत, कुठे बांधली जावीत याबाबत त्यांनी सरकारला अनेक पर्याय सुचवले आहेत. पण 'छोटे सुंदर असले तरी मोठे महाविलक्षण असते. (Small is beautiful, but big is wonderful !) अशी आपली एकूणच धारणा असल्यामुळे लक्षात कोण घेतो !

पण हा केवळ एका टेहरी धरणाचा किंवा लहान-विरुद्ध मोठी धरणे एवढाच प्रश्न नाही तर एकूणच आपण या प्रश्नाला डोळसपणे सामोरे जाणार की नाही असा प्रश्न आहे! राष्ट्राचा विकास म्हणजे प्रचंड धरणे-रस्ते-कालवे-कारखाने इत्यादी दृश्य स्थावर-जंगम मालमत्ता असं साधं सुटसुटीत समीकरण आपल्या मनानं पक्कं बसलेलं असतं. पण विकास खरोखरचा किती शाश्वत-निरंतर आहे, विकास कोणाचा, कोणाच्या जिवावर, काय किंमतीला या प्रश्नांचा आपण फारसा विचार केलेला नसतो. शिवाय विकास आणि पर्यावरण यांचा परस्पर-संबंध काय, त्यांच्यात अंगभूत विरोध आहे की सुसंवाद आहे, आर्थिक-भौतिक विकासासाठी पर्यावरणाचा विनाश अपरिहार्य आहे काय, पर्यावरण-रक्षणाची तथाकथित 'चैन' भारता-सारख्या गरीब देशाला परवडणार आहे का याचाही आपण फारसा विचार केलेला नसतो; पण आपण विचार केलेला नसला म्हणून निसर्ग-चक्र, समाज-चक्र फिरायचे थांबत नाही.

आज भारतात आणि महाराष्ट्रात अनेक प्रचंड धरणे बांधली जात आहेत. प्रत्येक ठिकाणी जंगल आणि आदिवासी गावे पाण्या-खाली जाणार आहेत. जंगल आणि वनवासी-आदिवासी गावे नेमकी धरणभागातच येतात हा जसा इतर समाजाचा दोष नाही, तसाच तो त्यांचाही गुन्हा नाही. धरण-प्रकल्पाच्या नफा-तोटयात आपण या सामाजिक, पर्यावरणाच्या समस्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणार आहोत की, त्या 'गृहीत' धरणार आहोत हा खरा सवाल आहे!

अ‍ॅड. सकलानींनी अगदी पोट-तिडकीने धरणासंबंधीची सर्व माहिती दिली. नंतर जंगलासंबंधीची माहिती घ्यायला तेथील वन-निगमाचे मुख्य अधिकारी श्री. विष्ट यांची भेट घेतली, त्यांनी मात्र निराशा केली. 'वन-निगमा'ची स्थापना म्हणजे 'चिपको' आंदोलनाला सरकारने दिलेला प्रतिसाद आहे. त्यामुळे मजुरांचे शोषण थांबले आहे वगैरे ढोबळ माहिती त्यांनी दिली; पण वन-संवर्धनाबद्दल काय योजना आहे याची माहिती वा तपशील ते देऊ शकले नाहीत.

टेहरीला अचानक श्री. विभूते नावाच्या मराठी माणसाची गाठ पडली. ते तेथील कॉलेजचे प्राचार्य आहेत. अशी उंबरठ्याबाहेर पड-लेली मराठी माणसं भेटली की मनस्वी आनंद होतो. श्री. विभूत्यांचे कॉलेज मात्र पत्र्याच्या शेडमध्ये आहे. कारण काही पक्कं बांधकाम करायचं म्हटलं की लगेच विचार येतो हे सगळं पाण्याखाली जाणार तर उगीच खर्च का? केवळ कॉलेजच नाही तर संपूर्ण टेहरी गावा-वरच अनिश्चिततेची एक उदासवाणी छाया दाटलेली जाणवली. देशोधडीला लागलेल्या माणसाला कुठे तरी आशा असते, आपल्या भूमीत परतायची; पण रहाते घर वा गाव अथवा काळया आईची साथ-संगत अशी कायमची सुटणाऱ्या माणसाचे दु:ख आपल्याला कधीच कळायचे नाही!

टेहरीहून श्री. सुंदरलालजींचे सिल्यारा गाठले. बालगंगेच्या किनारी एका उभ्या टेकाडावर त्यांचा देखणा 'नवजीवन आश्रम' आहे. चीडच्या मुग्ध रानात हरवलेला श्री. सुंदरलालजी वन-जागृतीसाठी काश्मिर ते कोहिमाच्या पदयात्रेवर होते; पण श्रीमती विमला बहुगुणाजी व त्यांच्या आश्रमशाळेच्या विद्यार्थिनींनी आमचे प्रसन्न स्वागत केले. विमलाजींची शांत-सोज्ज्वळ-प्रसन्न मूर्ती पहाताना सारखी साधनाताई आमटयांची आठवण यायची. तसेच एक तेवते व्यक्तिमत्त्व. शांत-निरामय. पण साधनाताईंना बाबांचा निदान खूपसा सहवास तरी लाभतो; सुंदरलाल ही मनस्वी घुमक्कड वल्ली पाठीवर पिठ्ठू (रुकसॅकला त्यांचा आवडता शब्द) टाकून देशभर दौरे करत असते, उपोषणे करत असते आणि या सिल्याराच्या पहाडा-वर आश्रमाची, कामाची, आल्या-गेल्याची सर्व उस्तवार शांत समर्थपणे सांभाळत असतात. या आमटे, बहुगुणा वा आरोळे अशा-सारख्या मंडळीचे अप्रूप वाटतं. कामाच्याबरोबर ते आपल्यासारख्या येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांची आघाडी किती सहजतेने पेलतात! आमटे मंडळीशी कितीही मतभेद झाले आणि स्वतंत्र विचाराच्या कोणत्याही व्यक्तीचे ते होणे अटळ आहे, तरी मध्यरात्री पोहोचले तरी साधनाताई कामाच्या, पाहुण्यांच्या प्रचंड व्यापातूनही आपल्याला ऊन-ऊन पिठलं-भात खायला घालणार, जेवणाच्या शेवटी आपल्या आवडीची-दही-साखरेची वाटी हळूच पुढे करणार याची खात्री असते.

सिल्याऱ्याच्या आश्रमाच्या या नितांत-रमणीय परिसरात मी खूप भटकलो आहे. दऱ्या-खोऱ्या, रावा-पाखरं यांचा खूप आनंद लुटला आहे; पण अनुभवलेल्या एका प्रसंगाची जखम अजूनही सुकलेली नाही. अजूनही सलते आहे-मी, पापा आणि अशोक पहिल्यादा इथं आलो तेव्हाची!

## कोसळणाऱ्या हिमालयातील आभाळाला भिडणारा दलीबसिंग!

सिमाऱ्या - घनसालीच्या पहाडी मुलखात प्रताप शिखरला घेऊन मुशाफिरीला सुरुवात केली होती. बालगंगेला डावीकडे ठेवून पहाड चढत आठ हजार फूट उंचीवरील लस्यालगावला पडाव ठोकायचा होता. तिथला ग्रामप्रधान दलीबसिंह एके काळचा ठेकेदार; पण आता आंदोलनाचा खंदा पाठीराखा असल्याची माहिती समजली होती.

दलीबसिंह प्रधानाच्या प्रशस्त वाड्यावर गेलो तेव्हा पाहुण्यांच्या स्वागतासाठी गावकरी जमले. चहा-हुक्का झाला; पण वातावरणात काही तरी तणाव दिसत होता. जाणारा-येणारा वाड्यापाशी थांबून काही तरी कुजबुजत होता मुख्य म्हणजे आम्हाला येऊन अर्धा-पाऊण तास लोटला तरी दलीबसिंह भेटायला आला नव्हता. त्यामुळे जरा अवघडल्यासारखे झाले होते. इतक्यात दलीबसिंह बाहेर आले आणि हसतमुखाने स्वागत करून म्हणाले, 'बेटी की तबियत कुछ ठीक नही है, जरा उसके पास बैठा था। चलिये उपर चलके आराम कीजिये!' दलिबसिंहबरोबर आम्ही वर वाड्यात गेलो. प्रशस्त लाकडी वाडा, समोर ऐसपैस सज्जा आणि अंधारात निवत जाणारे

आजूबाजूचे दऱ्या-डोंगर. आमचे सामान आवरेपर्यंत प्रताप आणि दलित्र खालच्या आवाजात काही तरी बोलत होते. मुलीला 'शनिपात' झाला असून गेले तीन-चार दिवस ती बेफाम झाली होती. एवढे अंधुकसे आम्हाला समजले. थोड्या वेळाने प्रताप दानाची-त्या मुलीची-खबरबात घ्यायला गेला. 'दाना' नवजीवन आश्रमाच्या शाळेत शिकलेली. आंदोलनात जोरदार हिस्सा घेतलेली, साहजिकच प्रताप तिच्या चांगल्या परिचयाचा होता. प्रताप गेला आणि एकदम गंभीर चेहऱ्याने अशोकपपाला बोलवायला माघारी आला. या दोघांना डॉक्टरकीमधली बऱ्यापैकी गति होती. आम्ही बरीचशी औषधेही आणली होती. अशोकपपा गेले आणि घाईघाईने परत येऊन पपा काही तरी घेऊन गेला. सगळ्यांनी गर्दी करणे चांगले दिसणार नाही म्हणून मी त्या मुलीच्या खोलीत नुसता डोकावून आलो. खोलीत परत येऊन अंथरुणावर पडून राहिलो. प्रकरण किती गंभीर आहे याचा अंदाज येत नव्हता. हळूहळू बायकांचा कोलाहल वाढल्याची जाणीव झाली. अस्पष्ट हुंदके ऐकू येऊ लागले आणि अचानक 'दाना ऽऽ' म्हणून कोणी तरी काळीज कापीत जाणारी आर्त किंकाळी मारली! अंधारात ठेचकाळत मी त्या पलीकडच्या खोलीत पोहोचलो. बापाच्या मांडीवर डोके ठेवून दाना विसावली होती. निस्तेज चेहरा, शून्य नजर! अशोकच्या हातात पाण्याचा ग्लास होता. त्याने नजरेनेच खुणावले, 'कारभार आटोपला आहे!' आम्ही सुन्न मनाने खोलीत येऊन बसलो. बाहेर आक्रोश वाढत होता. बायका कपाळ बडवून घेत होत्या. लहान-लहान पोरी-बाळी ओक्साबोक्सी रडत होत्या. आम्ही आलो काय आणि घटकाभरातच हे सर्व झाले काय, आमचे आम्हालाच समजत नव्हते. आता अशा परिस्थितीत घर सोडताही येत नव्हते आणि तिथे राहताही येत नव्हते. खोलीचे दार लोटून घेऊन आम्ही तिथेच कसे तरी आडवे झालो. दिवसभराच्या वाटचालीने अगोदर सपाटून भूक लागली होती; पण आता तहान-भूक काय कशाचीच इच्छा नव्हती. मृत्यूच्या या अचानक दर्शनामुळे, जीवन-मृत्यूचे घुसमटणारे विचार मन बेचैन करीत होते. महिन्यापूर्वी लग्न झालेली दमयंती हाताचा मेहंदी वाळायच्या आत सारा सारीपाट उधळून गेली होती; दोन-तीन दिवसाच्या मामुली दुखण्यातून इतके हे क्षणभंगुर जीवन कापरासारखे भरंकन् उडणारे आणि हे सुख दुख एकाने दुसऱ्याकरता केलेले. या अखेरच्या क्षणी कोणी-कोणाचा असण्याचा तरी अर्थ काय असतो? ज्याचा तो एकटा असतो. जाणारा-उडणारा-उरलेलाही जाणारच असतो. फक्त जागा बदलायच्या असतात......

'भाईसाहब, उठिये, खाना तयार है।' कोणी तरी हलवून उठवत म्हणत होता. प्रथम वाटलं भास झाला. नंतर अधारात डोळे फाडून बघितलं. दलीबसिंह आम्हाला जेवायला उठवत होता. आमची खाण्याची वासना पार मेली होती. आम्हाला भूक नाही, आमची फिकिर करू नका असं आम्ही वारंवार सांगितलं तरी, 'आप थके हुअे हैं, खाली पेट सो जायेंगे तो हमे बहुत दुःख होगा. जो होना था वह हो गया। असं म्हणून दलीब जेवायला चलण्याविषयी परत-परत विनवत होता. सुतकाच्या आशंकेने कदाचित् आम्ही त्याच्याकडे जेवणार नाही या विचाराने त्याने आमची जेवणाची व्यवस्थाही गावातील बिगरनात्या-गोत्याच्या एका माणसाकडे केली होती. आम्ही ऐकत नाही म्हटल्यावर त्याने जेवणच आमच्या खोलीवर पाठविण्यास सांगितले. मग मात्र आम्ही निमूटपणे उठलो आणि चार घास खाऊन मुकाट अंथरुणावर येऊन पडलो. रात्री मध्येच जाग आली. दानाचा बाप डोक्यावरून पांघरूण घेऊन मुसमुसून रडत होता!

सकाळी जाग येताच गरम चहाचे प्याले समोर आले. आता चहा प्यायचा आणि एकदम चालू पडायचे, या हिशोबाने आम्ही सामानाची आवरा-आवर केली. तेवढ्यात दलीबसिंह तेथे आले. आमची निघण्याची घाई ओळखून म्हणाले, 'ज्या कामासाठी आला आहात, ते काम सोडून जाऊ नका! डोंगरावरच्या तुटणाऱ्या जंगलामुळे वरचे राडे-रोडे गावावर कोसळत आहेत. शेतं खचत आहे. गावचा झरा दसपट मोठा झाला; पण पाणी मात्र आठ महिनेही टिकत नाही. लोकाची ही दुखं मोठी आहेत. त्याची माहिती-फोटो घ्या! सरकारला पाठवा. पेपरमध्ये छापा! माझे दु.ख मला सहन करायलाच पाहिजे. श्रावणाच्या आई-बापांचे दुख तर किती तरी मोठे होते! ...' अतिशय सहजपणे दलीबसिंह बोलत होते. दु.खात अगतिकता नव्हती की मनोधैर्यात उसने अवसान नव्हते. अशा वेळी मन सुन्न करणारा एक कोरडेपणा येतो, तसंही झालं नव्हतं. अंगा-खांद्यावर लाडाने वाढवलेली पोर फार दूरच्या घरी गेल्याची आर्त झाक डोळ्यात होती; पण सर्व दु.ख जाणतेपणे पेलण्याची एक विलक्षण ताकद या माणसात होती! आम्ही निमूटपणे कामाला घराबाहेर पडलो.

लस्यालगावच्या कोसळणाऱ्या घरा-शेतांची पहाणी करून माघारी फिरलो. लोक म्हणत होते, 'भाईसाहब, अगले समय आवोगे तो हमारे खेतोंका क्या पूरे गाव का नामोनिशाना नही मिलेगा! आप भी हमे भूल जाओगे!'

वाड्याच्या अंगणात महायात्रेची तयारी पूर्ण झाली होती. महिन्यापूर्वीच्या लग्नाच्या पताका तशाच होत्या. प्रेत सासरी न्यायचे होते. आघाताने पार उध्वस्त झालेला नवरा पुढे झाला. महिन्यापूर्वी बारात घेऊन गेला होता. आज जनाजा घेऊन चालला होता! गावकऱ्यांनी शव उचलले आणि परत एकच हल्लाकल्लोळ झाला! आम्ही दूर कोपऱ्यात उभे होतो. दमयंतीचा आजा आला आणि अशोकचा हात हातात घेऊन रुद्ध कंठाने म्हणाला, 'कोण कुठले आपण! काल संध्याकाळपर्यंत ओळखही नव्हती; पण माझ्या लाडक्या नातीला पाण्याचा शेवटचा घोट तुम्ही पाजला! परमेश्वर तुम्हाला सुखी ठेवो!...

सिल्याऱ्याच्या आश्रमात असा एकटा कातरवेळी बसलो असताना कोसळणाऱ्या पहाडातील आकाशात जाऊन भिडणाऱ्या दलीबसिंहची आणि त्याच्या लाडक्या 'दाना'ची अनिवार आठवण येत होती. अजली विचारत होती, 'असा हललयासारखा एकटाच का बसला आहेस -?' काय सांगणार? पण न सांगताच ती खूप काही समजून गेली!

¤

सिल्याराचा आणखी एक प्रसंग बाप-जन्मात विसरणार नाही! १३ मार्चला दुसरा गट आम्हाला सिल्याराला येऊन भेटणार होता. दिवसभर त्यांचा पत्ता नव्हता. संध्याकाळ आली-गेली. रात्रीचे दहा वाजले. आता त्यांच्या येण्याची शक्यता नव्हती, म्हणून आम्ही झोपा-

यच्या तयारीत होतो. एवढयात पहाडाखाली अंधारातून अंधूकशा घोषणा ऐकू आल्या 'जंगल बचावऽ मानव बचाव—ऽ चिपको आंदोलन झिंदाबादऽऽ !' पहिल्यांदा आम्हाला वाटलं काही तरी भास झाला. एवढया अंधारात आणि थंडीत कोण कडमायला येईल ! पण हळू—हळू आवाज स्पष्ट होत गेला उल्हास—विजय आणि त्याचे साथीदार पहाड चढून वर येत होते. बहाद्दरानी एका दिवसात वीस—बावीस किलोमीटर अंतर— तेही पहाडावरचे काटले होते. शेवटी अंधारात काट्या—कुट्यात, नदी—नाल्यात धडपडले होते. सगळेजण प्रचंड थकले होते पाय सुजले होते; पण बाजी मारल्याचा एक विलक्षण आनंद—मस्ती प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होती! त्यांच्या आणि असे बहाद्दर साथीदार मिळाल्याबद्दल आमच्या ! खरच अशा क्षणाची वेहोषी काही वेगळीच असते. उल्हास- किशोर – मधु आणि कपनीने मोहिमेच्या नेत्याकडून हक्काने एक सेवा बजावून घेतली—मालिश करण्याची आणि त्यासारखी आनंदाची-अभिमानाची दुसरी गोष्ट नव्हती.

१५ मार्चला टेहरी—गढवालमधील श्रीनगरला सर्व गटानी एकत्र यायचे ठरले होते. श्रीनगर मध्यवर्ती ठिकाणी आहे आणि तेथे गढवाल विश्व विद्यालय व 'इन्स्टिटयूट ऑफ हिमालयन स्टडीज व रिजनल डेव्हलपमेंट' ही संस्था आहे श्रीनगरच्या दोन दिवसाच्या मुक्कामात गट-अहवाल सादर करणे व वरील दोन संस्थातील प्राध्यापक—विद्यार्थ्यांशी चर्चा असा कार्यक्रम होता. ठरल्याप्रमाणे एकेक गट श्रीनगरला जमा व्हायला सुरुवात झाली. खूप दिवसांनी सर्वजण एकमेकांना भेटत होते.

आयुष्यातले काही क्षण जर मला परत मिळाले तर मी पहिल्या प्रथम श्रीनगरची ती रात्र मागेन. सर्वजण जमेपर्यंत संध्याकाळ झाली. जेवणं झाली. सर्वजण खूप उत्साहात होते, जोशात होते या जोशाला—या आनंदाला मुक्त वाट मिळण फार जरुरीचे होते. म्हणून तबला-पेटीचा बंदोबस्त केला होता प्रदीप हाडाचा कलाकार ! तबला-पेटी पाहिल्यावर तो हरपला. पेटीवर त्याने सूर धरला. अहिरेने तबला ताव्यात घेतला आणि पुढे दोन-तीन तास जो तुफान जल्लोष झाला त्याला तोड नाही ! वहारू—सीताराम—काळूराम—आलमगीर—गोरख आमचे हुकमी एक्के ! वहारू तर असा बांढया कलाकार की त्याचे 'कोहो रे कोहकी रे कोहरे कोकी' हे भिलोरी गाणे पन्नास वेळा पेश केले तरी प्रत्येक वेळी त्याची अदाकारी अलग असायची. स्वराची-लयेची किंवा नुस्ता भाव खाण्याचीही ! सीताराम आपल्या वंजारी गाण्यानी आणि लोकगीतांच्या अस्सल हेलकाव्यानी मैफलीला झुलवीत असे; पण त्या रात्रीच्या मैफलीचा बादशहा कोण असेल तर अमरावतीचा मुन्ना अवस्थी. मुन्ना म्हणजे वऱ्हाडी भाबडेपणा आणि टारगटपणा याचे नामी मिश्रण. मुन्ना आणि त्याचे गुरु हरिभाऊ. मुन्नाने सुरुवातीला उगीचच आढयावेढयाची नाटकं करून एकदम ठाय लयीतील 'कृष्णा मजकडे पाहू नको, माझी घागर गेली फुटून' ला हात घातला आणि कोणाला काही कळायच्या आतच सगळे 'गोकुळ' देहभान हरपून या गवळणीत सामील झाले ! आज इतके दिवस लोटले तरी मुन्नाची ती खटयाळ राधा आणि तिची न फुटून फुटलेली घागर डोळ्यांसमोर भरलेली आहे. काना गूजते आहे !

१६ मार्चला सकाळी प्रत्येक गट-प्रमुखाने आपल्या साथीदारांसह गट-अहवाल सादर करण्यास सुरुवात केली. प्रत्येक गट-प्रमुखाने प्रश्नावलीनुसार गट-अहवाल तयार केला होता. शिवाय प्रत्येक सभासदाला नोंद-वही दिलेली होती. अहवाल सादर केल्यानंतर त्यांच्या अनुषंगाने प्रश्नोत्तर—चर्चा होत. या प्रश्नोत्तरातून, चर्चेतून प्रत्येक गटाने, गटातील प्रत्येक सभासदाने किती मेहनतीने—डोळसपणे माहिती मिळविली ते जाणवत होते. गटक्रमाक ४ आणि ५ ला विशिष्ट परिस्थितीमुळे मनासारखी पहाणी करता आली नव्हती. तरीही कुसुम—वहारू—शेठ—नीलम—पालेकर यानी आहे त्या परिस्थितीत शक्य तेवढी माहिती जमा केल्याचे जाणवत होते. शेठसरांचे 'रिपोर्टिंग' अनेक वारकावे व तपशिलामुळे त्यांच्यासारखेच खूप जिवंत रसरशीत वाटले, तर गटक्रमांक दोनच्या सुरेश पराजपे यांचे रिपोर्टिंग मुद्देसूद आणि रोखठोक होते. या महत्त्वाच्या कार्यक्रमाला आमच्या महाराष्ट्र मानव-विज्ञान-परिषदेचे कार्यवाह प्रा. मुटाटकर मुद्दामहून येऊन हजर राहिले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे आणि मार्गदर्शनामुळे अनेक मुद्द्याची—प्रश्नाची उकल करणे अधिक सोपे गेले.

पहिल्या गट-चर्चेबरोबरच हिमालय संशोधन संस्थेचे प्रमुख डॉ. तेजवीर सिंग याचे भाषण व स्लाइड-शो होता. डॉक्टरसाहेबानी आपल्या खास लखनवी लाजवाब उर्दू—हिंदीत हिमालयातील सौंदर्याचा फुलोरा आणि त्याचबरोबर टेहरीसारख्या डुबणाऱ्या नगरीची दर्दभरी दास्तां पेश केली. हिमालयातील पाना—फुला—फळाच्या त्यांच्या स्लाइडसही त्यांच्या भाषेप्रमाणे सौंदर्याचं लेणं मिरवीत आल्या होत्या; पण गहिऱ्या मथितार्थाच्या दृष्टीने खास भाषण झालं ते गढवाल विश्व विद्यालयाच्या सामाजिक—वनीकरण विभागाचे प्रमुख डॉ. नौटयाल या जवान प्राध्यापकाचे. डॉ. नौटयालजीनी सामाजिक वनीकरणाची संकल्पना थोडक्यात समजावून सांगितली आणि मग आपण जोवर अतिरिक्त भोगवादी व्यववस्था आणि मूल्य सोडत नाही तोवर पर्यावरण, निसर्ग-सतुलन आदि सर्व गोष्टी करणं कसं फोल आहे हे सागून चर्चेला एका वेगळया उचीवर नेले !

गढवाल विश्व—विद्यालयातील चर्चा मात्र काहीशी निराशाजनक झाली. आम्ही सर्वजण मिरवणुकीने विश्व—विद्यालयात गेलो. विश्व—विद्यालयातील प्राध्यापक—छात्रगण यानी सभेला चागला प्रतिसाद दिला; पण एकंदर चर्चेचा सूर 'तुम्ही इतक्या दुरून येऊन आमच्या समस्यांची इतकी आपलेपणाने माहिती घेतली वगैरे वगैरे' असा होता. हिमालयातील समस्या ह्याची—त्याची नाही तर आपल्या सर्वांचीच आहे अशी जाण, अशी भावना त्यातून कुठे प्रतीत होत नव्हती. एका विद्यार्थ्याने तर 'चिपको' वाल्यावर कडक टीका करणारे व वन—ठेकेदाराची बाजू घेणारे जोरदार भाषण ठोकले; पण त्याने केलेल्या आरोपाचे तपशील—पुरावे विचारायच्या आतच पढ्या मंत्र्याप्रमाणे भाषण ठोकून सरळ चालू पडला !

मंत्र्यावरून आठवण झाली. मागे या इथे मी श्री. हेमवतीनंदन बहुगुणांचे व्याख्यान ऐकले होते. हा सर्व बहुगुणाचा मतदारसंघ. त्यातून त्याची फेर—निवडणूक जवळ आलेली साहजिकच आम्हाला त्याबद्दल उत्सुकता होती. आपल्याकडे अनेक अंदाज होते; पण बहुगुणा निवडून येणार वा आपण त्याना निवडून देणार याबाबत गढवाली माणसाच्या मनात कसलाही संदेह जाणवला नाही. डेहराडूनच्या एका हॉटेलमध्ये एक माणूस 'नटवरलालजी' बहुगुणांना

खूप शिव्या घालत होता. म्हणून मी सहज विचारले, 'मग काय निवडून देणार का बहुगुणाना?' तसा तो ताडकन् उसळून म्हणाला, 'उनमे कितनी भी बुरियाँ हो मगर जिस आदमी ने हमे इज्जत बक्षी है, उसको हम कैसे भूल सकते है? इसके पहिले हम 'बुला' थे, 'बुला' कहकर लोग हमारी बेइज्जती करते थे, लेकिन बहुगुणाजीने हम गडवालियोका अभिमान जगाया!' (बुला म्हजे पोऱ्या किंवा कोकणातला बाल्या. मैदानात काम करणाऱ्या या पहाडी गढवाली लोकाना 'बुला' म्हणण्याचा प्रघात आहे!) बहुगुणाबद्दल गढवाली लोकाना वाटणारे प्रेम–आदर एका वाक्यात तो माणूस खूप समर्थपणे सांगून गेला!

¤

हिमालयातील मुशाफिरी संपत आली होती. प्रताप–विजय–कुँवर आणि हिमालयाच्या कुशीतील गणगोताला अलविदा करून पहाड उतरायला सुरुवात केली. कधी एकदा सपाट मैदान डोळे भरून पाहू असं झालं होतं. हरिद्वार–हृषिकेशनंतर बस मैदानातून धावू लागली. मैदानाची नवलाई संपली आणि मग नजर दूरवर मागे सरकणाऱ्या पहाडाकडे परत–परत वळू लागली. जीव कुठे तरी गुतला होता हिमालयातील या साध्या–सुध्या लोकांनी आपल्या पराक्रमाने आणि निर्व्याज प्रेमाने कुठे तरी तार छेडली होती. या साध्या–सुध्या लोकाच्या अखंड प्रयत्नातून निसर्ग–रक्षणाचा, निसर्ग–प्रेमाचा एक स्रोत हिमालयात उगम पावला होता. आता आम्हाला आमच्या अथक प्रयत्नातून–पराक्रमातून या स्रोताला साथ द्यायची होती. गंगौघ घडवायचा होता.

आणि आम्ही तो घडवू असा विश्वास आहे. निर्धार आहे. कारण खोल अंत करणात स्रोत आकार घेऊ लागला आहे.

अजून तरी काय अपेक्षित होतं!

## स मा प्त

(लेखमाला लिहिताना माझ्या साथीदारानी सादर केलेले अहवाल, नोंदी, रोजनिशा व त्याच्याशी झालेल्या चर्चांचा खूप उपयोग झाला. तसेच डॉ माधव गाडगिळांच्या 'हाकारा'मधील लेखाचाही उपयोग झाला लेखातील छायाचित्रे पापा पाटील, अशोक यादव, नागेश हाटकर, रवी यादवयांची आहेत. मी या सर्वांचा अतिशय ऋणी आहे.)

—जगदीश गोडबोले

सहसचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद.

## मोहिमेत सहभागी झालेले सदस्य

| नाव | संघटना / गाव | नांव | संघटना / गाव |
|---|---|---|---|
| १. आलमगीर मुलाणी | गरीब डोंगरी संघटना, पानशेत मुळशी. | २५. कुसुम कर्णिक | „ नारोडी, ता: आंबेगाव, जि. पुणे. |
| २. सिताराम बाजारे | „ „ | २६. सुरेश प्रभाकर परांजपे | „ विलेपार्ले ( पूर्व ), मुंबई ५७ |
| ३. पुरुषोत्तम उगरचंद शेठ | लोक–विज्ञान, सातारा. | २७. मधुकर घाटपांडे | सेंट्रल वॉटर पॉवर रिसर्च इन्स्टिटयूट, अरण्येश्वर, पुणे ९. |
| ४. सखरसिंग मोग्या पटले | सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, शहादे, मु कुसुमवाडे, जि. धुळे. | २८. अलका कुलकर्णी | „ गिर्यारोहक, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१. |
| ५. गुलाब बबन सकपाळ | शिक्षक अणे. ता. जुन्नर. | २९. दामोदर पांडू ठाकरे | „ डांग सेवा मंडळ, मु. सटाणा, जि. नाशिक. |
| ६. नरेश वासुदेवराव जाधव | पेण, जि. रायगड. | ३०. उल्हास राजज्ञ | महात्मा फुले मंडळ, शहादे, जि. धुळे. |
| ७. नागू गायकवाड | मु. नायगाव, ता. मावळ. | ३१. हिरामण बनकर देवरे | „ „ मु. कोंढावळ, जि. धुळे. |
| ८. विनायक गोपाळ अहिरे | मु. शिलाटणे, ता. मावळ. | ३२. भटा तुकाराम माळी | „ „ |
| ९. नामदेव ईश्वर ओव्हाळ | मु नायगाव, ता. मावळ. | ३३. सिताराम देवराव पवार | पुरोगामी मित्रमंडळ, मुखेड, जि. नांदेड. |
| १०. जीवन सोमाऱ्या शेलार | भूमिसेना, मु. पो मनोर, ता. पालघर, जि. ठाणे. | ३४. डॉ. एस. एस. सहस्रबुद्धे | वनौषधी सशोधन मंडळ, पाटण, जि सातारा. |
| ११. भिमसिंग गिरासे | „ „ | ३५. चंद्रशेखर अवस्थी | गिर्यारोहक, अमरावती. |
| १२. रवींद्र मधुवर यादव | रिव्हर व्हॅली, एक्स पिडिशल अ‍ॅण्ड रिसर्च सो. ऑफ इंडिया, सांगली. | ३६. हरिहर धोंडोपंत पुरोहित | „ „ |
| १३. किशोर व. देशपांडे | वन–निकेतन, मुरवाड, मालाड ( पश्चिम ), मुंबई–६४. | ३७. गोरखनाथ नामदेव कांबळे | दहिवली, कर्जत, जि. रायगड. |
| १४. नीलम परुळेकर | भूमिसेना, मनोर, पालघर, जि ठाणे | ३८. मंगल होनराव | पेण, जि. रायगड. |
| १५. प्रदीप बसाजी गायकवाड | जागृत संघटना, मार्गाची वाडी, पो. पाथरज ता. कर्जत. | ३९. राजू जोशी | „ „ |
| १६. जिजा कमळू रेरे | „ „ | ४०. विद्या खोपकर | औंध, पुणे. |
| १७. वाहरू सोनावणे | श्रमिक संघटना शहादे, जि. धुळे. | ४१. आर. पी. पालेकर | अ‍ॅकॅडेमी ऑफ डेव्हलपमेंट मु. पो. कशेले, कर्जत. |
| १८. सरस्वती शेवाळे | „ „ | ४२. जगदीश गोडबोले | महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद, पुणे ४. |
| १९. नारायण रामचंद्र खुळे | इन्व्हेस्मेंट इन् मॅन, फुलगाव. जि. पुणे. | ४३. काळूराम धांगडा | कष्टकरी संघटना, शिसने, जि.ठाणे |
| २०. काशीनाथ शंकर तांबे | बँक कर्मचारी, मौजे भावडी, जि. पुणे. | ४४. गोपाळ बोदले | „ „ |
| २१. शोभा कोठारवार | जागृत आदिवासी संघटना, मु. पो. आलापल्ली, ता. अहेरी, जि. चंद्रपूर. | ४५. प्रकाश भावे | रूरल कम्युनिझम, दहिवडी (नीड) ता. कर्जत, जि. रायगड. |
| २२. विमल मारोती कुसराम | „ „ | ४६. दत्तात्रय बीडकर | डांग सेवा मंडळ, नाशिक. |
| २३. सुनिता नरहर भाटवडेकर | गिर्यारोहक, पुणे ३०. | | |
| २४. अंजली गोखले | „ „ | | |

पुस्तके

# ‘ तवारीख ’

## मुस्लिम आंदोलनांचा वेधक आढावा

जून १९७७ ते डिसेंबर १९७९ या कालावधीत प्रसिद्ध करण्यात आलेल्या मुल्कपरस्तांच्या टिपणाचे संपादन तवारीखच्या रूपाने वाचकासमोर आले आहे. नरहर कुरुंदकरांनी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेला ‘ प्रस्तावना ’ म्हणण्याऐवजी मी परीक्षणच म्हणणे अधिक पसंत करीन. प्रस्तावना बावीस पानांची आहे. मलपृष्ठावर कुरुंदकरांनी तवारीखचे हेतुकथन केले आहे. वाचकांनी नव्या मार्गाचा अवलंब केला तर पुस्तक कृतार्थ होईल असे ‘ आरंभी थोडेसे ’ मध्ये संपादकांनी सांगितले आहे.

मुल्कपरस्तांनी केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही चाललेल्या मुसलमान समाजातील आंदोलनांचा धावता आढावा वेधक रीतीने घेतला आहे. प्रामुख्याने मुस्लिम स्त्रियांच्या समस्या, मुस्लिम समाजाचे सामाजिक मागासलेपण, मुस्लिम युवकांच्या चळवळी, उर्दू भाषेचा प्रश्न, पाकिस्तानमधील परिस्थिती, मुसलमानांमधील अधश्रद्धा, मुस्लिम व बोहरींमधील समाजप्रबोधन या विषयांतर्गत अनेक लहान-मोठ्या समस्यांना त्यांनी स्पर्श केलेला आहे. विविध सामाजिक संस्था आणि राजकीय पक्ष यांच्याकडे मुसलमान कोणत्या दृष्टिकोनातून पाहातात व त्याची कारणे कोणती आहेत याचे विश्लेषणही ‘ तवारीख ’मध्ये सापडते.

तवारीख वाचताना तवारीखच्या हेतूविषयी प्रस्तावनाकार आणि संपादक यांच्यात ठळक सहमती दिसून येत नाही. संपादक जेव्हा वाचकाना नव्या मार्गाचा अवलंब करायला सांगतात तेव्हा त्यांच्यासमोर मुस्लिम वाचक आहेत हे निर्विवाद आहे, तर मलपृष्ठावर प्रस्तावनाकारांनी सांगितलेला हेतू मुस्लिम मनोगत मराठी वाचकांसमोर ठेवण्याचा आहे. हे मराठीवाचक मुस्लिम असण्याची शक्यता कमीच!

दुसरी गोष्ट अशी की, तवारीखचा चेहरा-मोहरा आणि प्रस्तावनेचा चेहरा-मोहरा यात निवेदनात्मक फरक आहे. तवारीखकार प्रबोधनात्मक तर प्रस्तावनाकार आक्रमक भूमिका घेताना दिसतात. या दोन्ही भूमिकांवर आक्षेप घेण्याचे कारण नाही; परंतु उर्दू उत्तमपणे जाणणाऱ्या कुरुंदकरांनी मुस्लिम समाजप्रबोधनाच्या संदर्भात केवळ दलवाईंचे नाव घ्यावे हे अनवधानाने, हेतुपुरस्सर की आणखी कोणत्या तरी इतर कारणाने हे समजणे अवघड आहे सर सैय्यद अहमदखान, जस्टिस अमीर अली, शिवली, इकबाल आणि तवारीखमध्ये तपशिलाने उल्लेख आलेले एम. आर. ए. बेग या सर्वांची नोद घेण्यास कुरुंदकर विसरलेले दिसतात. मुस्लिम समाजाचे प्रबोधन करण्याचा सर्वांचा हक्क मान्य करूनही मुस्लिमासंबंधी वेधडक विधान देण्याचा मोह कुरुंदकरांना आवरता आला नाही याची नोद घेतली पाहिजे. **काश्मिर भारताचा अविभाज्य भाग आहे असे भारतीय मुसलमानांना वाटत नाही. त्यांना काश्मिर पाकिस्तानचे आहे असे वाटते (पान ९) हे दलवाईंचे विधान ते उद्धृत करतात आणि या विधानाला उत्तर नाही अशी पुस्तीही जोडतात. ही पूर्वग्रहदूषितता म्हणावी की तयार होणाऱ्या मानस प्रतिमांना शरण जाणे म्हणावे ? पुरोगामी आणि जातीयवादी हिंदू यांच्यामध्ये फरक न करण्याची जी प्रवृत्ती मुसलमानांमध्ये वाढते आहे त्याचे कारण कुरुंदकरांच्या विधानात गवसते.**

दुबळ्या तार्किकतेचे दर्शनही आपल्याला प्रस्तावनेमध्ये दिसते. सोफिस्ट पद्धतीने काही विधाने करून ‘ गंमतीदार ’ निष्कर्ष कुरुंदकरानी काढले आहेत. ‘ तुम्हाला गाय पूज्य वाटत असेल तर तुम्ही मारू नका, खाऊ नका. मला ती पूज्य वाटत नाही. माझ्यावर तुमची सक्ती का ?’ असे मुसलमानांचे एक काल्पनिक वाक्य घेऊन ‘ मी मूर्तिपूजा मानतो मला महंमदांचा पुतळा बनवायचा आहे ! असे म्हटले तर ते मात्र मुसलमानाना मान्य नाही. (पान १४) अशा प्रकारची उदाहरणे ते देतात.

ठोस संदर्भ व पुरावा नसताना प्रस्तावनाकार म्हणतात की, मुसलमानांनी मौलानांवरही (आझाद) फार प्रेम केले नाही मग ते समाजवाद्यांवर कितीसे प्रेम करू शकणार? समाजवादी चळवळीमध्ये गावोगावी अनेक मुस्लिम सामील झाल्याची उदाहरणे सांगता येतील. महाराष्ट्रातील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत अनेक मुसलमान या चळवळीत होते. संगमनेरमधील मुस्लिम श्रेष्ठीजनासंबंधी एक सर्वेक्षण मी केले. श्रेष्ठीजनांच्या मुलाखतीनुसार संगमनेरमधील बहुतांश मुस्लिम समाजवादी चळवळीत होते. परंतु निवडणूक तिकिटाच्या वाटपासंबंधी वाद झाल्याने अनेक नेते अनुयायांसह काँग्रेसमध्ये गेले. (हीच गोष्ट हिंदू राजकीय श्रेष्ठीबाबतीतही घडली आहे.)

मुल्कपरस्त यानी ज्या महत्त्वाच्या समस्यांना स्पर्श केला त्यावर मुस्लिम विचारवंतांनी अवश्य विचार केला पाहिजे. मुस्लिम शिया ( बोहरी ) आणि सुन्नी पथाच्या समस्यांवर मुल्कपरस्तानी टिपणे लिहिलीत. बोहरा धर्मगुरूंनी केलेला अत्याचार व सुन्नीमधील तलाकपीडित महिलांचे प्रश्न गभीर बनले आहेत ही वस्तुस्थिती आहे व ती नाकारण्यात हशील नाही. मौलाना युनुस यांची प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे. ‘ आपण बेरहयीने बिब्या सोडल्या नसत्या तर सत्यशोधकांचे काही चालले नसते ! (पान ७३) या दुखण्यावर मुल्कपरस्तांनी समान नागरी कायदा, स्त्रियांना शिक्षण, विचारपूर्वक लग्न करण्याची पद्धत सुरू करणे इ. उपाययोजनाचे संकलन केले आहे. तलाक आणि सवतीच्या कात्रीतून सुटका करण्यासाठी धर्मांतर होण्याची भीतीही त्यांनी दाखविली. ( पान ६९ ) समान नागरी कायदा आणि स्त्रियांना शिक्षण देण्याविषयी पुष्कळ लिहिले जात आहे. विचारपूर्वक लग्न करण्याची

पद्धत सुरू करण्याची जी सूचना खोजा जमातीच्या मेळाव्यात सादर झाली ती महत्त्वाची आहे. या सूचनेवर मुल्कपरस्तानी अधिक विस्तृत टिपण केले असते तर अधिक चांगले झाले असते. लग्न मोडण्याची कारणे साधारणत. मुसलमानाच्या सदोष विवाहपद्धतीत आहेत. सुन्नी मुसलमानामध्ये विवाह प्राय: बिरादरीत होत असतात. बहिणीने आपल्या *मुलाला भावाची मुलगी करणे* किंवा भावाने बहिणीच्या मुलीशी आपल्या मुलाचे लग्न लावणे यासारखे प्रकार निदान महाराष्ट्रात तरी फार मोठ्या प्रमाणात चालत आहेत. हिंदूमध्ये आतरजातीय विवाह होण्याचे प्रमाण वाढते आहे. मुसलमानामध्ये मात्र हे प्रमाण अत्यंत कमी आहे. इस्लाममध्ये जातिभेद नसताना भारतातील मुसलमानांमध्ये बेटी-बंदी सुरू आहे. त्यामुळे विवाह लादले जातात.

जातीयवादी हिंदू आणि मुस्लिम यांच्या गठबंधनाविषयी मुल्कपरस्तानी सागितलेला मुद्दा मार्मिक आहे. ससदेत हिंदू कायद्यात बदल करीत असताना त्याला विरोध करणाऱ्याना मुस्लिम सदस्यांनी पाठिंबा दिला होता हे खरे आहे. भारतीय शासनाने हिंदू कायद्यात सुधारणा घडवून आणल्या; परंतु या परिवर्तनासाठी देखील त्या वेळी कायदामंत्री हरिभाऊ पाटसकर यांनी हिंदूधर्मशास्त्रांचा आधार घेतला, हा त्या परिवर्तनाचा दैवदुर्विलास आहे, हे मुद्दाम सागण्याचे कारण हिंदूधर्म परंपरेखेरीज हिंदू कायद्यात परिवर्तन करणे शासनाला जमले नाही व ही घटना ज्या अर्थाने धर्मनिरपेक्षवादी मानली जाते तशी ती नाही. समान नागरी कायदा भारतीय शासन करणार; पण त्याच्या अंमलबजावणीला यश मिळेल की नाही या शंकेला भरपूर जागा आहे. कारण पारित झालेल्या हिंदु कोड बिलाचा संबध उच्चभ्रू व सुशिक्षित हिंदूंशी येतो. कुठल्याही ठिकाणच्या स्थानिक दैनिकामध्ये रोज प्रसिद्ध होणाऱ्या हिंदूंच्या जाहीर फारकती याच्या निदर्शक आहेत. सांगण्याचा मुद्दा असा की, समान नागरी कायद्याच्या संदर्भात सर्व भारतीय समाजास विश्वासात घेतले पाहिजे.

कुटुंबनियोजनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात मुसलमानांनी भाग घेतला पाहिजे ही अपेक्षा आहे. मुसलमान या कार्यक्रमाविषयी उदासीन आहेत. नोकरी, धंदा-व्यवसाय आणि शैक्षणिक क्षेत्रात अल्पशा सवलती देऊन त्यांना या कार्यक्रमाकडे आकृष्ट करता येईल.

आर्थिक आणि व्यवसायक्षेत्रात मुसलमानावर अन्याय केला जातो अशा तक्रारीविषयी आणि समस्याविषयी सविस्तर टिपणांचा अभाव तवारीखमध्ये आढळतो. मुसलमानाच्या सामाजिक परिवर्तनाविषयी बोलणाऱ्या-लिहिणाऱ्या समाजप्रबोधनकारांनी प्रत्यक्षत: आर्थिक व शैक्षणिक मुस्लिम मागासलेपणावर बोलले-लिहिले पाहिजे. मुल्कपरस्त नियाजीचे विचार उद्धृत करतात. जातीय दंगली, उर्दु, मुस्लिम पर्सनल लॉ आणि अलिगढ विद्यापीठ यांसारखे प्रश्नच मुस्लिम नेते पुढे करतात हे खरे आहे; पण जातीय दंगलीचा प्रश्न हा गंभीर प्रश्न असल्याकारणाने त्याकडे कुणालाच दुर्लक्ष करून चालणार नाही. ' जमाते इस्लामी ही संघटना केवळ आपल्या देशातील दंगलीबद्दल आरडा-ओरडा करते. पाकिस्तानात चाललेल्या मुसलमानाच्या शिरकाणाचे मात्र जमातला सोयरसुतक नाही '—या विधानातून मुल्कपरस्ताना कोणताही अर्थ अभिप्रेत असला तरी ' दगली काय व्हायच्याच ' असाच सूर निघतो. मुसलमानाच्या समाजपरिवर्तनाच्या प्रश्नापेक्षा दंगलीचा प्रश्न कमी महत्त्वाचा मुल्कपरस्तांना वाटतो. नेमकी याच ठिकाणी गंभीर गफलत होत आहे असे मला वाटते. सामाजिक व आर्थिक प्रश्नाला डावलून समाजपरिवर्तन होईल असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही.

कम्युनिस्टांच्या मुसलमानांविषयीच्या मतावर प्रस्तावनाकार आणि मुल्कपरस्त यांनी विवेचन केले आहे. कम्युनिस्टांचे मुसलमनांना आकर्षण वाटतेच; दुसऱ्या बाजूने त्याविषयी तीव्र नापसंती वाटते (पान२०) या संदर्भातील कुरुंदकराचे विश्लेषण वस्तुनिष्ठ वाटते. इस्लाम विज्ञानविरोधी असल्याची टीका जसे समाजवादी करतात तसेच कम्युनिस्टही करतात. सर्वच समाजवादी नव्हे तर अनेक समाजवादी, कम्युनिस्ट विशिष्ट धर्मापेक्षा ' धर्म ' या संकल्पनेवरच हल्ला करतात. एवढेच नव्हे तर धर्म आणि धर्मासारखेच जे इतर सामाजिक घटक आहेत उदा. संस्कृती वगैरे त्यांना ते सुपर स्ट्रक्चर म्हणतात. धर्म नाकारणारे काही समाजवादी दिसतील; पण संस्कृती नाकारणारे फारच क्वचित दिसतात. संस्कृती मानणाऱ्याची संख्याच जास्त निघेल. संस्कृतीत न कळत डोकावणारा धर्म किंवा धर्मनिरपेक्ष म्हणून गणल्या जाणाऱ्या शासकीय सार्वजनिक सस्थांमध्ये डोकावणारा धर्म मुसलमानांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर वाईट प्रतिक्रिया निर्माण करतो.

वक्फ आणि मुस्लिमसंस्था यांच्यात चाललेल्या पैशाच्या गैरव्यवहारांवर मुल्कपरस्तांनी नेमके बोट ठेवले आहे. ते गैरव्यवहार दूर करण्यासाठी शक्यतो सर्व उपायाचा वापर करायला हवा. मुस्लिम तरुणाच्या मनोगताविषयी तपशीलवार टिपणांचे सर्व वाचकांनी आनंदाने स्वागत केले असते.

मुल्कपरस्त यांची निवेदनशैली वाखाणण्याजोगी आहे. विषय चांगले वेचले आहेत. उर्दू भाषेतील शब्दांची उधळण चपखलपणे केली आहे. तवारीखचे उर्दूत भाषांतर होणे अत्यावश्यक आहे. कारण मराठी माध्यमाचा मोठ्या प्रमाणावरील लाभ महाराष्ट्रातील मुसलमानाना कितपत घेता येईल याविषयी मी साशंक आहे, राहता राहिले मराठी बिगरमुस्लिम वाचक ! त्याना मुस्लिम चळवळीची माहिती करून घेण्याची इच्छा वगैरे असते असे समजण्याचे कारण नाही. तवारीखमधील मुसलमानांचे चित्रण पाहून ' मुसलमान शेवटी मुसलमानच ' अशीच प्रतिक्रिया येणार !

—अलीम वकील
संगमनेर

तवारीख
सं. यदुनाथ थत्ते
चेतश्री प्रकाशन, अमळनेर
किंमत : २४ रु.

एक स्पष्टीकरण

# पेशवेकालीन गुलामगिरी

'पेशवेकालीन गुलामगिरी आणि अस्पृश्यता' या पुस्तकाचे सविस्तर असे परीक्षण श्री. राजा दीक्षित यांनी २५ सप्टेंबर ८२ च्या 'माणूस'मध्ये केले आहे. या पुस्तकाचा लेखक या नात्याने मी त्यांचा आभारी आहे.

पुस्तकपरीक्षणाच्या संदर्भात दीक्षित यानी काही मुद्दे उपस्थित केले आहेत आणि काही ठिकाणी एकांगी स्वरूपाची टीका केली आहे. 'भारतातील प्रत्येक स्पृश्य हा शरीराने नसला तरी मनाने मनुच असतो' या माझ्या पुस्तकातील एका विधानाचा परामर्ष घेऊन त्यास 'टोकाचे' विधान असे म्हटले आहे. एवढेच नव्हे तर अभ्यासकाला न शोभणारे असे हे विधान आहे असा शेरा त्यांनी मारला आहे. वास्तविक या देशातला माणूस जातिनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा एकाच वेळी जपू पाहणारा सामाजिकदृष्टचा विकृत असा माणूस आहे. जातीयवाद जसा पेशव्यांच्या काळात होता तसा आजही आहे आणि नजीकच्या भविष्यकाळातही तो नष्ट होईल असे वाटत नाही. हिंदूधर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये अध्यात्मिक पातळीवरील 'समता' आपण आतापर्यंत तत्त्वज्ञानाच्या पातळीवरच ठेवली आहे आणि प्रत्यक्षात मात्र मनुस्मृति, विष्णुस्मृति, नारदस्मृति तसेच ऋग्वेदातील पुरुषसूक्त यामध्ये सांगितलेला चातुर्वर्ण्य आणि त्याचे जातीय स्वरूपच आचरणात आणले आहे. पेशवाई गेली, आंग्लाई गेली आणि देश स्वतंत्र होऊन पस्तीस वर्षे झाली तरीही आज आपल्या जातीय दृष्टीमध्ये फारसा फरक झालेला नाही. पेशवाईच्या काळात अस्पृश्यांच्या गळयात गाडगी-मडकी बांधली जात. सामाजिक व्यवस्थेत बदल केल्यास १८५७ सारखे बंड होते म्हणून अस्पृश्यांची स्थिती ब्रिटिश काळात तशीच ठेवली गेली आणि देशाच्या आजच्या स्वातंत्र्याच्या काळात दररोजचे वर्तमानपत्र दलितांच्यावरील अत्याचाराची बातमी घेऊनच येते. मराठवाडा नामांतर आंदोलनात आजही माणसे जिवंत जाळली जातात, गुजराथेत आजही राखीव जागाविरोधी भयानक अत्याचार घडविणारे आंदोलन होते आणि म्हणूनच या संदर्भातच 'भारतातील प्रत्येक स्पृश्य हा मनुच असतो' म्हणजे जातिनिष्ठा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जपणारा असतो असे मी विधान केले आहे. या विधानास दीक्षित यानी 'टोकाचे' आणि 'अभ्यासकाला न शोभणारे विधान' असे का म्हटले आहे हे समजत नाही.

दीक्षितांनी पुस्तक वाचल्यानंतर 'लेखक हा चांगला सग्राहक आहे; परंतु चांगला चिकित्सक नाही' असे म्हटले आहे. दीक्षित म्हणतात त्याप्रमाणे मी चिकित्सक नसेनही कदाचित; कारण चिकित्सक कोणास म्हणावे याची त्यांना कोणती व्याख्या अभिप्रेत आहे याची मला जाणीव नाही. पेशवाईच्या कालखंडात जातिव्यवस्था कशी होती आणि तिचे भयानक स्वरूप कसे होते याचा पुराव्याआधारे विचार करून माझ्या कुवतीप्रमाणे चिकित्सा-चर्चा मी सविस्तरपणे केली आहे. तसे नसते तर माझे पुस्तक हे साधनसामुग्रीची केवळ जंत्रीच राहिले असते. दीक्षित हे पेशव्यांच्यावर किंवा ब्राह्मणांवर केलेल्या टीकेमुळे कमालीचे घायाळ झालेले दिसतात, अन्यथा त्यांनी असे विधान केले नसते असे वाटते.

पेशव्यांच्या 'ब्राह्मण' असण्यामुळे तत्कालीन सामाजिक संस्थांवर मुलगामी असा काही परिणाम झाला का? असा प्रश्न दीक्षितांनी विचारला आहे. या देशाच्या इतिहासातील मोगलाचे राज्य, इंग्रजाचे राज्य, शिवाजीचे राज्य किंवा प्राचीन काळातील राज्ये यांपैकी अस्पृश्यांच्या गळयात मडकी केवळ पेशव्यांच्या राज्यातच आली, एवढा ऐतिहासिक पुरावा आणि वास्तवता त्यांनी लक्षात घेतली तरी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळू शकेल. भारतात इतरत्र जातीयवाद नव्हता असे नाही; परंतु पळीपंचपात्रे, सोवळे-ओवळे, ब्राह्मणभोजने ही संस्कृति पेशव्यांच्या ब्राह्मणी राज्यात शिगेला पोहोचली होती, हे सारे सनातनी ब्राह्मण आणि जातिनिष्ठा यातूनच निर्माण झाले होते, हे स्पष्ट आहे.

असो. दीक्षितांनी निर्माण केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे हा एक केवळ कर्तव्याचा भाग आहे. म्हणूनच हा लेखनप्रपंच. त्यांनी अगत्याने पुस्तक वाचून त्याचे परीक्षण केले, त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. पुस्तकातील मुद्रणदोष मला मान्य आहेत. यामध्ये लेखकाच्या विचारांचा दोष नसून प्रेसचा आहे आणि छपाईबद्दल मी जे आभार मानले आहेत त्यामध्ये औपचारिकपणाचाच केवळ भाग आहे.'

—डॉ. पी. ए. गवळी


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित-दलितेतर या भेदाना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

**आंबेडकर भारत**

लेखक : बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : २० रुपये.

विज्ञानेश्वरी डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

# हिमगौरी आणि सात बुटके

**दक्षिण गंगोत्री अभियानदलाचे नेते डॉ. कासिम यांच्याशी गप्पाटप्पा**

फॅरेडेला एकदा एका बाईने धमाल प्रश्न विचारला. 'फॅरेडे, या तुझ्या नव्या विद्युतविषयक नियमांचा नक्की फायदा काय ?'

फॅरेडे पण तेवढाच खट्याळ माणूस होता. त्याने बाईंना विचारले, 'बाई, तुम्ही नुकत्याच जन्माला घातलेल्या मुलाचा नक्की उपयोग काय ?'

– वेळ बदलते, जागा बदलते, सारे काही भोवतालचे पार बदलून जाते; पण माणसाचा स्वभाव मात्र तसाच कायम उरतो. अगदी आदिमानवापासून आजपर्यंत मानवी स्वभावाचे सारे अंगोरे–कंगोरे कसे घासून–पुसून चक्क लखलखीत ठेवल्याप्रमाणे पहिल्यासारखे बाकी आहेत !

– या मानवी स्वभावाचे थोडे-फार झटके आज डॉ. कासिमला मिळणार आहेत. डॉ. कासिम ! भारताने दक्षिण गंगोत्रीला केलेल्या पहिल्या यशस्वी मोहिमेचे सेनानायक परत आल्यावर झालेले छोटे-मोठे सत्कार, सरकारला सविस्तर गुप्त अहवाल सादर करण्यात गेलेला वेळ, दूरदर्शन आणि आकाशवाणी यांच्यासाठी केलेली नाटके या सर्वांतून डॉ. कासिम आता तसे थोडे मोकळे झालेत. यशस्वी माणसाचे एक बरे असते. प्रत्येक माणूस त्याचा जवळचा वा दूरचा नातेवाईक वा मित्र असतो. संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्या संचालकाची (Managers of Research Institutes in India) एक संस्था आहे. डॉ. कासिम एका विज्ञानसंस्थेचे संचालक म्हणजे आमच्याच खानदानीतले याची आम्हाला जाणीव होती. आम्ही दिल्लीतील एका अलिशान सभागृहात त्यांचे भाषण ठेवतो. रंगीत प्रकाशचित्रे दाखवत डॉ. कासिम भाषण देणार आहेत. त्यांच्या भाषणाची आम्ही खूप जाहिरात केली आहे. भाषणानंतर चहा–उपहार आहे याची नोंद करावयास आम्ही विसरलेलो नाही.

भाषण सुरू होण्याची वेळ टळून जाते. सभागृह जवळजवळ मोकळे आहे. हे असे का होते आहे ?

– समाज नक्की कुठं तरी रूळ बदलतो आहे ! चलाखी करून जवळच्या एका छोट्या खोलीत आम्ही भाषणाची जागा हलवतो. जमलेल्या आम्हा अनेकांच्या मनात डॉ. कासिम यांच्याबद्दल आदरयुक्त असूया आहे; पण या छोटेखानी जमावात खास अगत्याने आलेले मान्यवर पण आहेत. आसाम आंदोलनाच्या वाटाघाटी करावयास आलेले तरुण आहेत. बंगालमधील जलपटू आहेत. सेनादलाचे काही उत्साही अधिकारी आहेत महाराष्ट्र सरकारचे फार वरिष्ठ अधिकारी अशोक सामत फक्त एक दिवसासाठी सरकारी कामासाठी दिल्लीला आहेत. सारी कामे संपवून आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम चुकवून ते या कार्यक्रमाला अगत्याने आलेत. मुंबईतील गिर्यारोहण-संस्थेचे ते तसे पदाधिकारी पण आहेत. गर्दी कमी आहे. हे विजयी वीराचे केलेले भव्य यथोचित स्वागत नाही; पण हा जाणकारांनी दिलेली दाद आहे !

## हिमगौरी . . .

गर्दी कमी असल्याचा एक फायदा होतो. साऱ्या कार्यक्रमाला घरगुती गप्पा–टप्पांचे स्वरूप येते. एक प्रसन्न मनमोकळी मैफिल अगदी सहजपणे रंगते. जमलेल्या आम्हा अनेकांचे अंटारक्टिकाबद्दलचे ज्ञान अक्षरश: अकटोपासून विकटोपर्यंतचे आहे. लहानपणी शाळेत दक्षिण ध्रुवावर सहा महिन्यांची रात्र आणि सहा महिन्याचा दिवस असतो आणि बर्फावरून घसरणारी कुत्र्याची गाडी असते असे काहीसे वाचलेले असते. त्यानतर दक्षिण ध्रुवालाच आम्ही आमच्या मनाच्या शीतगृहात कुठे तरी बंद करून ठेवलेले होते. डॉ. कासिमना याची जाणीव आहे. आपल्या सहजसुंदर ओघवती भाषेत ते आम्हाला दक्षिण ध्रुवाचा परिचय करून देताहेत.

कोणे एके काळी भारत, अंटारक्टिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका हा एक सलग भूभाग होता. आज मात्र दक्षिण ध्रुव हे जगातील सातवे खंड मानले जाते. इतर खंडांच्या बाबत एक खंड दुसऱ्या खंडाशी भूभागाने वा सामुद्रधुनीने जोडलेले असते मात्र हे सातवे खंड सर्वांपासून अलग एखाद्या ध्यानस्थ मुनीप्रमाणे बसलेले आहे. या खंडाला सर्वांत जवळ असलेला भूभाग केपहॉर्न त्याच्यापासून नवशेनव्वद किलोमीटर अंतरावर आहे. अतिप्रचंड प्रदेश या खंडाच्या वाट्याला आलेला आहे. या खंडाचे क्षेत्रफळ अमेरिका आणि मेक्सिको यांच्या एकत्रित क्षेत्रफळापेक्षा अधिक आहे. ऑस्ट्रेलियापेक्षा वा भारत आणि चीन यांच्या एकत्रित आकारमानापेक्षाही या खंडाचा अठ्ठ्याण्णव टक्क्याहून अधिक भाग बर्फाच्या दाट आवरणाखाली गाडला गेलाय. जमिनीवर असलेल्या या बर्फाची जाडी काही ठिकाणी साडेचार किलोमीटर आहे तर सरासरी जाडी दीड किलोमीटरहून थोडी अधिक आहे. म्हणजे सरासरी एक मैल उंचीच्या बर्फाचा भार अंगावर घेऊन हे खंड झोपलेले आहे बर्फाची रजई अंगावर ओढून झोपलेल्या या खंडाची मध्यभागी असलेल्या पर्वतराजीमुळे पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागात विभागणी होते. पूर्वभाग क्षेत्रफळानं बराच मोठा आहे. चार हजार मीटर उंचीवर तेथे एक विस्तृत पठार आहे. पश्चिम भागात छोटे-मोठे पर्वत आहेत. बर्फातून बाहेर आलेले त्याचे सुळके अनेक ठिकाणी आढळतात. एखाद्या यक्षिणीने जादूची कांडी फिरवून येथील सारे बर्फ वितळविले तर पश्चिम अंटारक्टिका हा बेटांनी भरलेला भाग वाटेल आणि पूर्व अंटारक्टिका हे डोंगरांच्या कुशीत झोपलेले एक अतिप्रचंड तळे बनेल !

## अलीबाबाच्या गुहेत

जमिनीवर असलेल्या बर्फाच्या अतिप्रचंड भारामुळे दक्षिण ध्रुवावरील जमीन अर्धा किलोमीटरहून अधिक आत दबली गेलेली आहे. जमिनीचा फार मोठा भाग त्यामुळे समुद्रसपाटीहून आत गेलेला आहे. जगातील नव्वद टक्क्यांहून अधिक बर्फ आणि सत्तर टक्क्यांहून अधिक गोडे पाणी या बर्फात् साठलेले आहे. हे बर्फ वितळविले तर जगातील सान्या समुद्रांची उंची दोनशे फुटांहून अधिक वाढेल ! जगभरच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनातून आता एक गोष्ट लक्षात आली आहे. पेरू, चिली, ऑस्ट्रेलिया, कॅलिफोर्निया, सौदीअरेबिया याना दक्षिण ध्रुव गोड्या पाण्याचा पुरवठा करू शकेल. शास्त्रीयदृष्टया ही गोष्ट शक्य आहे आणि व्यापारीदृष्टयाही किफायतशीर आहे. एका गणिताप्रमाणे साडेआठ कोटी टन वजनाचा बर्फाचा पर्वत बर्फावरून सरकवत आणि पाण्यामधून ओढत आठ हजार किलोमीटर अंतरावर नेला तर उरलेल्या बर्फाच्या पर्वतातून मिळणारे पाणी सौदीअरेबियाला पाच रुपये घनमीटर या दराने देता येईल. आज समुद्राचे पाणी गोडे करून घ्यावयास सौदीअरेबियाला घनमीटरमागे सात रुपये मोजावे लागतात.

बर्फाच्या थराखाली गाडलेले समुद्र शास्त्रज्ञांना फार उपयुक्त माहिती देतात. अमेरिका आणि रशिया यांची एक संयुक्त मोहीम अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी वापरून या बर्फाखाली प्रवास करून आली आहे ! या समुद्रांच्या तळाशी असलेले पाण्याचे प्रवाह अगदी गोगलगाईच्या गतीने इतर ठिकाणी जात असतात. दक्षिण ध्रुवाच्या समुद्राच्या तळाशी असलेले पाणी हे जगातील सर्वांत वजनदार व सर्वांत थंड पाणी आहे होते काय, समुद्रातील पाण्याचे बर्फ बनत असताना त्यातील मीठ बाहेर फेकले जाते. ते मीठ या तळामधील पाण्यात विरघळते. त्याचे वजन वाढत जाते. भोवतालचे बर्फ आणि विरघळलेले मीठ यामुळे ते पाणी फार थंड बनते. उत्तरेकडे सरकत जाणारे हे पाणी जगातील तिन्ही प्रमुख महासागरांच्या तळाशी सापडते. किरणोत्सर्ग वापरून या पाण्याच्या प्रवाहाची दिशा, वेग व तपमान ठरवता येते. हवामानाचे अदाज बांधावयास या अभ्यासाचा फार उपयोग होतो. अनेक तज्ज्ञांचे असे ठाम मत आहे की, अंटारक्टिकातील बर्फ आणि हे पाण्याचे प्रवाह अखेर जगातील हवामान ठरवितात. परंतु या सर्वांचे आपापसात नक्की नाते काय आहे हे अद्याप माणसाला समजलेले नाही.

मार्च ते सप्टेंबरपर्यंत अंटारक्टिकावर जवळजवळ सूर्यप्रकाश नसतोच. त्यामुळे सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असा प्रकार बनतो. त्यामुळे आणखी एक गोष्ट होते. हा सारा भूभाग रबरासारखा लवचीक आहे असे वाटते . ऋतुमानाप्रमाणे या खंडाचा आकार बदलतो. बर्फाच्या आकाराप्रमाणे उन्हाळयात काही ठिकाणी अंटार्क्टिका ३६०० किलोमीटर लांबीचा होतो. हिवाळयात त्या ठिकाणची लांबी ५४०० किलोमीटर एवढी वाढलेली असते. २४ ऑगस्ट १९६० ला रशियन शास्त्रज्ञांनी अंटारक्टिकामध्ये शून्याखाली अठ्ठयाऐंशी सेंटिग्रेड हे तपमान नोंदवले होते. जगातील ते सर्वांत कमी तपमान समजले जाते या असल्या तपमानामुळे ताशी तीनशे किलोमीटर असल्या प्रचंड वेगाने वादळी वारे सुटतात. अंटारक्टिकाजवळचा समुद्र म्हणून जगातील सर्वांत वादळी समुद्र समजला जातो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अंटारक्टिकात फारच नगण्य, म्हणजे वर्षाला जास्तीत जास्त एक सेंटिमीटर एवढे बर्फ पडते. त्यामुळे दक्षिण ध्रुव हा जगातील अनेक वाळवंटांपेक्षा अधिक कोरडा प्रदेश आहे अंटारक्टिकामध्ये सहा महिनेच सूर्यप्रकाश असतो; पण विश्वास बसणार नाही एवढा प्रचंड सूर्यप्रकाश या काळात अंटारक्टिकाला मिळतो. विषुववृत्ताला त्या कालखडात मिळणान्या सूर्यप्रकाशाइतकाच तो असतो; पण या येणाऱ्या प्रकाशकिरणांनी दक्षिण ध्रुवाचे तपमान बदलत नाही. बर्फाच्या गादीवरून परावर्तित करत हे किरण अवकाशाला परत दिले जातात. या खंडाची उंची आणि भोवतालचे विरळ हवामान पण तपमान खाली ठेवण्यास मदत करते

अलीबाबाच्या गुहेतील खजिना दाखवावा अशी या अद्‌भुत खंडाची माहिती हा आधुनिक सिंदबाद आम्हाला देत होता ! हे सारे सागताना डॉ. कासिम मध्येच थांबतात. ते म्हणतात, या अशा मोजमापांनी ( Vital Statistics ). या खंडाचे सौंदर्य समजणार नाही, समजावून घेता येणार नाही ! सारी जिंदगी ज्याच्यावरून ओवाळून टाकावी असे काही झपाटलेले क्षण असतात. काही ठिकाणी, काही वेळा बघतावघता सुरवंटाचे फुलपाखरात रूपातर होते. अंटारक्टिकाला गेलेले शास्त्रज्ञ आणि नौदलाचे लोक नकळत चक्क कवी बनतात ! १९४७ साली अंटारक्टिकाला गेलेल्या ॲडमिरल रिचर्ड बायर्ड ( Richard E Byrd ) ने लिहिले होते...

'At the bottom of this planet lies an enchanted continent ... like a sleeping princess. Sinister and beautitul, she lies in her frozen sumber,...her dreams irridescent ice halos around the sun and moon, her horizons pointed with pastel shades of pink, gold, green and blue.

बालकवीच्या हळुवारपणाने हा सैनिक या हिमराणीचे वर्णन करतोय ! इंद्रधनुची दुलई पांघरून बर्फाच्या कुशीत झोपलेल्या या हिमगौरीच्या हा बेटा चक्क प्रेमात पडलाय !

## हिमगौरीचे सखे–सोबती

हिमगौरी एकटी नाही. सृजनाचे, सजीवाचे हुंकार सर्वत्र कसे गजबजून राहिलेत. हिमगौरीच्या विछान्याभोवती रुंजी घालणारे हे प्राणी फार वेगळे आहेत. इतर कोणत्याही खंडाने हेवा करावा अशी समृद्ध कूस दक्षिण ध्रुवाला लाभलीये. अंटारक्टिकाच्या भूभागावर कोणत्याच प्रकारचे सजीव जवळजवळ नाहीत; पण अंटारक्टिकाचे समुद्र सजीवांनी नुसते भरलेत. पेंग्विन ( Pengvin ) हा दक्षिण ध्रुवाचा राष्ट्रीय पक्षी मानता येईल. येणाऱ्या पाहुण्याच्या स्वागताला ते नुसते सज्ज नसतात तर आतुरलेले असतात. आपल्या पहिल्या मोहिमेतील वीर तेथे उतरून तंबू वगैरे उभारण्यापूर्वीच त्याच्या भोवती फेर धरून या पक्ष्यांनी नाचावयास सुरवात केली होती ! मनुष्य हा या जगातील सर्वांत दगाबाज आणि धोकादायक प्राणी आहे याची या पक्ष्यांना आणि खुद्द हिमगौरीला पण अजून कल्पना नाही ! दक्षिण ध्रुवावर सुमारे चाळीस प्रकारचे पक्षी आहेत आणि हे सारे समुद्रपक्षी आहेत. समुद्रपक्षी आले म्हणजे मासे आलेच. आकडेवारी करताना चक्रावून जावे एवढे प्रचंड मासे दक्षिण ध्रुवावर

भरलेत. हे मासे संख्येने प्रचंड आहेत आणि आकाराने पण. मात्र मजेची गोष्ट अशी की, जगात माहीत असलेल्या माशांच्या वीस हजार जातींपैकी सुमारे फक्त शंभर जातीच दक्षिण ध्रुवावर सापडतात. त्यातूनही आश्चर्याची गोष्ट अशी की, दक्षिण ध्रुवावर सापडणाऱ्या जातींपैकी फारच थोड्या जाती जगात इतरत्र सापडतात. हिमगौरीबद्दल असलेल्या अनिवार ओढीने हे मासे इतरत्र जात नसतील किंवा आपल्या आवडत्या हिमगौरीसाठी निसर्गाने आखलेली, आपणाला माहीत नसलेली, कुठली तरी अज्ञात लक्ष्मणरेषा इतर ठिकाणच्या माशांना इकडे येऊ देत नसेल ! दक्षिण ध्रुवावरील माशांचा राजा आहे देवमासा (Whale) दक्षिण ध्रुव हे देवमाशांचे कोठार समजता येईल. जगात इतरत्र कोठेही एवढे देवमासे आढळत नाहीत. देवमासा ही एक बहुगुणी गोष्ट आहे. साऱ्या जगात देवमाशापासून जेवढे खाण्याचे तेल बनवले जाते तेवढे खाण्याचे तेल इतर सर्व मार्गांनी मिळूनही बनवले जात नाही. जगातील साठ टक्क्यांहून अधिक खाण्याचे तेल देवमासा देतो. केवळ रशिया आणि जपान या दोन देशांनीच आत्तापर्यंत दहा लाखाहून अधिक देवमाशांची शिकार केलेली आहे ! जपानला देवमाशापासून मिळणारे मांस हवे असते, तर रशियाला त्याच्यापासून मिळणाऱ्या तेलाची अधिक जरुरी असते. या शिकारीची सुरुवात केली ती नॉर्वेने. त्यांनी मुळी बोटीवरच देवमाशापासूनचचे उपयुक्त पदार्थ बनविण्याचा कारखाना उभारला ! पहिल्या महायुद्धाच्या वेळी बासष्ट बोटी, एकवीस तरंगते कारखाने आणि सहा जमिनीवरील कारखाने मिळून वर्षाला दहा हजार देवमाशांची शिकार करून त्यांची चरबी काढत होते. पहिल्या महायुद्धाच्या वेळी लागलेल्या अनेक शोधांमुळे युद्धानंतर देवमाशांची शिकार करणे फार सोपे झाले. उत्पादन इतके वाढले की, धंदा आतबट्ट्याचा ठरला आणि या धंद्यात मंदीची लाट आली. १९३०–३१ च्या सुमारास तेलाचे उत्पादन ३७ लाख बॅरल इतके झाले होते, (एक बॅरल म्हणजे सुमारे १५८ लिटर किंवा सुमारे सहा बॅरल म्हणजे एक टन) या उत्पादनामुळे आणि मंदीच्या लाटेमुळे त्या वेळी अनेक देशांनी या शिकारीबाबत काही नीतिनियम तयार केले. आज दक्षिण ध्रुवावर देवमाशांच्या प्रमुख सहा जाती आहेत आणि त्यांची संख्या एक कोटीच्या आसपास आहे !

देवमाशांच्या खालोखाल या विभागातील महत्त्वाचा जलचर म्हणजे सील (Seal) मासा किंबहुना सीलची शिकार हा मनुष्यप्राण्याने केलेला या विभागातला पहिला धंदा. वेगवेगळ्या प्रकारचे तीस लाखांहून अधिक सील येथे आहेत. सीलची लोकरी उबदार कातडी हो जगभर चैनीची बाब समजली जाते. ब्रिटन, अमेरिका, रशिया, फ्रान्स हे सारे देश चढाओढीने या धंद्यात आहेत. माहीत असलेल्या आकडेवारीप्रमाणे सत्तर साली रशियाने हत्ती जातीचे एक हजार सील पकडून एक उच्चांक केला होता. या देवमाशांना वा इतर माशांना खाण्यासाठी छोटे मासे हवेत. क्रिल ( krill ) नावाच्या छोटेखानी माशांनी अंटारक्टिकाचे समुद्र नुसते गच्च भरलेत. एका आकडेवारीप्रमाणे दहा कोटी मेट्रिक टन एवढ्या प्रचंड वजनाचे क्रिल या भागात आहेत. क्रिल हे एक सकस, चवदार उत्कृष्ट पूर्ण अन्न आहे. क्रिल माशाला पंधरा टक्क्यांहून अधिक प्रोटीन आहे. क्रिल हे कदाचित उद्याच्या जगाचे अन्न असेल. कारण वर्षाला चार ते पाच कोटी टन वजनाचे क्रिल माणसाने पकडून खाल्ले तरी क्रिलच्या एकूण संख्येवर काही परिणाम होणार नाही. वनस्पती व कीटक दक्षिण ध्रुवावर जवळजवळ नाहीतच हे आपण पाहिले. मात्र बुरशी, शेवाळे, दगडफुले या विभागात खूप आहेत. शाकाहारी क्रिल यांच्यावर आपली भूक भागवतो, क्रिल समुद्रपक्षी आणि देवमासा यांच्यासाठी कारणी येतो. परस्पर संबंधांचे निसर्गाने तयार केलेले सजीवांचे एक चक्र अविरतपणे फिरत राहते. मानव आपल्या आधाशीपणाने यात काही जबरदस्त गडबड-घोटाळा करेपर्यंत हे चक्र असेच फिरत राहील !

### तिळा उघड !

विज्ञानाने माणसाला 'तिळा दार उघड !' हा मंत्र दिला. जगभरचे बंदिस्त गुप्त खजिने माणसासमोर आले. नशीब दक्षिण ध्रुवाचे, तेथे नक्की किती आणि कसे गुप्त खजिने आहेत हे मानवाला अजून फारसे माहीत नाही; पण जे काही माहीत आहे ते जगातील कोणत्याही बनियाला मोह पाडावयास पुरेसे आहे ! १९०७ ते १९०९ या कालखंडात दक्षिण ध्रुवाच्या मोहिमेवर गेलेल्या ब्रिटिश पथकाला तेथे दगडी कोळशाचे साठे आहेत हे लक्षात आले. इंधन म्हणून त्या पथकांनी त्याचा उपयोग पण केला; पण त्या वेळी तिकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. कारण अंटारक्टिकाचा फक्त दोन टक्के भूभाग बर्फाने झाकलेला नाही. या मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ सुमारे दीड–दोन लाख किलोमीटर वर्ग एवढे आहे. त्या विभागा-



पुरतेच हे संशोधन ठेवावे लागले असते. त्या ठिकाणी जाऊन तेथे असलेल्या खनिजाचा अभ्यास करून ती बाहेर काढणे व्यापारी-दृष्ट्या किफायतशार नव्हते; पण आज जगभर, दररोज पेट्रोल आणि इतर खनिज पदार्थांचे दर वाढताहेत. बर्फाळ प्रदेशात जाणे वा बर्फाच्या खालचे पदार्थ अनेक मैल आत जाऊन काढणे आधुनिक विज्ञानाला शक्य आहे. जमिनीच्या वा बर्फाच्या आत गाडल्या गेलेल्या संपत्तीचा सुलभपणे शोध लावू शकणारी पायाळू यंत्रे आज आपल्याजवळ आहेत. महत्त्वाचे म्हणजे माणसाची भूक, आधाशीपणा म्हणा हवा तर—खूप वाढला आहे! सार्‍या अडचणी दूर करून त्याने उत्तर ध्रुवावर आपली घट्ट पकड केव्हाच बसवलीये आणि दक्षिण ध्रुव आपल्या पंजात पकडावयास सुरुवात केली आहे. क्रिलची शेती आणि खनिजांचे उत्पादन हे एकमेकाना पूरक धंदे आहेत हे अनेक बनियांनी पुरते हेरलंय!

जगभरच्या इतर प्रदेशांशी तुलना करून दक्षिण ध्रुवावर व्यापारी-दृष्ट्या उपयुक्त असे नऊशे (९००) खनिज पदार्थांचे साठे आहेत हे माणसाला समजलंय. त्यापैकी वीस साठे तर बर्फापासून मोकळ्या असलेल्या जमिनीवर आहेत. त्यापैकी प्रिन्स चार्लस पर्वतावरील लोखंडाचे साठे आणि ट्रान्सअंटारक्टिक पर्वतश्रेणीवरील कोळशांचे साठे हे व्यापारीदृष्ट्या फार किफायतशीर ठरतील हे लक्षात आलेले आहे. अंटारक्टिकात जेवढा कोळसा आहे तेवढा जगात इतरत्र कोठेच नाही हे पण विज्ञानाने हेरलंय. दक्षिण आफ्रिकेतील बुशवेल्ड (Bushveld) विभाग आणि ओन्टारिओचा मोन्टाना (Montana) आणि सडबरी (Sudbury) विभाग येथे जगातील खनिजांनी भरलेले समृद्ध साठे आहेत. या विभागात विपुल प्रमाणात लोह, तांबे, शिसे, जस्त, सोने, निकेल, क्रोमियम, प्लॅटिनियम, व्हॅनेडिअम हे धातू मिळतात. दक्षिण ध्रुवाजवळील पेनसॅकोल (Pensacola) डोंगरश्रेणीतील ड्युफेक मॅसिक (Dufck Massif) विभाग भूगर्भशास्त्रदृष्ट्या ओन्टिरो आणि बुशवेल्ड भागाशी मिळता—जुळता आहे. तेहतीस हजार किलोमीटर वर्ग येवढे क्षेत्रफळ असलेला आणि सात किलोमीटर जाडीच्या या भूभागावर सारे जग नजर ठेवून आहे. महत्त्वाचे म्हणजे वीस कोटी वर्षांपूर्वी मेसोझोईक (Mesozoic) कालखंडात ऑस्ट्रेलिया, भारत, आफ्रिका, लॅटिन अमेरिका हा सलग भूभाग होता हे आपण मागे पाहिलेले आहे. त्या विभागाला गोंडवन विभाग (Gondwan land) समजले जाते. म्हणजे कोणे एके काळी अंटारक्टिकातील पेनिसुलाची पर्वतराजी थेट ॲन्डेस (Andes) बरोबर जोडलेली होती. थोडक्यात म्हणजे पेरू आणि चिली येथे आहेत तसे शिसे आणि तांबे यांचे अमर्याद साठे या विभागात पण असतील. पूर्व अंटारक्टिकाच्या बऱ्याच मोठ्या भागाची जडणघडण ही ऑस्ट्रेलिया, पूर्वआफ्रिका येथील युरेनिअम देणाऱ्या भागाशी जुळते. आणखी शंभर—दोनशे वर्षांत कारखान्यांनी हा भाग गिरणगावाची कळा घेईल!

## ... तर झोप उडेल!

मात्र दक्षिण ध्रुवाला खरा धोका आहे तो तेथे असलेल्या पेट्रोल आणि नैसर्गिक वायूच्या साठ्यामुळे. दक्षिण ध्रुवावर पुरेशा प्रमाणात तेल मिळेल हे आता शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालंय, अमेरिकेतून गेलेल्या शास्त्रज्ञाना बेलिंगहॉसन, रॉस आणि वेडेल या विभागात एक खास प्रकारचे दगडाचे थर (Unmetamorphosed tertiaxy Sediment) आढळलेत आपल्या सशोधन-तुकडीने पण तेथील या प्रकारचे दगड आणलेत आणि या प्रकारच्या दगडाचे आणि तेलाचे परस्पर संबंध जवळजवळ प्रस्थापित झालेले आहेत. बहात्तर साली अमेरिकेने केलेल्या मोहिमेत रॉस समुद्र (Ross Sea) या विभागात जवळजवळ पंधराशे फूट खोलीची चार भोके खोदण्यात आली होती. त्यांपैकी तीन भोकांमधून मिथेन, ईथेन आणि ईथिलिन हे तीन वायू बाहेर पडले. मिथेन वायू तसा कोठेही फार खोलवर खोदले की मिळतो; पण इथेन आणि इथिलिन याचे तेल मिळण्याशी असलेले नाते जगजाहीर आहे. त्यातूनही जेथे तेल मिळण्याची खूप शक्यता आहे अशा विभागापासून फार दूरवर हे खोदकाम करावे लागले. कारण अमेरिकन शास्त्रज्ञानी बरोबर घेतलेले ग्लोमर चॅलेंजर (Glomer Challenger) हे जहाज त्या ठिकाणापर्यंत जाऊ शकत नव्हते. अमेरिकेच्या भूगर्भसंशोधन विभागाने १९७३ साली प्रसिद्ध केलेल्या एका अहवालाप्रमाणे या विभागात किमान पंधराशे कोटी बॅरल एवढे तेल असेल. तो अदाज १९७९ मध्ये सुधारून पाच हजार कोटी बॅरल इतका वाढवला गेला. अमेरिका आणि रशियाने तो आकडा आता आणखी वर नेला आहे. अलास्कामध्ये मिळते त्यापेक्षा अधिक तेल या विभागात मिळेल असे त्या दोघाचेही सांगणे आहे.

खूप तेल आहे हे लक्षात आलंय; पण साऱ्या अंटार्क्टिकामध्ये ते कोठे व कसे पसरले आहे हे अजून पूर्णपणे अभ्यासले गेलेले नाही. तो अभ्यास करण्यासाठी खास जहाजे आणि बर्फात व पाण्यात खूप खोलवर खणू शकणारी यंत्रे बनवायची आहेत. या सर्व अभ्यासानंतर व्यापारी-दृष्ट्या हे सारे किती किफायतशीर आहे हे ठरवून प्रत्यक्ष उत्पादन करवयाचंय. प्रत्येक पावलावर पोटभर अडचणी आहेत; पण तेलाच्या किंमती एवढ्या वेगाने वाढताहेत आणि जगभरचे साठे एवढ्या झपाट्याने कमी होताहेत की, हे काम प्रगत देश नेटाने करताहेत. या दशकाच्या अखेरीपर्यंत दक्षिण ध्रुवावरील वादळी वाऱ्याना आणि हिमखंडाना तोंड देत अमेरिकन व रशियन बोटी या विभागात संचार करतील. आजच सहा हजार फूट खोल भोक पाडण्याचे तंत्र अवगत झालय. आणखी पाच वर्षांत हे शास्त्रज्ञ वीस हजार फूट खोलवर भोक पाडून तेलाला बाहेर यावयास वाट देतील. खुदाई काम करणारी यंत्रे व तेल साठवण्याच्या टाक्या हिमखंडाच्या खाली दाब सहन करत सुरक्षिततेने ठेवण्याचे तंत्र त्या वेळेपर्यंत अवगत होईल. सारा भाग एका नव्या हालचालीने गजबजून जाईल. या विभागात जाऊन आपला पण झेंडा उभारायचा प्रगत-अप्रगत देशाचा प्रयत्न म्हणून सुरू झाले आहेत.

हा उद्योग येथे सुरू झाला तर दक्षिण ध्रुवावर काय काय परिणाम होतील याचे नक्की अंदाज शास्त्रज्ञांनी अद्याप बांधलेले नाहीत किंवा बांधलेले असतील तर आपल्याला सांगितलेले नाहीत; पण जी माहिती मिळते ती झोप उडवणारी आहे तेलामुळे व तेलामुळे येणाऱ्या दूषित वायूमुळे वातावरणाचा काही भाग तरी खराब होईल. खोदकाम करणारी यंत्रे व तेल साठवण्याच्या टाक्या हिमखंडाखाली असतील. त्यातून पसरणारे तेल त्यामुळे वाहून न जाता खूप काळपर्यंत बर्फा-

खाली राहील व त्याचे अगदी सावकाश विघटन होईल. या सर्वांचा तेथील माशांच्या जीवनावर परिणाम होईल. क्रिल मरतील आणि क्रिल खाणारे देवमासे आणि सील पण ! एक नैसर्गिक संतुलन कदाचित् पार बिघडून जाईल ! दक्षिण ध्रुवावरील हवा व पाणी याचा साऱ्या जगातील हवेवर व पाण्यावर होणारा परिणाम आपणाला नक्की माहीत नाही; पण त्याचे काही तरी जवळचे नाते आहे हे जाणवले आहे. जगभर जेथे जेथे मासे पकडण्याचा मोठा धंदा होतो तो अंटार्क्टिकामुळ होतो असे मानतात. उदाहरणार्थ ब्राझीलमधील टघुना, अर्जेंटिनामधील हेक, दक्षिण आफ्रिकेतील पिलचर्ड (Pilchard ऑस्ट्रेलिआमधील हेरिंग ( herring ) आणि पेरूमधील अचोवेटा (Achoveta) या साऱ्या मासेमारीसाठी प्रसिद्ध असलेल्या भागात अंटार्क्टिकाच्या समुद्रातून सरकत जाणारे पाणी असते. अंटार्क्टिकातील पाण्यात शेवाळे, बुरशी आणि त्यामुळे अनेक जीवनसत्त्वे असतात. त्या जीवनसत्त्वावर या निरनिराळ्या ठिकाणचे मासे वाढतात, फुलतात, फळतात. हे पाणी दूषित झाले तर कदाचित् क्रिलच नव्हे तर हे अनेक मासे या जगाचा कायमचा निरोप घेतील. अमेरिकेतून येणाऱ्या तेजाबच्या पावसाने कॅनडामधील जंगले आणि मासे नाहीसे झाले हे आपण मागे ' विज्ञानेश्वरीत ' पाहिलेले आहे. कॅनडाने फार मोठा आरडाओरडा करूनही अमेरिकेच्या औद्योगिक-धोरणात नंतर काही बदल झाले नाहीत हे पण आपण पाहिलंय. जगभरचे प्रदूषण-विरोधक म्हणून तसे सावध आहेत. अंटार्क्टिक–करारनाम्याप्रमाणे ( Antaretic traty ) या भागातील हवेला व जीवसृष्टीला थोडीही बाधा पोचेल असे काही न करावयास हे सारे देश प्रतिज्ञाबद्ध आहेत; पण ज्या गतीने व ज्या प्रकारे संशोधन होतंय त्यावरून कोणीच या करारातील काही मनावर घेतलेले नाही, हे जगभरच्या निसर्गावर प्रेम करणाऱ्या लोकांच्या लक्षात आलंय; पण कोणाला जाणवूही नये एवढा जगभरच्या निसर्गप्रेमी लोकांचा आवाज क्षीण आहे ! शांतपणे झोपलेल्या हिमगौरीला कल्पनाही नाही की, तिच्यावर जिवापासून प्रेम करणारे जगभरचे बुटके फार फार खुजे झालेत आणि वखवखलेल्या नजरेने एक राक्षस तिच्या दाराभोवती फेऱ्या मारतोय !

## चीनच्या पुढे भारत

आपण कवितेवर प्रेम केले म्हणून काही आपणाला वास्तवाशी घटस्फोट घेता नाही. कविता करून वा वाचून पोट भरत असते तर आपल्यापैकी अनेकांनी नोकरी केलीच नसती ! एकविसाव्या शतकात राष्ट्र या कल्पनेलाच काही अर्थ असेल का हा वादाचा प्रश्न होऊ शकतो; पण राष्ट्र म्हणून जगावयाचे असेल तर आपण या स्पर्धेत मागे राहून चालणार नव्हते. आपण पण या भोज्याला शिवून येणे जरुरीचे होते ! ते काम आपण फार सफाईने केले. जगातील एकूण बारा राष्ट्रांनी यापूर्वी दक्षिण ध्रुवावर आपले झेंडे उभारले होते; पण हे सारे देश प्रगत देश आहेत. विकसनशील देशातील भारत हे दक्षिण ध्रुवावर झेंडा उभारणारे पहिले राष्ट्र आहे. आपला क्रमांक तेरावा आहे. चीन आपल्यानंतर एक महिन्याने तेथे पोचला !

विज्ञान आणि औद्योगिक प्रगती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हे पण आपण अनेकदा नकळत विसरून जातो. दक्षिण ध्रुवावर शास्त्रज्ञांनी केलेले व शास्त्रज्ञ करीत असलेले प्रयोग अनेक कारणांमुळ फार महत्त्वाचे आहेत. अगदी प्रदूषणाशीसुद्धा त्याचा फार महत्त्वाचा संबंध आहे. साऱ्या जगभरचे पाणी व हवा माणसाने दूषित केले आहे. दूषित हवेचा वा पाण्याचा अभ्यास करताना नैसर्गिकदृष्ट्या अजिबात न बिघडलेली हवा व पाणी आपणाला तुलनेसाठी मिळवावी लागेल. अशी खरी नैसर्गिक, निर्दोष हवा व पाणी आपणाला दक्षिण ध्रुवावर जाऊन मिळवावी लागते. अंटारक्टिकाचा अभ्यास करताना प्रदूषण जगभर किती वाढले आहे हे पण आणखी एका मार्गाने कळते. जगभर माणूस विचार न करता डी. डी. टी. वापरतो आहे. डी. डी. टी. चे अत्यल्प भाग तिथल्या बर्फात आणि माशांत पण आढळलेत. दक्षिण ध्रुवावरील कोरड्या भागातील (Dry Valley) जमीन बर्फापासून मुक्त आहे. मंगळावर व्हायकिंग पाठवून तेथील मातीची आपण तपासणी केली होती. दक्षिण ध्रुवावरील कोरड्या भागातील मातीचे मंगळावरील मातीशी असलेले नाते शास्त्रज्ञांना आता जाणवले आहे. विश्वाची जडणघडण पुढे-मागे या अभ्यासातून आपणाला समजू शकेल. कोरड्या भागात काही ठिकाणी मुरमासारख्या दगडाच्या आत सूर्यप्रकाश व हवेतील आर्द्रता याचा फायदा घेऊन वाढलेले शेवाळे (microflora) आढळले आहे. व्हायकिंगने मंगळावर नमुने गोळा करताना कोणती चूक केली आहे हे यावरून शास्त्रज्ञांच्या लक्षात आले. इतर ग्रहांवर उपग्रहात बसून जाणाऱ्या आपल्या प्रयोगशाळा आता नमुने गोळा करावयास यामुळे नवीन तंत्राचा उपयोग करतील.

चुंबकीय दक्षिण ध्रुवाच्या शोधात असलेल्या शास्त्रज्ञांनी अठराशेतीस साली अंटारक्टिकावर पाऊल टाकले. त्यानंतर वेगवेगळ्या कारणांनी शास्त्रज्ञ या ठिकाणी येत राहिलेत. येथील बर्फाची आणि उत्तर ध्रुवावरील बर्फाच्या रचनेतील फरक कोणाला शोधावयाचा होता तर कोणाला समुद्राचे प्रवाह आणि वादळी वाऱ्यांचा अभ्यास करावयाचा होता. जगाचे हवामान, वादळी वारे या साऱ्या गोष्टींचे नियंत्रण या भागातून होते का व ते कसे होते ? हे पाहण्यासाठी तीन–चार राष्ट्रांनी संयुक्तपणे आखलेली मोहीम तर गेली तीन–चार वर्षे फार उपयुक्त माहिती गोळा करते आहे. अमेरिका आणि रशिया संयुक्तपणे समुद्रातील प्रवाहांचा अभ्यास करण्यात सध्या गुंतलेत. परस्पर सहकार्याचे आणि सामंजस्याचे एक युग दक्षिण ध्रुवाने दिलेल्या आव्हानातून असे कदाचित जन्माला येईल. चंद्रावर व मंगळावर गेल्यावर आपण पृथ्वीवरचे ते सारे एक हे माणसाला जसे जाणवते, तसे कदाचित अंटारक्टिकामुळे पण समजेल. भारताचे अभियानदल यशस्वी होऊन परत आले त्या वेळी अनेक विकसनशील देशांनी, विशेषतः आफ्रिकेतील देशांनी आपणाला हवे असल्यास आर्थिक, तांत्रिक वा इतर पाहिजे ती मदत या कार्यासाठी द्यावयाची इच्छा प्रदर्शित केली होती. तो आजच्या जगात फार दुर्मिळ अनुभव आहे !

## आपल्या मोहिमा........

गप्पांच्या ओघात डॉ. कासिम अनेक गोष्टी स्पष्ट करत होते. प्रेक्षक आपल्या विचारांची भर घालत होते. मनात एक एकसंघ चित्र उभे रहात होते. मध्ययुगातील मोगल राजपुत्राची आठवण

व्हावी असे उमदे व्यक्तिमत्त्व डॉ. कासिमनां लाभलंय. अनेकाना त्याना पाहून जेम्स बाँडची आठवण होते ! ते सांगत होते, आपल्या मोहिमेतील उद्देश अगदी साधे होते. ते तुम्हाला बहुतेक माहीत आहेत. काही सर्वांना माहीत असूनही स्पष्टपणे बोलले जात नाहीत ! आपल्या या मोहिमा अशाच यापुढे सुरू राहतील. पहिल्या मोहिमेपेक्षा दुसऱ्या मोहिमेचा आवाका मोठा आहे. प्रयोगही अधिक प्रगत आहेत; पण तरीही आपल्या मोहिमा व आपले प्रयोग फार मर्यादित उद्देशानी सुरू आहेत हे मान्य करावयास हवेच. पहिल्या मोहिमेला आपण एक कोटी ऐंशी लाख रुपये खर्च केले. दुसऱ्याचा खर्च तीन कोटी रुपये आहे.– हा खर्च यापेक्षा बराच अधिक असावा आणि वेगवेगळ्या ठिकाणी तो दाखवल्यामुळे समजत नसावा असे जमलेल्यापैकी अनेकांना वाटले !

आपल्या पहिल्या मोहिमेसाठी आपण नॉर्वेचे 'पोलर सर्कल' (Poler Circle) हे बर्फ फोडू शकणारे जहाज भाड्याने घेतले होते. खलाशी पण नॉर्वेचेच. अनुभवी खलाशी होते. आपल्या दलात एकूण एकवीस प्रयोगवीर होते. देशातील सात प्रमुख प्रयोग शाळांमधून ते निवडले होते. २६ नोव्हेंबर १९८१ ला पोलर सर्कल गोव्यात आले. १६ डिसेंबर १९८१ ला आपल्या दलाने तेथून प्रस्थान केले आणि १६ डिसेंबरला आपण मॉरिशसला पोचलो. मॉरिशस आपण २६ डिसेंबरला सोडले. मॉरिशसपासून अटार्क्टिकापर्यंतच्या प्रवासात आपणाला दोन प्रमुख प्रयोग करावयाचे होते. वाटेतील अनेक ठिकाणचे पाणी, जलचर यांचा अभ्यास होणार होता. आपण जसजसे अटारक्टिकाच्या जवळ जातो तसतशी हवा कमी कमी दूषित होत जाते. हवा कोणत्या क्रमाने स्वच्छ आणि पवित्र होत जाते ते आपण अभ्यासले. चाळीस ते पन्नास अंश अक्षांशांमधून प्रवास करताना खवळलेला, उधाण आलेला, घोगावणारा समुद्र आपणाला लागतो त्याला 'रोअरिंग फॉर्टिज' (Roaring Forties) या नावाने संबोधले जाते. हा समुद्र घोंगावणारा आणि हादरे देणारा आहे. कारण या भागात वाटेत कुठेही भूभाग न भेटता समुद्र पृथ्वीप्रदक्षिणा करतो. जमिनीवर आपटून त्याची ताकद कोठेच कमी होत नाही. याच भागात पुढे हिंदी महासागर, पॅसिफिक महासागर आणि अटलांटिक महासागर एकमेकात मिळून अटारक्टिक महासागराचा एक भाग बनतात.

'रोअरिंग फॉर्टिज 'मधून जाताना आपल्या पोलर सर्कलला फार झटके सहन करावे लागले. एकूणपन्नास मीटर लांबीचे आणि सहाशे टन वजनाचे ते एक छोटेखानी जहाज होते. रोअरिंग फॉर्टिज पार केल्यावर ५५ ते ६० अंश अक्षांशातील प्रवास अधिक धोकादायक होता. हा भाग वाहत्या हिमखंडाचा प्रदेश समजला जातो. एकूण अकरा हजार किलोमीटर्सचा असा साहसाने भरलेला प्रवास करून आपण ८ जानेवारी १९८२ ला दक्षिण गंगोत्रीला पोचलो. ९ जानेवारीला भारतीय समयानुसार पहाटेचा एक वाजण्यापूर्वी आपण आपले हेलिकॉप्टर वापरून आपले तंबू, अन्न, यंत्रसामुग्री तेथे उतरवले. आपण तेथे तंबू उभारण्यापूर्वीच पेंग्विन पक्ष्यांनी आपल्या भोवती फेर धरून नाचावयास सुरुवात केलेली होती. दिल्लीत काही खास काम निघाल्यामुळे ९ जानेवारीलाच डॉ. कासिम परत फिरले. बाकी प्रयोगवीरानी प्रयोग सुरू केले. तेथील दगडाचे व मातीचे नमुने गोळा केले. बर्फाची स्फटिकरचना, त्याची शुद्धता तपासली. अंटारक्टिकावर रेडिओलहरींचा अजिबात उपद्रव नाही म्हणून रेडिओलहरींच्या संबंधात संशोधन केले. त्या विभागातील चुंबकीय क्षेत्र मोजले. कारण उत्तर आणि दक्षिण ध्रुवावर सर्वाधिक चुंबकीय शक्ति असते. समुद्रपक्षी आणि देवमासा यांच्या जाती अभ्यासल्या, हवामानाचा-अभ्यास करण्यासाठी आपली दक्षिण गंगोत्री ही प्रयोगशाळा तेथे उभारली. आपल्याला अभिमान वाटावा अशी गोष्ट म्हणजे आपण वापरलेली अनेक उपकरणे आपल्या देशात बनलेली होती. विजेऱ्या, घड्याळे, दूरध्वनी, कपडे, सिमेंट, अन्न सारे आपण बनवलेले होते. शून्याखाली वीस अंश या तपमानात या सर्वांनी चांगली कामगिरी बजावली. हवामानाचा अभ्यास करण्यासाठी आपण उभारलेल्या प्रयोगशाळेतील बहुतेक सर्व उपकरणे, अगदी संगणक ( compoter ) सुद्धा भारतीय बनावटीचे होते व त्यांची सेवा समाधानकारक होती. एकूण दहा दिवस आपण तेथे होतो. अंतरराष्ट्रीय नियमांप्रमाणे परत येण्यापूर्वी प्रत्येक पथकाने एक झोपडी तेथे उभारावयाची असते; कपडे, अन्न, औषधे, दारू, तंबाखू सारे त्यात सोडून यावयाचे असते. आपण अशी एक झकास झोपडी उभारली आहे. आपल्या दुसऱ्या पथकाला तिचा फायदा होईल. महत्त्वाचे म्हणजे दुसऱ्या पथकाने कोठून जावे व कसे उतरावयाचे याचीही आपण फार उपयुक्त माहिती गोळा केली आहे.

आपली दुसरी मोहीम अधिक महत्त्वाकांक्षी आहे. तिसरी त्यापेक्षा पण महत्त्वाकांक्षी असेल ! चढत्या क्रमाने हे पराक्रम सुरू राहतील. आपल्या दुसऱ्या पथकाचे नेतृत्व भारताच्या भूगर्भसंशोधन विभागाचे प्रमुख डॉ. रैना करणार आहेत. नऊ शास्त्रज्ञ, नौदलाचे पंधरा वरिष्ठ अधिकारी आणि वृत्तचित्र विभागाचे तंत्रज्ञ या मोहिमेत असतील. आपण त्या मोहिमेत काय करणार याबाबत अनेकांचे अनेक तर्क आहेत. खेळ कितीही साधा असला तरी कोणताच खेळाडू खेळाच्या पूर्वी आपले पत्ते दुसऱ्याला दाखवत नाही ! आपण तेथे दोन पक्की घरे आणि प्रयोगशाळा या वेळी उभारून बर्फाच्छादित प्रदेशात विमानाची धावपट्टी बांधण्याचा आणि ती सुरक्षीत ठेवून वापरण्याचा आपल्या तंत्रज्ञाना अनुभव आहे. या वेळी आपण दहा हजार फूट लांबीची विमानाची धावपट्टी तेथे बांधून भारत अंटारक्टिका सरळ विमानप्रवासाची सोय करू असा आपल्या शेजारी मित्राचा समज आहे ! रशियाने आपल्याला त्यांनी बांधलेली घरे आणि धावपट्टी कायमची वापरावयाची परवानगी दिली होती; पण आपण ती नम्रपणे नाकारली, असा पण एक सार्वत्रिक समाज आहे. आपण कोणत्याही हवामानात काम देऊ शकणारी जी घरे तेथे वापरणार आहोत ती आपल्या रुरकी येथील 'सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्स्टिट्यूटने बनवलीत.' भारतातील अॅल्युमिनियम आणि विशेष प्रकारचा धागा ( fibreglass ) यापासून बनवलेल्या या घरांचे वजन चार टनांपर्यंत आहे आणि शून्याखाली ८० अंश तपमानापर्यंत त्याना काही होणार नाही. या वेळचे आपले दल तेथे दोन महिने राहील आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीपर्यंत त्याना तेथे पोचावयास हवे. त्यानंतरचे दल कदाचित सहा महिने राहील. कायम आपला माणूस तेथे ठेवण्याचा, धावपट्टी वापरावयाचा, दूरध्वनिसंपर्क स्थापन करण्याचा हे त्यानंतरचे आपले प्रयत्न असतील.

## दक्षिण गंगोत्रीचे आव्हान

कार्यक्रम तसा खूप वेळ चाललाय. अजून कोणी जांभई दिलेली नाही; पण यापुढे कुणी ती देणारच नाही याची आता तशी खात्री नाही ! अनेकांनी अनेक प्रकारची माहिती दिली आहे, गोळा केली आहे. प्रश्नोत्तरे तशी संपत आलीत. मैफिल आवरती घेतली जात आहे; पण माणसे तशी एकूणच ग्रेट असतात. एकजण शेवटी या सेनापतीला विचारतोच, 'यात तुमचे वा तुमच्या संघाचे साहस वगैरे कुठे आले ? नॉर्वेकडून भाड्याने घेतलेली नौका होती. कसलेले अनुभवी नॉर्वेहून आलेले खलाशी होते. भरपूर अन्न, दारू, तंबाखू बरोबर होती. उपकरणे तयार होती. गरम कपडे होते काही मामुली किमान साधे प्रयोग तेथे उतरून करावयाचे होते. हा येवढा गाजा-वाजा, सत्कार वगैरे कशासाठी ?'

— डॉ. कासिम दिलखुलास पणे हसतात. ते म्हणतात, 'सत्कार करावयास मी सांगितलेले नव्हते. ते तसे फारसे झालेले पण नाहीत. आमच्यापैकी कोणीच आपण कोलंबस वा तेनसिंग असल्याचा दावा केलेला नाही; पण साहस, धोका होता की नाही हे ठरवणे पण तसे सोपे नाही. डोंगराचा कडा चढताना एखादा जण हुतात्मा होतो. हिमालयात भटकावयास गेलात तर समोरून घसरत येणारा एखादा हिमखंड तुम्हाला काही बोटांच्या अंतराने चुकवून पुढे जातो. साहसाला सामोरे जाण्याची मनाची पक्की तयारी असावी लागते ! निसर्गाचे भव्य, रौद्र, सुंदर रूप बघण्यासाठी डोळे भुकेले असावे लागतात ! घरून निघण्यापूर्वी घरच्यांच्या काळजाचा ठोका कुठे तरी चुकलाय हे अनुभवावे लागते. आमच्याआधी फक्त एक दिवस हिमखंडावर आपटून जर्मन नौकेचे तुकडे-तुकडे झाले होते. परत आल्यावर चावरा वारा आणि बर्फ यामुळे पाय आखडून अनेकांना बसावे लागले. यात काही साहस आहे की नाही आणि निसर्गसौंदर्य वगैरे भटते की नाही हे या ठिकाणी जाऊन आलेल्यांनी ठरवावे ! चुलीसमोर बसणाऱ्यांनी याच्या उठाठेवी न केलेल्या बऱ्या असे मला वाटते !'

— डॉ. कासिम सांगत होते त्या वेळी मला नकळत गेल्या वर्षीचा प्रसंग आठवला. मी आणि माझे कोटयाचे मित्र श्री. अनंत घन त्या वेळी पहेलगाववरून चालत अमरनाथला चाललो होतो. तीन दिवसाचा प्रवास करून आम्ही पंचतरणीला पोचलो. धुवाधार पाऊस, गडद थंडी, प्रखर उन्हाळा अशी निसर्गाची क्षणाक्षणाला बदलणारी रूपे आम्ही तीन दिवसांत अनुभवली होती. समोर चमकणारी बर्फाच्छादित शिखरे होती. दूरवर गर्द गच्च भरलेली झाडी होती. खालून नदी वाहात होती. वर बर्फाचा भला मोठा पूल बनलेला होता. त्या पुलावरून आम्ही पुढे जात होतो. वर्णन करता येणार नाही असा तो सोहळा होता. त्या बर्फाच्या पुलावर गिटार छेडत एक अमेरिकन हिप्पी आणि त्याची प्रेयसी बसली होती. मला तो तन्मय होऊन सतार छेडणारा सनातन शिवभक्त वाटला. भोवतालचे रूप आणि वाहणारे स्वर यात बुडालेली त्याची प्रेयसी भानावर आली त्या वेळी आम्हाला म्हणाली, 'आम्ही दोघे साऱ्या जगभर भटकलोय; पण स्वित्झर्लंडमध्येसुद्धा इतके सुंदर आम्ही कोठे काही पाहिलेले नाही ! इतका सुंदर निसर्ग जगात आम्हाला आणखी कोठेच आढळला नाही; पण तुमच्या देशातील तरुण हे सारे बघावयास हौसेने का येत नाहीत ?'

त्या प्रश्नाचे उत्तर त्या वेळी माझ्याकडे नव्हते. आजही नाही. गाडी कोठे तरी रूळ बदलते आहे, येवढेच मला तीव्रतेने जाणवलेले आहे दक्षिण गंगोत्री मोहिमेचे राजकीय आणि शास्त्रीय महत्त्व आपण पूर्णपणे विसरलो तरी चालेल — या मोहिमेमुळे या देशातील तरुणांना, निसर्गाची आणि साहसाची हाक पुसटशी जरी ऐकू आली तरी ही मोहीम फत्ते झाली असे म्हणावे लागेल ! □

---

## भोसले शासनाचे एक वर्ष : पृष्ठ ४ वरून

राज्य आहे ! त्याचे श्रेय भोसले जरूर घेऊ शकतात; परंतु त्याची कसोटी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या काळातच लागणार आहे. अंतुलेंनी सुरू केलेल्या संजय निराधार योजनेतील भ्रष्टाचार मुख्यमंत्री भोसले आपल्या कारकीर्दीत थांबवू शकलेले नाहीत, हे या संदर्भातले दुसरे चित्र आहे. मच्छीमारांसाठी सवलतीचा विमा आणि मोफत माध्यमिक शिक्षण हे दोन नवे निर्णय मुख्यमंत्र्यांनी आपल्या सरकारच्या वाढदिवशी जाहीर केले आहेत.

शासन-व्यवहार गतिमान करण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या मोहिमा हाती घेतल्याचा दावा मुख्यमंत्र्यांच्या वर्षपूर्तीअखेरीस काढण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. फेब्रुवारीतील एका आठवड्यात २८ हजारांहून अधिक फाइल्स निकालात काढण्यात आल्या आहेत असे पत्रकात म्हटलंय. अर्थात फेब्रुवारीनंतरच्या दहा-महिन्यांतील शासनव्यवहाराच्या गतीबाबत या निवेदनात उल्लेख नाही. बंडखोरीच्या वाढत्या उद्रेकाबरोबर प्रशासनही थंडावत चालल्याचं चित्र दुसऱ्या बाजूला दिसते आहे.

येथे आणखी एक जमेची बाजूही सांगितली पाहिजे. जमीनधारणा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या मंत्रिमंडळाच्या उपसमितीने आतापर्यंत १२० ते १३० प्रकरणे हातावेगळी केल्याचे अर्धवट मिळालेल्या एका मंत्र्यानेच सांगितले. ज्या प्रकरणी आधीच्या सरकारने काहीच हालचाल केली नव्हती किंबहुना त्याचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केला होता. या पार्श्वभूमीवर हे उदाहरण महत्त्वाचे आहे.

कल्याणमध्ये शिवजयंतीची मिरवणूक काढू देण्यास परवानगी देण्याचे धाडस मुख्यमंत्री दाखवू शकले. त्या दिवशी शांततेने मिरवणूक पार पाडून सरकारने आपल्या अस्तित्वाची जशी जाणीव करून दिली, तसेच, जणू सरकारच अस्तित्वात नसावं, असं उलट चित्रही १८, १९ ऑगस्ट रोजी मुंबईत दिसलं. पोलीस बंडखोरांच्या हालचालींनी वेग घेतला होता आणि मुख्यमंत्री दिल्लीत होते. त्या दिवशी पोलिसांच्या बंडाचा उद्रेक होऊन मुंबईत दंगल उसळली. दंगल आटोक्यात आणण्यासाठी लष्कराला पाचारण करावं लागलं. त्या दोन दिवसातले निर्णय केन्द्राकडूनच घेतले गेले. केन्द्रीय गृहसचिव टी. एन. चतुर्वेदी त्या वेळी परिस्थिती हाताळण्याचं काम करीत होते. परिस्थिती राज्यसरकारच्या इतकी आटोक्याबाहेर गेली होती की, खुद्द मुख्यमंत्र्यांना सांताक्रूझ विमानतळावरून आपल्या 'रायगड'

न वासस्थानी हेलिकाप्टरनं जावं लागलं होतं.

नेतृत्व देण्याची क्षमता बाबासाहेब भोसले यांच्याकडे नाही. प्रशासनावरील त्यांची पकड मजबूत नाहीच; परंतु पक्षावर ते कधीच वचक बसवू शकले नाहीत. **विधिमंडळात निर्विवाद बहुमत असलेल्या पक्षाचे अल्पमतातील मुख्यमंत्री असेच मुख्यमंत्री बॅ. भोसले यांचे वर्णन करावे लागेल.**

अगदी सुरुवातीच्या काळात भोसले अंतुलेंच्या कलानेच वागत होते; परंतु राज्यपालानी अंतुलेंवर फौजदारी खटला भरण्यास परवानगी देताच अंतुले गटाने उघड संघर्षाचा पवित्रा घेतला. १२ जुलै रोजी झालेल्या बंडखोर आमदारांच्या बैठकीत भोसले हटावचा पहिला ठराव झाला; पण पहिला आणि खरा दणका विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भोसले सरकारला मिळाला! २७ जुलै रोजी ही निवडणूक झाली. ३२ आमदारांनी पहिल्या फेरीतच बंडखोरी केली. एकूण ७५ ते ७७ आमदाराची मते फुटली आणि विधानसभेत रिपब्लिकन पक्षाचा आमदार नसताना या बंडखोरांच्या मतावर रा. सु. गवई विधानपरिषदेवर निवडून आले. या जागांसाठी उभ्या असलेल्या इंदिरा कॉंग्रेसच्या दोन बंडखोर उमेदवारांसाठी दिलीप ढमढेरे आणि शरयू ठाकूर या दोन आमदारांनी सह्या केल्या होत्या.

विधानपरिषदेच्या सभापतिपदाच्या निवडणुकीसाठी गुप्त मतदानाऐवजी उघड मतदानाचा पवित्रा मुख्यमंत्र्यानी घेतला नसता तर रा. सु. गवई त्या पदावरही सहज निवडून आले नसते.

या पार्श्वभूमीवर १० ऑगस्ट रोजी झालेल्या महाराष्ट्रातील खासदारांच्या बैठकीत भोसलेंविरुद्ध नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यानंतर झालेल्या बैठकीतूनही हा सूर कायम राहिला आहे.

या काळात बंडखोरी आणि प्रशासन याबाबत काही पावले उचलण्याचा प्रयत्न भोसलेंनी केलेला दिसतो. ३१ जुलै रोजी अंतुलेंचे निकटवर्ती समजले जाणारे राज्याचे मुख्यसचिव पद्माकर गवई यांची मुख्यमंत्र्यांनी राज्यवीजमंडळाच्या सचिवपदी बदली केली. यावर बरंच वादळ उठलं. गवई दलितवर्गीय असल्याने त्याचे संभाव्य परिणाम केंद्रालाही जाणवले. शेवटी त्यांना केंद्रीय सचिवपदी घेण्यात आले.

साखरसम्राटांविरुद्ध मुख्यमंत्री नेहमीच वक्तव्ये देत आले. मराठा लॉबी मुख्यमंत्र्यांच्या विरोधातच होती. तिचा वरचष्मा कमी करण्याच्या दृष्टीने भोसलेंनी मार्केटिंग फेडरेशनचे विभाजन करून स्वतंत्र कापूस उत्पादक सहकारी फेडरेशन निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भोसले विरोधकांचे म्होरके श्री. बाळासाहेब पवार हे मार्केटिंग फेडरेशनचे अध्यक्ष आहेत. विभाजनाच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर श्री. पवार यांची पुन्हा एकमताने फेडरेशनच्या अध्यक्षपदी झालेली निवड सूचक आहे.

साखरसम्राटांविरुद्ध बाबासाहेब जसे सतत बोलतात तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या विरुद्धही संधी मिळेल तिथे बोलत असतात. यशवंतरावांवर त्यांचा स्वतःचा वैयक्तिक रागही आहे. भोसलेंना राजकारणात पुढे येऊ देण्यास साहेबांनी नेहमीच अटकाव केल्याचे त्यांचे कुटुंबीय सांगतात. तुळशीदास जाधव आणि साहेब यांच्यातील वितुष्टही यामागे आहे.

नुकत्याच झालेल्या नागपूर अधिवेशनाच्या वेळी बाबासाहेबांनी सहा बंडखोर आमदारांवर केलेली शिस्तभंगाची कारवाई आणि तेरा जानेवारीला आपल्या मंत्रिमंडळातून सर्वश्री बसीर, स्वरूपसिंह नाईक आणि रवींद्र राऊत यांना दिलेला अर्धचंद्र हे भोसलेंनी अलीकडेच घेतलेले आक्रमक पवित्रे. हे दोन निर्णय वगळता भोसलेंनी आक्रमक पवित्रा घेतलेला दिसत नाही.

भोसलेंचा राजकीय आलेख मांडताना दोन घटनांचा उल्लेख करावाच लागेल. या घटनामुळे त्यांच्या प्रतिमेस बट्टा लागला. एक म्हणजे पावसाळी अधिवेशनात विधानपरिषदेत प्रा. ग. प्र. प्रधान यांनी मांडलेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतर विधेयकावर मुख्यमंत्र्यानी घेतलेली विरोधी भूमिका. हे विधेयक फेटाळले गेल्याने मुख्यमंत्र्याची प्रतिमा दलितविरोधी झाली. दुसरी घटना आहे आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातील दोन धडे वगळण्याचा त्यानी घेतलेला निर्णय. या निर्णयाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटलेल्या.

त्यांच्या मेहुणी आणि प्रमुख सल्लागार श्रीमती निर्मला ठोकळ यांना एकाच वेळी ८–१० समित्या आणि महामंडळे यांचे अध्यक्षपद त्यांनी दिले होते. त्यानंतर विधानपरिषदेत नियुक्त सदस्य म्हणून त्यांची वर्णी लावली. आपल्या एका नातेवाईक स्त्रीला त्यांनी एक गॅसएजन्सी मिळवून दिल्याचं आणि एका नातेवाइकास दूध-वितरणासाठी टॅंकर्स पुरविल्याचे बोलले जाते. एस. टी. बसने विनातिकिट प्रवास केल्याने दंड झालेले के. बी. जमदाडे यांची त्यांनी एस. टी. महामंडळावरच नेमणूक करून टाकली आहे. रवि चौधरी या एका खाजगी बस-वाहतूकदाराचीही त्यानी एस. टी. महामंडळावर नेमणूक केली आहे. गृहनिर्माण महामंडळाच्या जागावाटपाच्या भ्रष्टाचारसंबंधात त्यांच्या कुटुंबियाचे नाव घेतले जात आहे. त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

स्वच्छ प्रशासनाची हमी मुख्यमंत्री भोसले यांनी वारंवार दिली आहे; परंतु याबाबतचं खरं चित्र काय आहे? श्री. अंतुले यांनी आपल्या कारकीर्दीत भ्रष्टाचाराचे घाऊक दुकान उघडले होते— ज्याचा त्यांच्या पक्षाच्या सर्वच आमदारांना लाभ व्हावा. भोसलेंनी ते दुकान बंद केलं; परंतु आपल्या कुटुंबियांचाच फायदा होईल असं किरकोळ गैरव्यवहारांचं दुकान मात्र त्यांनी चालू ठेवलं आहे. बिल्डरना ना, हरकत प्रमाणपत्रे आणि आमदारांना दारूच्या दुकानाचे परवाने देण्याचे त्यानी बंद केले; परंतु वेगवेगळ्या लाभाच्या जागावर नातेवाइकांची वर्णी लावण्याची परंपरा भोसलेंनी कायम ठेवली आहे.

अर्थात हे गैरव्यवहार अंतुल्यांच्या हिमालयाएवढ्या भ्रष्टाचारापुढे अगदीच नगण्य असले तरी मुख्यमंत्र्यानी दिलेल्या स्वच्छ प्रशासनाच्या ग्वाहीस कमीपणा आणणारे आहेतच.

बेदिलीने ग्रासलेल्या पक्षाचे सरकार बाबासाहेब भोसले हाकीत आहेत. एक वर्ष झालं तरी प्रशासनावर त्यांची पकड बसलेली नाही. बहुसंख्य स्वपक्षीय त्यांच्या विरोधात आहेत. खुद्द मंत्रिमंडळातील फक्त १२ मंत्र्यांचा त्यांना पाठिंबा आहे, तर २३ विरोधात आहेत. त्यांचे विनोद आणि कोट्या अनेक वेळा परिस्थितीचे गांभीर्य हरवून बसतात. त्यामुळे सारीच गंमत-जमंत अशी सरकारची प्रतिमा बनली आहे. साखरसम्राट आणि अंतुले यांच्या विरुद्ध भोसले बोलताहेत; परंतु ते इंदिरा निष्ठेपायीच आणि त्या निष्ठेपायीच आपलं एक वर्ष ते पूर्ण करू शकले. त्याचे पुढील भवितव्य मात्र अंधारात आहे!

—कपिल पाटील

## अप्पासाहेब

पृष्ठ ३ वरून

सादर केला होता. त्या निबंधात किंमत-पृष्ठ कोष्टक, खपाच्या प्रमाणात देशी भाषा वृत्तपत्राना सरकारी जाहिराती, जाहिरात-वितरक संस्थानी जाहिरातीचे पैसे देण्याची मुदत व कमिशन याबाबत इंग्रजी व देशी भाषा वृत्तपत्रामध्ये दुजाभाव करू नये, वृत्तपत्रांचा कागद बाहेरगावच्या वृत्तपत्राना योग्य दरात मिळण्याची व्यवस्था, लहान शहरातील दैनिकाना २०० ते ३०० रुपयात महत्त्वाच्या बातम्या पुरविण्याची व्यवस्था, वृत्तपत्रशिक्षणाकरिता पदवी व पदविका शिक्षणाची अखिल भारतीय वृत्तसंस्थेमार्फत सोय इत्यादी गोष्टी केल्यास देशी भाषा वृत्तपत्रांचा विकास होऊ शकेल असे अप्पासाहेबांनी नमूद केले होते. मराठी पत्रकार परिषदेने १९४९ मध्ये महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची व पत्रकारांची आर्थिक परिस्थिती अभ्यासून शिफारशी करण्यासाठी नेमलेल्या समितीवरही अप्पासाहेबांनी काम केले. शासनाने १९६४ मध्ये नेमलेल्या लहान वृत्तपत्र चौकशीसमितीवर अप्पासाहेबानी काम केले. तसेच १९६७ ते १९७० या काळात त्यानी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य म्हणूनही काम केले. १९५२ ते १९६४ अशी बारा वर्षे अप्पासाहेबांनी महाराष्ट्र विधानपरिषदेत आमदार म्हणूनही काम केले. शासनाने लघुउद्योग म्हणून छोट्या वृत्तपत्राना मान्यता द्यावी यासाठीही अलीकडच्या काळात अप्पासाहेबांनी प्रयत्न केले.

केवळ वृत्तपत्रांच्या संदर्भातील अप्पासाहेबाचे हे कार्यदेखील त्यातील सातत्य आणि लहानांच्या हिताचा ध्यास यामुळे अतिशय वैशिष्टयपूर्ण ठरावे. याशिवाय हातमाग, कृषिविकास, लघुउद्योग, वाहतूक-व्यवसाय अशा किती तरी उद्योगांच्या संदर्भात अप्पासाहेबानी जे काम केले त्याची मोजदाद ठेवणेच अवघड आहे. ' लघुउद्योग-महर्षी ' असून स्वत.चा उद्योग नाही; पत्रकार-महर्षी असून स्वतःचे पत्र नाही आणि बारा वर्षे आमदार असूनही सत्तेच्या राजकारणाचा स्पर्श नाही असे खरोखर यतिमार्गी आयुष्य अप्पासाहेब जगले ! ' संपदा ' मासिकाचा कार्यकारी संपादक या नात्याने दोन वर्षे काम करीत असताना त्यांच्या सहवासाचा, मार्गदर्शनाचा थोडाफार लाभ मला मिळाला, हे मी माझे भाग्य समजतो. त्यांच्या पुण्य-स्मृतीस माझे शतश. अभिवादन !

—अनिल काळे

---

**इम्रानखानला वशीकरणाची कला अवगत असावी. पंचमहाभूतांपैकी वायू आणि पृथ्वी ही दोन भूते त्याला वश असावीत. आमचा कपिल जेव्हा गोलंदाजी टाकतो तेव्हा ज्या वाऱ्याला आम्ही युगे युगे देव मानला तो त्याच्या मदतीला येत नाही आणि इम्रानने नुसता चेंडू सोडायचा अवकाश तो चेंडू असा काही हवेत भिरभिरतो की आपली जबरदस्त वाटणारी फलंदाजी इम्रानच्या पायाशी लोळण घेते. क्रिकेट सांघिक खेळ असेलही; पण आज तरी इम्रान पाकिस्तानी संघापेक्षा मोठा वाटतो.**

**या इम्रानच्या खेळाची सारी वैशिष्टचे सांगणारा लेख माणूस पुढील अंकी—**

**लेखक : द्वारकानाथ संझगिरी**

# बाल कल्याण स्त्री सन्मान देशाचे उत्थान



लहान रोपट्याने बहरते उपवन
आजचे शैशव, उद्याचे यौवन
हाच बालक उद्याचा कर्णधार
खांद्यावर त्याच्या भवितव्याचा भार

नव्या वीस कलमी,कार्यक्रमात बालकांचे आरोग्य आणि सुरक्षिततेसाठीं समन्वित बाल विकास कार्यक्रम हातीं घेण्यात आला आहे.

माता, ही बालकाची जननी तशीच प्रारंभिक शिक्षक असते. देशाची खरी निर्माती तीच. स्त्री आणि शिशु यांच्या कल्याणावरच देशाची भावी सुबत्ता आणि सुरक्षितता अवलंबून आहे.

म्हणूनच बाल कल्याण आणि स्त्री सन्मान या भावनांना या कार्यक्रमात नवजीवन देण्यात आले आहे.

**बालकाला हवा पोषक आहार**
**त्यासाठी कुटुंब हवे लहान**

सविस्तर माहितीसाठीं खालील कूपन भरुन पाठवा.

श्री आर. के. जॉली
असिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर
रिजनल डिस्ट्रिबुशन सेंटर
२३ सिदपुर इन्डस्ट्रियल इस्टेट
हलाव पुल, मसरानी लेन
कुर्ला, मुंबई-४०००७०

नव्या 20 कलमीं कार्यक्रमाच्या महितीसाठीं कृपा करुन मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

नाव ____________________

पत्ता ____________________

____________________ पिन

**नवा 20 कलमी कार्यक्रम**

davp 82/460